ISSN-0971-8397

विकास समर्पित मासिक

# योजना

वर्ष ४५ अंक ३ पाने ५६ ऑक्टोबर २०१७ मूल्य २२रु.






## ‘ नव भारत ’

गरीबीमुक्त भारताची निर्मिती

**अमरजीत सिन्हा**

नवभारतातील कौशल्य व उद्योजकता विकास

**डॉ. अमितकुमार द्विवेदी, सारवणा वेलूस्वामी**

भारताचा भ्रष्टाचाराविरुद्धचा लढा

**व्ही.श्रीनिवास**

संकल्प ते सिध्दीसाठी महाराष्ट्राचे समर्थ योगदान

**सुरेश वांदिले**

### विशेष लेख


तिहेरी तलाक निकाल: मुस्लीम महिलांचा विजय

**आर के सिन्हा**

### फोकस

स्वच्छ भारत निर्माण

**परमेश्वरन अय्यर**






मराठी मासिक

# योजना

## योजना घरी आणा.
## आजच वर्गणी भरा.




विकासाचे सर्व पैलू, सर्व सामाजिक प्रश्न आणि चालू घडामोडी प्रसिध्द करणारे योजना हे एकमेव मासिक आहे. या मासिकात सर्व क्षेत्रातील तज्ज्ञांनी लिहिलेले अभ्यासपूर्ण व अचूक माहिती देणारे लेख असतात. त्यामुळे आपल्याला प्रत्येक क्षेत्रातील बिनचुक माहिती मिळते.

हे मासिक विद्यार्थीवर्ग व विद्वत्‌जनांचे आवडते आहे .स्पर्धात्मक परीक्षांना बसणाऱ्यांनी योजना वाचणे आवश्यक आहे. यातील माहिती साधारणत: इतरत्र प्रकाशित होण्याआधीच आपल्यापर्यंत येते.

### वर्गणीचे दर

| | |
|---|---|
| नियमित अंक मूल्य | २२.०० रुपये |
| विशेषांक | ३०.०० रुपये |
| वार्षिक वर्गणी | २३०.०० रुपये |
| द्विवार्षिक वर्गणी | ४३०.०० रुपये |
| त्रिवार्षिक वर्गणी | ६१०.०० रुपये |

वर्गणी, मनीऑर्डर
किंवा डिमांड ड्राफ्टद्वारे संपादक,योजना (मराठी)यांचे नावाने
७०१, "बी" विंग (७ वा मजला) केन्द्रीय सदन,
बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४
या पत्त्यावर पाठवावी. किंवा www.bharatkosh.gov.in/product
येथे ऑनलाईन भरावी.

**वर्गणी मनीऑर्डरने पाठविताना आपले नाव, पत्ता व संपर्क क्रमांक कूपनमध्ये सुवाच्य अक्षरात लिहा.**

विक्रीचे ठिकाण : ७०१ सी, ७०१बी, केंद्रीय सदन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४

योजना मासिक भारत सरकारच्या माहिती व प्रसारण मंत्रालयाच्या प्रकाशन विभागातर्फे प्रसिध्द केले जाते.

# योजना

## विकास समर्पित मासिक

❖ वर्ष ४५ ❖ ❖ अंक ३ ❖ ❖ ऑक्टोबर २०१७ ❖ ❖ मूल्य २२ रु. ❖



मुख्य संपादक
**दिपीका कच्छल**

संपादक
**उमेश उजगरे**

उप संपादक
**अभिषेक कुमार**

मुखपृष्ठ
**गजानन धोपे**


**'योजना' हे निती आयोगाच्या वतीने, केंद्र सरकारच्या माहिती व प्रसारण मंत्रालयाच्या प्रकाशन विभागातर्फे हिंदी, इंग्रजी, मराठी, गुजराती, कन्नड, तेलुगू, पंजाबी, उर्दू, बंगाली, तमिळ, मल्याळम, उडिया व आसामी भाषांतून प्रकाशित होते. देशाच्या सर्वांगीण विकासाची खुली चर्चा करणारे ते व्यासपीठ आहे. 'योजना'त प्रसिद्ध होणाऱ्या लेखांतील मते त्या त्या लेखकांची असतात.**


**जाहिरात दर पत्रक**

| | |
|---|---|
| ब्लॅक ॲंड व्हाईट पूर्ण पान: | रु. १०,००० |
| ब्लॅक ॲंड व्हाईट अर्धे पान: | रु. ६,००० |
| बॅक कव्हर पूर्ण पान: | रु. २०,००० |
| सेकंड कव्हर पूर्ण पान: | रु. १७,००० |
| थर्ड कव्हर पूर्ण पान: | रु. १५,००० |


## अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| ■ गरीबीमुक्त भारताची निर्मिती | - अमरजीत सिन्हा | ५ |
| ■ भारताचा भ्रष्टाचाराविरुद्धचा लढा | - व्ही. श्रीनिवास | ११ |
| ■ नवभारतातील कौशल्य व उद्योजकता विकास | - डॉ. अमितकुमार द्विवेदी, सारवणा वेलूस्वामी | १७ |
| ■ जातीमुक्त भारताची निर्मिती | - अमरजीत एस. नारंग | २१ |
| ■ तिहेरी तलाक निकाल : मुस्लीम महिलांचा विजय (विशेष लेख) | - आर. के सिन्हा | २४ |
| ■ स्वच्छ भारत निर्माण (फोकस) | - परमेश्वरन अय्यर | २७ |
| ■ 'न्यू इंडिया' साठी नवीन कृषी, शेतकरी कल्याण हीच गुरुकिल्ली | - डॉ. जगदीप सक्सेना | ३२ |
| ■ नव भारतासाठी नावीन्यपूर्ण सुधारणा वास्तवात आणणारे 'चॅम्पियन्स' | - डॉ. उन्नत पंडित | ३७ |
| ■ संकल्प ते सिध्दीसाठी महाराष्ट्राचे समर्थ योगदान | - सुरेश वांदिले | ४४ |



योजना मासिकासाठी लेख, वर्गणी, जाहिरात इ. सर्व पत्रव्यवहारासाठी पत्ता :
**योजना मासिक कार्यालय**
७०१, 'बी' विंग (७वा मजला), केंद्रीय सदन, सेक्टर १०, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४. दुरध्वनी - योजना -०२२-२७५६६५८२
email - myojanadpd@gmail.com

ISSN-0971-8397

विकास समर्पित मासिक

योजना

## नवे क्षितिज

थेंबे-थेंबे तळे साचे, असे म्हटले जाते. म्हणूनच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी वर्ष २०२२ पर्यंत नवा भारत निर्माण करण्याची हाक दिल्यानंतर संपूर्ण देशात चैतन्य संचारले. 'चले जाव' चळवीला ७५ वर्ष पूर्ण झाल्याच्या निमित्ताने पंतप्रधान मोदी यांनी नवा भारत निर्मितीचे आवाहन केले होते. १९४२ साली ऑगस्ट महिन्यातच महात्मा गांधी यांनी ब्रिटीशांना भारतातून निघून जाण्याचा इशारा 'चले जाव' चळवळीच्या माध्यमातून दिला होता. त्यानंतर संपूर्ण देश ब्रिटिशांना भारतातून हाकलून लावण्यासाठी एकवटला. या पार्श्वभूमीवर पंतप्रधानांनी नव भारत निर्मितीचा नारा देऊन भ्रष्टाचार,गरिबी, धर्म-जातीवाद आदी वाईट बाबीविरुद्ध तशीच लोकचळवळ उभारण्यासाठी लोकांना एकत्र आणण्याचे ठरविले. पंतप्रधानांच्या आव्हानानंतर देशवासीयांनी सामुहिकरित्या शपथ घेऊन भ्रष्टाचार, गरिबी, दहशतवाद, जातीवाद आदींपासून मुक्त असलेला नवा भारत वर्ष २०२२ पर्यंत निर्माण करण्याचा निर्धार केला.

नव्या भारताची संकल्पना ही बहुआयामी आहे. देशातील अनेक दुष्टप्रवृती दूर करण्यासाठी सरकार आणि नागरिक दोघांनाही खूप मेहनत घ्यावी लागणार आहे. या दुष्प्रवृतींचे विश्लेषण केल्यास असे आढळून येते की, यातील अनेक बाबी या अनेक वर्षांपासून, काही तर अगदी शतकांपासून देशात ठाण मांडून बसलेल्या आहेत. उदा. स्वच्छतेला आपल्या संस्कृतीत अगदी देवी-देवतेइतके महत्व देण्यात आले आहे. पण,तरीही जगात आपण सार्वजनिक ठिकाणच्या आपल्या अस्वच्छ सवयींसाठी ओळखले जातो. स्वत:च्या घरात स्वच्छतेसाठी कमालीचे जागरूक असलेले भारतीय नागरिक घराबाहेर पडताच पूर्णपणे बदलून जातात. उघड्यावर शौचास जाणे, रस्त्यावर आणि इतर सार्वजनिक ठिकाणी बिनधास्तपणे कचरा फेकणे, घाण करणे, हे भारतात सर्वत्र आढळून येणारे चित्र आहे. एक अस्वच्छ देश अशी आपली प्रतिमा निर्माण होणे देशात विदेशी गुंतवणूक आकर्षित करण्यात अडथळा तर ठरतेच शिवाय, नागरिकांचे आरोग्यही धोक्यात आणते. परिणामी आर्थिक भरभराटीमध्ये विघ्ने येतात. त्यामुळे स्वच्छ भारताची गरज अधोरेखित होते.

भारताच्या प्रगतीमधील आणखी एक अडथळा म्हणजे गरिबी. देशातील विशेषत: ग्रामीण भागातील बहुतांश लोक गरिबीच्या दुष्टचक्रात अडकलेले आहेत. याचप्रमाणे भष्टाचाराची वाळवी देशाच्या आर्थिक वाढीला पोखरू पाहते आहे. म्हणूनच सरकारने, नोटबंदी, थेट लाभ हस्तांतरण, आधार,भीम अँप आदी योजना आणून प्रगतीची फळे खऱ्या गरजू लोकांपर्यत पोहचविण्याचा प्रयत्न चालविला आहे. अर्थात, गरिबी आणि भ्रष्टाचारमुक्त भारत प्रत्यक्षात आणण्यासाठी अजून खूप काही करणे गरजेचे आहे.

दहशतवाद ही एक आंतरराष्ट्रीय समस्या आहे. या समस्येमुळे अनेक लोकांना केवळ शारीरिकच नव्हे तर मानसिक आघातही सोसावे लागतात. त्यामुळे नवा भारत निर्माण करण्यासाठी देशाला दहशतवादापासून मुक्ती देणे गरजेचे आहे.


भारतात अनेक शतकांपासून जातीव्यवस्था अस्तित्वात असल्याचे पाहायला मिळते. अस्पृश्यता, दलित आणि मागासवर्गीयांना समाजाच्या मुख्य प्रवाहापासून दूर ठेवणे, त्यांना शिक्षण आणि आरोग्याच्या सुविधांपासून वंचित ठेवणे आदींचे अनेक दाखले आपणास इतिहासात आढळून येतात. जातीच्या आधारावर केला जाणारा भेदभाव अजूनही पूर्णपणे थांबलेला नाही. या वृत्ती आणि प्रथा समाजातून दूर केल्याशिवाय देशाची सर्वांगीण प्रगती होऊ शकत नाही. त्यासाठीच जातीभेदविरहित भारत निर्माण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. याचप्रमाणे धर्मा-धर्मामध्ये भेद न करणारा भारतही निर्माण करावयाचा आहे. कारण, भारतात विविध धर्माचे, पंथाचे लोक राहतात. विविधतेत असलेल्या एकतेचा भारतीयांना नेहमीच अभिमान वाटत आला आहे. तरीही देशात अनेकदा धार्मिक हिंसाचार उफाळून आलेला आपण अनुभवला आहे. देशाच्या प्रगतीसाठी समाजात शांतता आणि सौहार्दपूर्ण वातावरण असणे गरजेचे आहे. त्यामुळे धार्मिक तेढ विरहित भारत निर्माण करणे गरजेचे आहे.

तिहेरी तलाक बाबत सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या ऐतिहासिक निकालामुळे मुस्लिम महिलांवर होत असलेला अन्याय दूर होऊन त्यांचे सशक्तीकरण करण्याच्या सरकारच्या प्रयत्नांना बळ मिळाले आहे. 'चॅम्पियन्स ऑफ चेंज' योजनेद्वारे सरकारने नवउद्यमींना संवादाचे थेट माध्यम उपलब्ध करून दिले आहे. ज्याचा उपयोग २०२२ पर्यंत नवा भारत उभारण्यासाठी होऊ शकतो. एखादे लक्ष्य गाठण्यासाठी सर्वात प्रथम आपण जिथे आहोत तिथेच थांबणार नाही, असा निर्धार करावा लागतो. सुदैवाने यासंदर्भात आपला निर्णय आधीच झाला असून २०२२ पर्यंत भारताला आर्थिक दृष्ट्या समृद्ध आणि बलशाली देश बनविण्याचे लक्ष्य आपण निर्धारित केले आहे.

■■■

# गरीबीमुक्त भारताची निर्मिती

-अमरजीत सिन्हा



**प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी 'गरीबीमुक्त भारतासाठी' मोहीम चालवण्याचा नारा दिला आहे. येत्या २०२२ सालापर्यंत संपूर्ण भारतातली गरीबी हटवण्यासाठी आत्तापासून सामाजिक मोहीम उभारायचे आवाहन देखिल त्यांनी केले आहे. ग्रामीण भारतातली ८ कोटी ८५ लाख कुटुंबे वंचित जीवन जगत आहेत किंवा त्यांना अत्यंत हलाखीचे जीवन कंठावे लागत आहे. हे लक्षात घेता मोदींनी ठरवलेले लक्ष्य हे कठीण आव्हान ठरु शकते. मात्र ग्रामीण भागातली गरीबी हटवण्यासाठी तिथे गेली अडीच वर्ष राबवल्या जात असलेल्या ग्रामीण विकास कार्यक्रमांचे यश बघता आपण योग्य मार्गावर आहोत असे म्हणता येऊ शकते.**

सन १९४२ ला झालेल्या भारत छोडो आंदोलनाला यावर्षी ७५ वर्ष पूर्ण होत आहेत. या निमित्ताने आपले माननीय प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी 'गरीबीमुक्त भारतासाठी' मोहीम चालवण्याचा नारा दिला आहे. येत्या २०२२ सालापर्यंत संपूर्ण भारतातली गरीबी हटवण्यासाठी आत्तापासून सामाजिक मोहीम उभारायचे आवाहन देखिल त्यांनी केले आहे. ग्रामीण भारतातली ८ कोटी ८५ लाख कुटुंबे वंचित जीवन जगत आहेत किंवा त्यांना अत्यंत हलाखीचे जीवन कंठावे लागत आहे. हे लक्षात घेता मोदींनी ठरवलेले लक्ष्य हे कठीण आव्हान ठरु शकते. मात्र ग्रामीण भागातली गरीबी हटवण्यासाठी तिथे गेली अडीच वर्ष राबवल्या जात असलेल्या ग्रामीण विकास कार्यक्रमांचे यश बघता आपण योग्य मार्गावर आहोत असे म्हणता येऊ शकते.

HSBC ने नुकत्याच केलेल्या अभ्यास निरिक्षणानुसार, ग्रामीण भागातली ६९ टक्के जनता ज्यांच्याकडे एक हेक्टरपर्यंत जमिनीची मालकी आहे किंवा अजिबातच जमीन नाहीये त्यांना उरलेल्या ३१ टक्के जनतेला ज्या समस्यांना तोंड द्यावे लागते, जसे की मजुरीतली वाढ किंवा अकुशल ग्रामीण तरुणांमधली बेरोजगारी यासारख्या प्रश्नांना तोंड द्यावे लागत नाही. या अभ्यास अहवालानुसार, दुष्काळ किंवा शेतमालाच्या पडत्या भावांसारख्या अडचणीच्या परिस्थितीत देखिल ग्रामीण भागातल्या गरीबांसाठी सरकारने उचललेल्या पावलांमुळे या भागातल्या गरीबांना फार फायदा होत आहे. गुजरातमधल्या आणंदच्या IRMA या ग्रामीण व्यवस्थापन संस्थेने दीनदयाळ अंत्योदय राष्ट्रीय ग्रामीण रोजगार मोहिमेचे राष्ट्रीय पातळीवरचे परिक्षण सुद्धा हेच दाखवते की ही मोहीम सुरु असलेल्या भागातल्या लोकांची मिळकत, इतर ठिकाणच्या मिळकतीपेक्षा २२ टक्क्यांनी जास्त आहे. तसेच या योजनेअंतर्गत सुरु झालेल्या महिलांच्या स्वंयसहायता गटांमुळे शिक्षण, आरोग्य आणि पोषक आहार क्षेत्रात आणि इतर उत्पादक मालमत्तेत मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक व्हायला लागली आहे.

या अहवालावरुन असेच दिसून येते कि सामाजिक प्रेरणेतून नेहमीच मोठी कामे होतात आणि रोजगाराचे विकेंद्रीकरण आणि विकास हे प्रगतीचे नवे मार्ग आहेत.

रोजगार, कौशल्यविकास,

जनसंवर्धन, घन आणि जलस्त्रोतांचे व्यवस्थापन यासारखे अनेक सामाजिक ग्रामविकास विभाग मुख्य स्त्रोत म्हणून कार्यरत आहे. आरोग्य, शिक्षण, पोषण आहार तसेच कौशल्य विकास या सर्व संबंधित क्षेत्रांमधे एकत्रित कार्याला एकाच वेळी सुरुवात करता आली, तर थोड्याच कालावधीत गरीब घरांमधली परिस्थिती सुधारणे शक्य होईल. गरीबीमुक्त किंवा दारिद्रयमुक्त म्हणजे समाजातल्या वंचित वर्गाला त्यांच्या दारिद्रयातून बाहेर येण्यासाठी मदत करण्याच्या दृष्टीने समाजात संधी उपलब्ध करुन देणे. म्हणूनच गरीबीमुक्त म्हणजे शिक्षण, आरोग्य, कौशल्य, स्वच्छता, स्वच्छ पेयजल, पोषक आहार, अन्नसुरक्षा, रोजगार, निवास, लिंगसापेक्ष आणि सामाजिक समता, सबलीकरण, संपर्क, वीजपुरवठा, शाश्वत स्त्रोतांच्या वापरांच्या प्रणाली, कचरा व्यवस्थापन आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे उच्च उत्पन्न गटासाठी विभिन्न शाश्वत आर्थिक व्यवहार या सर्वांच्या एकत्रित परिणामाने एखाद्या व्यक्तीच्या संपूर्ण मानवी क्षमतेचा विकास होणे, गरीबीमुक्त ग्रामपंचायती निर्माण करण्याच्या आव्हानात गरीबीच्या बहुआयामी पैलूंवर तोडगा काढून त्याचवेळी ग्रामीण भागात पूर्ण क्षमतेने बदल घडवण्यासाठी नवीन योजना शोधांचा अंतर्भाव होतो. गरीबीच्या बहुआयामी समस्येवर तोडगा काढण्यासाठी राज्य सरकारे चालवित असलेल्या अंत्योदय मोहिमेत हा एकात्मिक दृष्टीकोन अंतर्भूत झालेला आहे.

गरीबीमुक्त भारत कार्यक्रम यशस्वीपणे राबवून त्याचे परिणाम लवकरात लवकर मिळावे, यासाठी केंद्र सरकारचा ग्रामविकास विभाग राज्य सरकारे आणि स्थानिक प्रशासनाच्या एकत्रित सहभागाने प्रयत्न करत असतानाच गेल्या अडीच वर्षात विभागाने परिवर्तनशील पावले उचलली आहेत. ज्यांच्यामुळे अंत्योदय मोहिमेसाठी एकत्रित आणि संपृक्त दृष्टीकोन अवलंबण्याच्या आपण जवळ येऊन पोचलो आहोत.

**स्वयंरोजगार आणि रोजगार शोधण्यासाठीच्या जोरदार प्रयत्नांमुळे सुद्धा ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर आर्थिक चळवळीला सुरुवात झाली आहे. विविध प्रकारांच्या रोजगारांचा समावेश आणि पशुपालनावर लक्ष केंद्रित केल्यामुळे ग्रामीण भागातल्या कुटुंबांना अतिरिक्त कमाईचे नवे मार्ग मिळाले आहेत. राष्ट्रीय अन्न सुरक्षा कायद्याने तांदूळ आणि गहू ही धान्य स्वस्त दरात गरीबांसाठी उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने जे वार्षिक अनुदान दिले आहे, त्यामुळे गरीब घरांमधल्या जनतेला अन्न सुरक्षा मिळाली आहे.**

**१) प्रमाणानुसार प्रयत्न -**

ग्रामीण भारतात मोठ्या प्रमाणावर घरे आहेत जी लाखो वस्त्या आणि खेड्यांमध्ये पसरलेली आहेत. त्यामुळे त्यांना मदत करण्यासाठी त्या प्रमाणात प्रयत्न व्हायला हवे हे स्वच्छपणे दिसते आहे. केंद्र सरकार यासाठी मंजूर करत असलेला निधी आणि ग्रामविकास विभाग करत असलेला खर्च यात गेल्या काही काळात उल्लेखनीय वाढ दिसून आली आहे. सन २०१७-१८ या वर्षात या कार्यक्रमासाठी सुमारे १ लाख कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला, जो २०१२-१३ मधल्या मंजूर निधीच्या दुप्पट आहे. यामधे राज्यांचा वाटाही लक्षात यायला हवा. हिमालय आणि ईशान्य भारतातल्या राज्यांमध्ये तो ९० :१० या प्रमाणात आहे, तर इतर बिगर हिमालयन राज्यांमधे ६०:४० हे प्रमाण आहे. या काळात चौदाव्या पंचवार्षिक योजनेत ग्रामपंचायतींना मिळणाऱ्या वार्षिक खर्चात देखिल २५ हजार कोटी ते ३५ हजार कोटी या प्रमाणात वाढ झाली आहे. महिला स्वंयसहायता गटांनी २०१५-१७ या कालावधीत बँकांकडून कर्ज म्हणून सुमारे ७० हजार कोटी रुपये घेतले आणि ही रक्कम या आधीच्या काळात घेतलेल्या कर्जापेक्षा कितीतरी जास्त आहे. स्वयंरोजगार आणि रोजगार शोधण्यासाठीच्या जोरदार प्रयत्नांमुळे सुद्धा ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर आर्थिक चळवळीला सुरुवात झाली आहे. विविध प्रकारांच्या रोजगारांचा समावेश आणि पशुपालनावर लक्ष केंद्रित केल्यामुळे ग्रामीण भागातल्या कुटुंबांना अतिरिक्त कमाईचे नवे मार्ग मिळाले आहेत. राष्ट्रीय अन्न सुरक्षा कायद्याने तांदूळ आणि गहू ही धान्य स्वस्त दरात गरीबांसाठी उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने जे वार्षिक अनुदान दिले आहे, त्यामुळे गरीब घरांमधल्या जनतेला अन्न सुरक्षा मिळाली आहे. उपलब्ध साधन सामग्री जर केंद्रीकरण करुन, विचारपूर्वक आणि संपूर्ण क्षमतेने तसेच कमीत कमी वाया जाईल या पद्धतीने वापरली तर त्या पद्धतीत ग्रामीण भागातल्या जनतेचे जीवन पूर्णपणे बदलून टाकायची क्षमता

आहे. प्रधानमंत्री ग्रामीण आवास योजनेखाली गरीबांसाठी एक कोटी घरे, मार्च २०१९ पर्यंत सर्व पात्र ग्रामीण घरांना जोडणारा पक्का रस्ता, २०१८-१९ पर्यंत महिला स्वंयसहायता गटांना व्यवसायासाठी बँकांकडून कर्ज म्हणून वार्षिक ६० हजार कोटी रुपयांचे वाटप ही सर्व स्वप्ने प्रत्यक्षात येणे सहज शक्य आहे कारण त्याला पाठिंबा देण्यासाठी लागणारी साधन संपत्ती उपलब्ध आहे.

**२) जलसंवर्धन आणि रोजगार सुरक्षेसाठीचे जोरदार प्रयत्न -**

सर्व गावकऱ्यांचे भले होईल याची खात्री करुन देण्यात यशस्वी झालेल्या संपन्न गावाला ओळखण्याची पक्की खूण म्हणजे गावातले परिणामकारक जलसंवर्धन. याच कारणासाठी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत होणारा ६० टक्के खर्च शेतीवर आणि शेतीशी संबंधित कामांवर करण्याचा निर्णय सरकारने घेतला. माननीय प्रधानमंत्र्यांनी मे २०१५ मध्ये १३ दुष्काळग्रस्त राज्यांच्या मुख्यमंत्र्यांची बैठक घेतली. त्यात जलसंवर्धनावर लक्ष केंद्रित करण्याचे आवाहन प्रधानमंत्र्यांनी सर्व मुख्यमंत्र्यांना केले आणि अशा प्रकारे जलसंवर्धनासाठी राज्यांनी पुढाकार घेऊन प्रकल्पाने नवीन पायरी गाठली. राजस्थानमधले मुख्यमंत्री जल स्वावलंबन अभियान, आंध्र प्रदेशमधले नीरु-चेडू, तेलंगणामधले काकतिया अभियान, महाराष्ट्रातले जलयुक्त शिवार अभियानासह इतर जलसंवर्धनासाठीचे कार्यक्रम, झारखंडमधले डोमा शेततळे निर्माण अभियान यांच्यासह राज्यांमधे राबवले जाणारे जलसंवर्धनासाठीचे इतर कार्यक्रम या सर्वांसाठी मनरेगाने गेल्या ५ वर्षात २३५ कोटींपेक्षा जास्त व्यक्तींना २०१५-१६ आणि २०१६-१७ या वर्षांमधे रोजगार दिला. मनरेगाच्या प्रारंभापासून या दोन वर्षात सर्वात जास्त खर्च करण्यात आला. शेळीपालन, कुक्कुटपालन, दुग्धव्यवसाय, स्वतंत्र शौचालय योजना, गृहनिर्माणासाठी ९०-९५ दिवसांच्या मजुरीची योजना,

---

**राजस्थानमधले मुख्यमंत्री जल स्वावलंबन अभियान, आंध्र प्रदेशमधले नीरु-चेडू, तेलंगणामधले काकतिया अभियान, महाराष्ट्रातले जलयुक्त शिवार अभियानासह इतर जलसंवर्धनासाठीचे कार्यक्रम, झारखंडमधले डोमा शेततळे निर्माण अभियान यांच्यासह राज्यांमधे राबवले जाणारे जलसंवर्धनासाठीचे इतर कार्यक्रम या सर्वांसाठी मनरेगाने गेल्या ५ वर्षात २३५ कोटींपेक्षा जास्त व्यक्तींना २०१५-१६ आणि २०१६-१७ या वर्षांमधे रोजगार दिला.**

---

११ लाखांपेक्षा जास्त शेततळ्यांची निर्मिती या वैयक्तिक लाभ योजनांना प्रोत्साहन. या सगळ्यांमुळे ग्रामीण भागातल्या जनतेचे उत्पन्न वाढवून त्यांच्या जगण्याचा दर्जा उंचावण्याची उत्तम संधी प्राप्त झाली. केंद्र सरकारचा जल विभाग, भूसंसाधन विभाग यांच्या संयुक्त सहभागाने जलसंवर्धनाच्या मार्गदर्शक तत्वांच्या अंमलबजावणीची नवी मोहीम सरकारने हाती घेतली. ज्यात पहिल्या फळीतले कामगार आणि अभियंते यांच्या सोबतीने तांत्रिकदृष्ट्या भक्कम आणि शास्त्रीय कसोटीवर पडताळून बघितलेल्या जलसंवर्धन योजनांचा विकास करण्यावर आणि त्यातून देशातल्या २ हजार २६४ पाण्यापासून वंचित मंडळांची गरज भागवण्यावर लक्ष केंद्रित केले आहे. या मोहिमेमुळे भविष्यात चांगला परिणाम दिसून येईल आणि ग्रामीण भागाला होणाऱ्या पाणीपुरवठ्याचा दर्जा सुधारेल.

**३) नागरिकांचा सहभाग -**

ग्रामविकास विभागाने सरकारची विश्वासार्हता वाढवण्यासाठी नागरिक केंद्रीत दृष्टीकोन अंगिकारला आहे. सखोल सहभागातून योजना तयार करण्यासाठी सामाजिक, आर्थिक आणि जातीआधारीत जनगणनेतून मिळालेल्या माहितीचा उपयोग करुन घेऊन, तसेच प्रत्येक गरीब घरांपर्यंत पोहोचून त्यांची परिस्थिती सुधारण्यासाठी काम करण्यामुळे गरीबात गरीब घराला सरकारच्या प्रयत्नात सहभागी करुन घेता येईल. नागरिकांशी संबंधित मेरी सडक मोबाईल ॲप ज्यात रस्त्यांच्या परिस्थितीबाबत नागरिकांना सरकारला माहिती कळवण्याची सुविधा आहे, तसेच प्रधानमंत्री ग्रामीण आवास योजनेतल्या घरांची चित्रे, अपलोड करणारे आवासॉफ्ट ॲप याचीसुद्धा सामान्य घरांपर्यंत पोहोचवण्यासाठी सरकारला मदत झाली आहे.

जन माहिती अभियान अजून जोमाने चालवण्यासाठी ग्रामविकास

विभाग प्रत्येक ग्रामपंचायतीत १ ते १५ ऑक्टोबर या कालावधीत ग्राम समृद्धी आणि स्वच्छता पंधरवडा राबवत आहे. या कालावधीत ग्रामपंचायत कार्यालयात स्वच्छता अभियानाशी संबंधित कार्यक्रमांच्या नोंदी, लाभार्थ्यांची नावे इत्यादी सर्व गोष्टी जनतेला छाननीसाठी उपलब्ध असतील. कुठल्याही गावकऱ्याला गावात सुरु असलेले कार्यक्रम, मोहिमा याची माहिती घेता यावी यासाठी मोबाईल फोनवर आधारीत जन माहिती यंत्रणा सुरु होत आहे ज्यामुळे प्रत्येक गावकरी त्याची छाननी करु शकेल. त्याचप्रमाणे महिला स्वंयसहायता गटांमधून संपूर्ण व्यवस्थित प्रशिक्षण आणि सामाजिक लेखा प्रमाणिकरणानंतर सामाजिक लेखापालांची एक फळी तयार केली जात आहे. याची सूचना महालेखापालांच्या कार्यालयात दिली आहे.

**४) माहिती तंत्रज्ञान, थेट लाभ हस्तांतरण आणि आधारच्या वापराद्वारे पारदर्शकता -**

माहिती तंत्रज्ञान, थेट लाभ हस्तांतरणाद्वारे बँक किंवा पोस्ट कार्यालयातल्या खात्यांमधे पैसे भरणे यामुळे ग्रामविकास विभाग आघाडीवर आहे. मनरेगाची ९८ टक्के मजुरी आणि प्रधानमंत्री ग्रामीण आवास योजनेतले १०० टक्के पैसे थेट हस्तांतरण योजनेद्वारेच लाभार्थ्यांच्या बँक किंवा पोस्ट खात्यात जमा होत आहेत. मनरेगा योजनेत काम करणाऱ्या सुमारे ६ कोटी मजुरांच्या मंजुरीनंतर त्यांचे आधार क्रमांक त्यांच्या बँक खात्याशी जोडले आहेत. ठराविक गावांमधे निश्चित तारखांना जर बँकांचे नि पोस्टाचे प्रतिनिधी सूक्ष्म वित्त पुरवठ्यासाठी उपलब्ध झाले तर मोठ्या प्रमाणावर सोपे डिजिटल व्यवहार होऊ शकतील आणि त्यामुळे डिजिटल व्यवहारांबद्दलची सर्वसामान्य जनतेच्या मनातली भीती दूर व्हायला मदत होईल. असे झाले तर अशिक्षित किंवा अर्धशिक्षित मजूर तसेच दुर्बल निवृत्तीवेतन धारकांना आर्थिक व्यवहारात येणाऱ्या अडचणी मोठ्या प्रमाणात दूर होतील महिला स्वंयसहायता गटातल्या काही स्वयंसेविकांना बँक प्रतिनिधी किंवा बँक सखी म्हणून काम करण्याचे आवाहन केले आहे आणि त्याला आतापर्यंत मिळालेला प्रतिसाद उत्साहवर्धक आहे.

**मनरेगाची ९८ टक्के मजुरी आणि प्रधानमंत्री ग्रामीण आवास योजनेतले १०० टक्के पैसे थेट हस्तांतरण योजनेद्वारेच लाभार्थ्यांच्या बँक किंवा पोस्ट खात्यात जमा होत आहेत. मनरेगा योजनेत काम करणाऱ्या सुमारे ६ कोटी मजुरांच्या मंजुरीनंतर त्यांचे आधार क्रमांक त्यांच्या बँक खात्याशी जोडले आहेत.**

**५) अवकाश तंत्रज्ञानाद्वारे पारदर्शक आणि परिणामकारक निरिक्षण -**

मनरेगा योजनेअंतर्गत झालेल्या कामांमधून करोडो रुपयांच्या मालमत्तेची निर्मिती झाली. त्याचे जिओटॅगिंग केल्याने इंटरनेटवर निरिक्षण करणे उपग्रहांच्या सहाय्याने सुलभ झाले आहे. पारदर्शकतेला प्रोत्साहन देण्यासाठी अवकाश तंत्रज्ञानाचा कसा उत्तम उपयोग करुन घेता येतो हे यावरुन दिसून येते. याचा अजून सबळ उपयोग प्रधानमंत्री ग्रामीण आवास योजनेचे लाभार्थी निश्चित करताना झाला आहे. त्यांच्या जुन्या निवासाची चित्रे, अवस्था, नवीन घरांच्या निर्मितीची प्रगती इत्यादींची १०० टक्के माहिती अक्षांश रेखांशासह जिओटॅग करुन इंटरनेटवर उपलब्ध झाल्यामुळे बऱ्याच गोष्टींची प्रत्यक्ष जागेवर जाऊन पडताळणी करण्याची आवश्यकता उरली नाही. ही सर्व जिओटॅग केलेली मालमत्ता सार्वजनिक संकेतस्थळावर सर्वांना पाहण्यासाठी उपलब्ध आहे. अशा प्रयत्नांमुळे खरोखरच पारदर्शकता वाढायला मदत होते. प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेत देखिल रस्त्यांची योग्य दिशेने आणि योग्य प्रकारे आखणी, प्रत्यक्ष बांधलेल्या रस्त्यांची अंतरे आणि विविध वाड्या-वस्त्यांना किंवा गावांना जोडण्यासाठी या रस्त्यांचा झालेला उपयोग या सगळ्यांची माहिती घेण्यासाठी अवकाश तंत्रज्ञानाचा उपयोग अत्यंत उपयुक्त ठरला आहे. प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेतून बनवलेल्या रस्त्यांच्या दुतर्फा झाडे लावण्याचे काम महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजनेद्वारे केले जाते. हे काम किती यशस्वीपणे पार पडलंय याची तपासणी करणे अवकाश तंत्रज्ञानाने कमी वेळात शक्य करुन दिले आहे. मनरेगाद्वारे निर्माण झालेल्या प्रत्येक प्रकल्पाचे 'पूर्वी, आता आणि नंतर' या प्रत्येक पयारीवरचे जिओ

टॅगिंग करणे आणि सर्व रस्त्यांसाठी या प्रकारचे ॲप्लिकेशन सार्वत्रिक करणे हे आता आपल्या समोरचे आव्हान आहे.

**६) बँक कर्जाचा महिला स्वंयसहायता गटासाठी वापर -**

दीनदयाळ अंत्योदय योजना - राष्ट्रीय ग्रामीण रोजगार मोहिमेने हे दाखवून दिले आहे, की सामाजिक चळवळ आणि गटांच्या निर्मितीमुळे मोठ्या प्रमाणावर सामाजिक निधी जमतो. असे असताना आर्थिक व्यवहारांचा विकास आणि रोजगाराचे विविधीकरण करायला प्रोत्साहन द्यायला हवे. सर्व व्यवहारांना बँकेची जोडणी आवश्यक आहे कारण शेवटी गरीबी किंवा दारिद्रय निर्मूलनाच्या प्रत्येक प्रयत्नाला विविध आर्थिक व्यवहारांसाठी माफक व्याजदरांवर संस्थागत कर्ज सुविधेची जोड असणे आवश्यक असणार आहे. आतापर्यंत बँकांद्वारे ४३ हजार कोटी रुपयांचा निधी कर्जाच्या स्वरुपात वापरला गेला असून, २०१८-१९ पर्यंत हा आकडा ६० हजार कोटींवर जाईल, असा विश्वास सरकारला वाटतो आहे. कौशल्य विकास कार्यक्रमाला कायमसाठी महिला स्वंयसहायता गटांना जोडून घेतल्यामुळे बँक कर्जाचा परिणामकारक वापर करण्यासाठी सामान्य जनतेची तयारी वाढलेली दिसून येते आहे.

**७) संपर्क वाढविणे -**

ग्रामीण भागात रोजगाराच्या नव्या संधी आणण्यासाठी परिवर्तन घडवून आणण्यात रस्त्यांच्या जाळ्यांची वाढ मोठ्या प्रमाणावर कारणीभूत ठरली आहे. बाजारासाठी दुसरीकडे पोहोचणे सोपे होण्यासोबतच रोजंदारीवरच्या मजुरांना कामाच्या ठिकाणी पोहोचण्यासाठी रस्त्यांची वाढलेली सोय उपकारक ठरली आहे. याच कारणासाठी प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेतून रस्ते बांधणीच्या कामाचा वेग २०११-१४ या काळात प्रतिदिन ७० किलोमीटर इतका होता तो आता २०१६-१७ मधे प्रतिदिन १३० किलोमीटर पर्यंत वाढवण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न केले जात आहेत. ग्रामीण भागातल्या जवळजवळ ८०

**प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेतून रस्ते बांधणीच्या कामाचा वेग २०११-१४ या काळात प्रतिदिन ७० किलोमीटर इतका होता तो आता २०१६-१७ मधे प्रतिदिन १३० किलोमीटर पर्यंत वाढवण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न केले जात आहेत. ग्रामीण भागातल्या जवळजवळ ८० टक्के पात्र घरांपर्यंत पक्क्या रस्त्यांची सुविधा पोहोचवण्यात सरकारला यश आले असून, मार्च २०१९ पर्यंत सर्व म्हणजे १०० टक्के घरांपर्यंत पोचणारे रस्ते बनवून पूर्ण होतील, असा प्रयत्न सरकार करत आहे.**

टक्के पात्र घरांपर्यंत पक्क्या रस्त्यांची सुविधा पोहोचवण्यात सरकारला यश आले असून, मार्च २०१९ पर्यंत सर्व म्हणजे १०० टक्के घरांपर्यंत पोचणारे रस्ते बनवून पूर्ण होतील, असा प्रयत्न सरकार करत आहे. पर्यावरणस्नेही आणि नाविन्यपूर्ण तंत्रज्ञान वापरुन उदाहरणार्थ प्लॅस्टिक कचरा, फ्लाय ॲश, जिओ-कापड, पर्यावरणस्नेही सिमेंट, कोल्ड मिक्स इत्यादी गोष्टींचा वापर रस्ते बनवताना वाढवून रस्त्यांसाठीचे पर्यावरणयोग्य धोरण राबवले जात आहे. याची खात्री करुन घेतली जात आहे. मध्य प्रदेशात सध्या सुरु असलेली यशस्वी रस्ते देखभाल प्रणाली आणि उत्तराखंड राज्यातले सार्वत्रिक देखभालीचे प्रयोग इतर राज्यांमधे सुद्धा राबवायला हवेत.

**८) गरजेवर आधारीत कौशल्य शिक्षणाचे आधुनिकीकरण -**

ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर दिसणाऱ्या बेरोजगारी किंवा रोजगाराच्या कमी उपलब्धतेच्या समस्येवर उपाययोजना करण्यासाठी स्वयंरोजगार आणि नोकरीच्या संधी शोधताना कौशल्य विकासाची आवश्यकता आहे. मजबूत पाठिंबा आणि एककेंद्राभिमुखता यांच्यासह नियोजनबद्ध प्रयत्नांच्या माध्यमातून किरकोळ व्यापार, शेतकरी उत्पादक संघटना, पैसे घेऊन सेवा देऊ करणाऱ्या संस्था, ग्रामीण वाहतूक यंत्रणा, हातमाग आणि हस्तकलेच्या वस्तु बनविणे, इतर कलाकुसरीचे काम यांच्या स्वरुपात मोठ्या प्रमाणावर नवीन ग्रामीण उद्योगधंदे सुरु करणे शक्य होईल. कृषी, पशुपालन, सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग, खादी आणि ग्रामोद्योग मंडळ, वस्त्रोद्योग या ग्रामीण भागाशी संबंधित विभागांची ताकद वाढवून त्यांच्या कार्यक्रमांचा वापर शेती आणि बिगर शेती क्षेत्रात रोजगार निर्मितीसाठी करायचा प्रयत्न ग्रामविकास विभाग करत

आहे. अकुशल, गरीब मजूर आणि ग्रामीण गवंडयांसाठीचे विशेष प्रशिक्षण आता कमी प्रमाणावर लागते. अकुशल रोजगारातून कमाई करुन जगणारी घरे आता कमी होत आहेत. गरीबांसाठीचे सर्व कार्यक्रम औपचारीकपणे विभाग कौशल्य मंडळाकडून तपासून, पडताळणी करुन त्यावर परीक्षण आणि प्रमाणिकरणाचा शिक्का लावला जातो. पायाभूत मानके आणि नियम सक्षमपणे अमलात आणण्यासाठी ग्रामविकास, विभागाने त्यांच्या सर्व नोकरीच्या संधी आणि स्वयंरोजगारासाठीचे कौशल्य विकास कार्यक्रम, कौशल्य विभागाच्या सामायिक नियमांमधे अंतर्भूत केले आहेत. दीनदयाळ उपाध्याय ग्रामीण कौशल्य योजना आणि ग्रामीण स्वयंरोजगार प्रशिक्षण संस्था या दोघांचेही कार्यक्रम सुधारीत केले गेले. जेणेकरुन ते अव्वल दर्जाचे होतील आणि त्यांच्याद्वारे जास्त प्रमाणावर उत्तम नोकरी वा इतर रोजगाराचे पर्याय उपलब्ध होतील.

**९) परिवर्तनासाठी नवकल्पनांना प्रोत्साहन -**

स्थानिक जनता आणि राज्यांच्या प्राथमिकता जपण्यासाठी ग्रामविकास विभागाने अभिनव कल्पना राबवल्या आहेत. तामिळनाडूच्या ८० टक्के गावांमधे राबवला जाणारा घनसंसाधन व्यवस्थापन कार्यक्रम, महाराष्ट्र, आंध्रप्रदेश, तेलंगणा आणि आता बिहार नि छत्तीसगडमधे सुरु असलेला जलसंसाधन व्यवस्थापन कार्यक्रम या मनरेगा आणि दीनदयाळ अंत्योदय राष्ट्रीय ग्रामीण रोजगार मोहिमेद्वारे राबवलेल्या नवकल्पनांची उदाहरणे आहेत. आजीविका ग्रामीण एक्सप्रेस ही ग्रामीण भागातली वाहतूक योजना, जलसंवर्धन आणि ग्रामीण रस्ते मार्गदर्शक तत्वे, स्वाभाविक निवास अभ्यास योजना ज्यात प्रदेशानुसार योग्य तंत्रज्ञान वापरुन ग्रामीण भागातल्या घरांसाठीचा आराखडा बनवला जातो, मनरेगा कामगारांमधे कौशल्य विकासाला प्रोत्साहन देण्यासाठी सुरु केलेली लाईफ योजना या सर्व मोठ्या प्रमाणावर नवकल्पना राबवण्याचे प्रतिकच आहेत.

**१०) पुराव्यावर आधारीत निरीक्षण -**

मोठ्या प्रमाणावर राबवल्या जाणाऱ्या कार्यक्रमांमधे योजनाबद्ध दृष्टीकोन आवश्यक असतो. त्यामुळे त्यांची परिणामकारकता वाढविण्यासाठी निरीक्षण आणि परीक्षण करता येते. खूप सशक्त आणि पारदर्शक व्यवहारांबरोबरच मालमत्तांचा दर्जा निश्चित करण्यासाठी जिओ टॅगिंगचा वापर, दरवर्षी विशिष्ट कार्यक्रमांच्या अंमलबजावणीचे परीक्षण करणाऱ्या संस्थांचे ६०० जिह्यांना भेट देऊन केलेले परीक्षण, आठ राज्यांमधल्या कार्यक्रम अंमलबजावणीचा दर्जा तपासण्यासाठी सामायिक फेरतपासणी मोहिमेची योजना हे निरीक्षणासाठी राबवलेले काही प्रमुख उपक्रम आहेत. याशिवाय आणंदच्या ग्रामीण व्यवस्थापन संस्थेने दीनदयाळ अंत्योदय योजना-राष्ट्रीय ग्रामीण रोजगार मोहीमेच्या अभ्यासाचा अहवाल हे आणखी काही उपयुक्त प्रयत्न आहेत. माहितीच्या गरजांमधली विविधता आणि तंत्रज्ञानाच्या बारकाव्यांच्या पैलूंचा विचार करता ग्रामविकास विभागाने उत्तम परिणामांसाठी काही विशिष्ट व्यक्तींची नेमणूक केली आहे. यात मानव संसाधन विभागातले उच्च दर्जाचे विशेषज्ञ गट आहेत, तसेच माहिती तंत्रज्ञान वापर आणि आव्हाने, अंतर्गत लेखापरिक्षण, बाजाराशी जोडणी, तसेच बाजार साखळी, या विषयांमधे सरकारी आणि बिगर सरकारी विभागातले विशेषज्ञ समाविष्ट आहेत. या सर्व प्रयत्नांनी ग्रामीण विकास कार्यक्रम अधिक परिणामकारकरित्या राबवता येतात.

**११) एककेंद्री पद्धतीने अंमलबजावणी -**

गरीबीमुक्त म्हणजे वंचित सामान्य जनतेला त्यांच्या दारिद्रयातून बाहेर पडण्यासाठी सामाजिक संधी उपलब्ध करुन देणे, गरीबीच्या विविध परिणामांचा विचार करुन त्यातून मुक्त होण्यासाठी राबवलेल्या अंत्योदय मोहीमेत हाच एककेंद्री दृष्टीकोन ठेवलेला दिसून येतो.

■■■

*लेखक केंद्रीय ग्रामविकास खात्याचे सचिव असून सर्व शिक्षा अभियान आणि राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य योजना आखण्यात त्यांची महत्त्वाची भूमिका राहिली आहे.*

*email: secyrd@nic.in*

उपाय

# भारताचा भ्रष्टाचाराविरुद्धचा लढा

-व्ही.श्रीनिवास



**गेल्या काही वर्षांत 'कसलाही भ्रष्टाचार सहन करणार नाही' आणि 'किमान शासन, कमाल प्रशासन' या भारताच्या दृष्टिकोनामुळे प्रशासन प्रारुपात सोपेपणा आला आहे. या संदर्भात काही पावले उचलण्यात आली आहेत. प्रमाणपत्रे सादर करताना ती सरकारी अधिकाऱ्यांकडून साक्षांकित किंवा अधिप्रमाणितकरून घेणे,ही पद्धत बंद करण्यात आली आहे.निम्न स्तरांवरील पदांच्या भरतीसाठी वैयक्तिक मुलाखती घेण्याची पद्धत रद्द करण्यात आली आहे.**

भ्रष्टाचार आणि काळ्या पैशाने भारतीय लोकशाहीचा नाश केला आहे.त्यामुळेच भ्रष्टाचार आणि काळ्या पैशाविरुद्धचा हा लढा चालूच राहणार असे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी झारखंडला नुकत्याच दिलेल्या भेटीत केले. झारखंडमधील सखीमंडळांना (स्वयं सहायता गटांना) त्यांच्या हस्ते काही स्मार्टफोन भेट देण्यात आले, त्यावेळी ते बोलत होते. स्मार्टफोनच्या वापराबाबत गावकऱ्यांनी दिलेल्या उत्तरांनी मी थक्क झालो असेही ते म्हणाले.स्मार्ट प्रशासनाने भारतातील भ्रष्टाचाराविरुद्धच्या लढाईला मार्ग दाखवला आहे.

## 'कसलाही भ्रष्टाचार सहन करणार नाही'(झिरो टॉलरन्स) हा दृष्टिकोन

गेल्या काही वर्षांत 'कसलाही भ्रष्टाचार सहन करणार नाही' आणि 'किमान शासन, कमाल प्रशासन' या भारताच्या दृष्टिकोनामुळे प्रशासन प्रारुपात सोपेपणा आला आहे. या संदर्भात काही पावले उचलण्यात आली आहेत. प्रमाणपत्रे सादर करताना ती सरकारी अधिकाऱ्यांकडून साक्षांकित किंवा अधिप्रमाणितकरून घेणे,ही पद्धत बंद करण्यात आली आहे.निम्न स्तरांवरील पदांच्या भरतीसाठी वैयक्तिक मुलाखती घेण्याची पद्धत रद्द करण्यात आली आहे. सार्वजनिक क्षेत्रात काम करणाऱ्या अकार्यक्षम, तसेच ज्यांच्या कामातील सचोटीबद्दल संदेह आहे अशा ५० वर्षांवरील कर्मचाऱ्यांना मुदतीच्या आत काढून टाकणे, अशा अनेक प्रकारच्या निर्णयांचा यात समावेश आहे. याशिवाय काळा पैसा आणि भ्रष्टाचार यांचे निर्मूलन करण्यासाठी सरकारने उच्च मूल्य असलेल्या नोटांचे निश्चलनीकरण करण्याचा निर्णय घेतला. काळ्या पैशाविरुद्ध लढण्यासाठी सरकारने विशेष शोध पथकाची निर्मिती केली.तसेच सरकारने कोळसा खाणींचे लिलाव ऑनलाईन करण्याची पद्धत सुरु केली. त्याचप्रमाणे सरकारने जी-२० देशांच्या परिषदांमध्ये आपल्या देशातील कर पद्धती बदलण्यासाठी आंतरराष्ट्रीय सहकार्याची विशेषत: युरोप आणि इतर देशांकडून सहकार्याची मागणी केली होती. स्वित्झर्लंडबरोबर झालेल्या द्विपक्षीय बैठकांमध्ये काळा पैसा आणि करचुकवेपणा या अपप्रवृत्तींशी

'दोन्ही देशांनी एकत्र येऊन लढण्यास प्राधान्य द्यावे' यावर भारताने भर दिला होता.

**भ्रष्टाचाराविरुद्ध लढण्यासाठीची भारताची संस्थात्मक आणि कायदेशीर रचना**

भारताचा भ्रष्टाचाराविरुद्धचा लढा मजबूत आणि काळाच्या मुशीतून तावून-सुलाखून निघालेल्या संस्थात्मक आणि कायदेशीर रचनेवर आधारित आहे.यामध्ये भ्रष्टाचार प्रतिबंध कायदा,स्वतंत्र केंद्रीय दक्षता आयोग, महालेखानियंत्रक,न्यायाधीश (चौकशी) कायदा,लोकपाल आणि लोकायुक्त कायदा २०१३,ध्यानाकर्षक(व्हिसल ब्लोअर्स) संरक्षण कायदा २०११,आर्थिक गैरव्यवहार प्रतिबंध (मनी लॉडरिंग) कायदा, बेनामी व्यवहार (प्रतिबंध)कायदा यांचा समावेश आहे.यामध्ये गुन्हेगारीकरण आणि लाचखोरी या क्षेत्रातील अनेक प्रकरणांची दखल घेऊन त्यावर कारवाई केली जाते. नागरी सेवेतील सर्व कर्मचाऱ्यांना दरवर्षी त्यांच्या मालमत्तेचा तपशील जाहीर करणे बंधनकारक आहे. निवडणुकीसाठी उभे राहणाऱ्या प्रतिनिधींनी प्रत्येक निवडणुकीच्या वेळी स्वत:ची मालमत्ता जाहीर करणे आवश्यक असते.

**शासन स्मार्ट बनवताना**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वातंत्र्यदिनी १५ ऑगस्ट, २०१४ रोजी केलेल्या भाषणात **प्रधानमंत्री जन-धन योजना** ही **राष्ट्रीय मोहीम** म्हणून जाहीर केली. देशातील सर्व घरांना या योजनेत व्यापक प्रमाणावर आर्थिकदृष्ट्या सामावून घेण्याचे एकात्मिक उद्दिष्ट ठरवण्यात आले. "देशातील आर्थिक साधनसंपत्तीचा वापर गरिबांच्या कल्याणासाठी होणे आवश्यक असून या बदलाला आत्ताच्या या क्षणापासून सुरुवात होत आहे", असे पंतप्रधान यावेळी बोलताना म्हणाले. राष्ट्राच्या भ्रष्टाचाराविरुद्धच्या लढाईत "शासनाला अधिक स्मार्ट बनवणे" यावर लक्ष केंद्रित करून त्याला अग्रक्रम देण्यात आला आहे.बँकिंग क्षेत्रातील तंत्रज्ञानात झालेली क्रांती ही एक लक्षणीय यशकथा असून तिचा लाभ लाखो भारतीयांना झाला आहे. "शासन अधिक स्मार्ट बनवण्याच्या प्रारुपामुळे" म्हणजेच आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करून अनुदानाच्या रकमेचा लाभ जास्तीत जास्त लोकांना मिळून त्याचा कार्यक्षम रीतीने वापर करता आला. हीच कामे हाताने केली असती तर त्याचा एवढा व्यापक प्रमाणावर प्रसार झाला नसता.

**राष्ट्राच्या भ्रष्टाचाराविरुद्धच्या लढाईत "शासनाला अधिक स्मार्ट बनवणे" यावर लक्ष केंद्रित करून त्याला अग्रक्रम देण्यात आला आहे.बँकिंग क्षेत्रातील तंत्रज्ञानात झालेली क्रांती ही एक लक्षणीय यशकथा असून तिचा लाभ लाखो भारतीयांना झाला आहे. "शासन अधिक स्मार्ट बनवण्याच्या प्रारुपामुळे" म्हणजेच आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करून अनुदानाच्या रकमेचा लाभ जास्तीत जास्त लोकांना मिळून त्याचा कार्यक्षम रीतीने वापर करता आला.**

जन धन योजनेमुळे बँकेतील खातेधारकांना सर्व ठिकाणी आणि सहजगत्या पैसे काढता येऊ लागले. इतकेच नव्हे तर काही वेळा शिलकीपेक्षा जास्त पैसे काढण्याची सुविधाही उपलब्ध करून देण्यात आली.जन धन योजनेमुळे वंचित लोकसंख्येपर्यंत पत संस्कृती पोचवता येते असा योग्य आत्मविश्वास बँकांमध्ये निर्माण झाला. याचाच परिणाम ग्रामीण भागात मोठया प्रमाणावर पत पुरवठ्याच्या झालेल्या वाढीत दिसून आला. वर्ष २०१६मध्ये आधार कायदा हा पैसे/वित्त विधेयक (मनी बिल ) म्हणून जाहीर करण्यात आला.या कायद्यामुळे आर्थिक आणि इतर प्रकारचे अनुदान,लाभ आणि सेवा यांच्या लक्ष्याधारित वितरणाची हमी मिळाली.या कायद्यामुळे आधार अर्थात विशेष ओळख क्रमांक (यू.आय.डी.)प्रकल्पाला कायदेशीर पाठिंबा मिळाला.यामुळे अनुदान,लाभ आणि सेवांचे कार्यक्षम,पारदर्शक आणि लक्ष्याधारित वितरण करणे सोपे झाले. यासाठी भारताचा जो एकत्रित निधी आहे त्यातून वैयक्तिकरित्या आधार ओळख क्रमांकाची पडताळणी करून ज्या कारणासाठी आधार क्रमांकाची जोडणी करण्यात आली त्याचे लाभ लाभार्थीला देण्यासाठी हा खर्च करण्यात आला.

सरकारने या सुधारणांच्या संदर्भातील तिसरे पाऊल उचलले २०१६ मध्ये, भीम (भारत इंटरफेस फॉर मनी) नावाचे ॲप सुरू करून भारतीय राष्ट्रीय देयके महामंडळाने हे मोबाइल ॲप्लिकेशन विकसित केले आहे. यामध्ये एकसंध देयके देण्याची (युनिफाईड पेमेंट इंटरफेस) सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. भीम ॲप्लिकेशनमुळे बँकेतून थेट इ-पेमेंट करता येते. त्यामुळे ते वापरणाऱ्याला रोखरहित व्यवहार करण्याची प्रेरणा मिळते. याशिवाय कोणत्याही दोन खात्यांमध्ये त्वरित व्यवहार होऊन पैसे हस्तांतरित होतात. सर्व प्रकारच्या मोबाईल उपकरणांवर ही सुविधा उपलब्ध होऊ शकते. जन धन योजना- आधार कायदा आणि भीम ॲप्लिकेशन या तिन्ही सुधारणा एकत्रितपणे झाल्याने सरकारचे कामकाज पारदर्शी होण्यास मदत झाली आणि लाभार्थीला त्याचे अनुदान थेट त्याच्या खात्यात वेळेवर मिळू लागले. ही निश्चितच परिणामकारक बाब आहे.जाम[JAM – योजनांची इंग्रजी आद्याक्षरे] म्हणजेच जन धन-आधार-मोबाइल या त्रिमूर्ती तंत्रज्ञानामुळे युनिफाईड पेमेंट इंटरफेसच्या सहाय्याने मोबाइल बँकिंग व्यवहार करणे इ मेल पाठवण्याइतके सोपे झाले आहे. मुख्य प्रवाहातील बँकिंग क्षेत्रात आता आर्थिक व्यवहार करण्यासाठी नॅशनल इलेक्ट्रॉनिक्स ट्रान्सफर ऑफ फंड्स (NEFT), रियल टाइम ग्रॉस सेटलमेंटस्(RTGS), इमिजिएट पेमेंट सर्व्हिस(IMPS) आणि इलेक्ट्रॉनिक क्लिअरिंग सिस्टिम(ECS) यांचा वापर मोठया प्रमाणावर केला जात आहे.

---

**भीम ॲप्लिकेशनमुळे बँकेतून थेट इ-पेमेंट करता येते. त्यामुळे ते वापरणाऱ्याला रोखरहित व्यवहार करण्याची प्रेरणा मिळते. याशिवाय कोणत्याही दोन खात्यांमध्ये त्वरित व्यवहार होऊन पैसे हस्तांतरित होतात. सर्व प्रकारच्या मोबाईल उपकरणांवर ही सुविधा उपलब्ध होऊ शकते. जन धन योजना- आधार कायदा आणि भीम ॲप्लिकेशन या तिन्ही सुधारणा एकत्रितपणे झाल्याने सरकारचे कामकाज पारदर्शी होण्यास मदत झाली आणि लाभार्थीला त्याचे अनुदान थेट त्याच्या खात्यात वेळेवर मिळू लागले.**

---

### प्रतिबंधात्मक दक्षतेवर मुख्य भर

केंद्रीय दक्षता आयोग कसे आणि केव्हा सुरु झाले याचा जर आपण शोध घेतला तर त्याचे मूळ आपल्याला एका समितीमध्ये सापडेल.खासदार श्री.के.संथानम यांच्या नेतृत्वाखाली भ्रष्टाचार प्रतिबंध ही समिति नेमण्यात आली होती.या समितीने केलेल्या शिफारशींनुसार केंद्रीय दक्षता आयोगाची स्थापना झाली. संथानम समितीने भ्रष्टाचाराची चार मुख्य कारणे आहेत असे स्पष्ट केले आहे. यामध्ये प्रशासकीय दिरंगाई, नियामक कामकाजाव्यतिरिक्त सरकारने स्वत:कडे पेलवणार नाहीत इतक्या जबाबदाऱ्या घेतल्यामुळे त्याचे योग्य व्यवस्थापन करू न शकणे, सार्वजनिक सेवक अर्थात सरकारी कर्मचारी त्यांच्या अधिकारांचा वापर करताना कामाच्या योग्यायोग्यतेची ते ठरवत असलेली व्याप्ती आणि अवजड, अवघड कार्यपद्धती,यांचा समावेश आहे.समितीच्या शिफारशीनंतर केंद्र सरकारच्या एका ठरावानुसार १९६४ मध्ये केंद्रीय दक्षता आयोग या शिखर संस्थेची स्थापना करण्यात आली.केंद्र सरकारच्या संस्थांमधील भ्रष्टाचाराला प्रतिबंध करणे हा या आयोगाचा मुख्य उद्देश आहे.सर्वोच्च न्यायालयाने जैन हवाला प्रकरणामध्ये दिलेल्या निर्देशानुसार १९९७मध्ये दक्षता आयोगाला वैधानिक दर्जा देण्यात आला.१९८८च्या भ्रष्टाचार कायद्यानुसार ज्या सरकारी सेवकांवर किंवा महामंडळांवर गुन्हे केल्याचे आरोप ठेवण्यात आले आहेत अशा प्रकरणांच्या चौकशीचे किंवा चौकशी पथक नेमण्याचे अधिकार केंद्रीय दक्षता आयोगाला देण्यात आले आहेत.हे अधिकार १९८८च्या केंद्रीय दक्षता आयोग कायदयानुसार देण्यात आले आहेत.

सार्वजनिक प्रशासनात पारदर्शकता,वस्तुनिष्ठता आणि विश्वासार्हता आणणे सुनिश्चित करण्याचे काम केंद्रीय दक्षता आयोग करते. आयोगाने अनेक प्रतिबंधात्मक दक्षता उपाययोजना सुरू केल्या आहेत.सार्वजनिक खरेदीमध्ये सुधारणा घडून यावी आणि हे व्यवहार अधिक विश्वासार्ह आणि सचोटीने व्हावेत यासाठी

सरकारी इ- बाजारपेठ पद्धत सुरू करण्यात आली. यामध्ये इ-निविदा आणि इ-खरेदी करण्यासाठी

**१९६४ मध्ये केंद्रीय दक्षता आयोग या शिखर संस्थेची स्थापना करण्यात आली. केंद्र सरकारच्या संस्थांमधील भ्रष्टाचाराला प्रतिबंध करणे हा या आयोगाचा मुख्य उद्देश आहे.सर्वोच्च न्यायालयाने जैन हवाला प्रकरणामध्ये दिलेल्या निर्देशानुसार १९९७मध्ये दक्षता आयोगाला वैधानिक दर्जा देण्यात आला.१९८८च्या भ्रष्टाचार कायद्यानुसार ज्या सरकारी सेवकांवर किंवा महामंडळांवर गुन्हे केल्याचे आरोप ठेवण्यात आले आहेत अशा प्रकरणांच्या चौकशीचे किंवा चौकशी पथक नेमण्याचे अधिकार केंद्रीय दक्षता आयोगाला देण्यात आले आहेत.**

प्रोत्साहन दिले जाते.त्याचबरोबर विद्यार्थी आणि मुलांमध्ये शिक्षणाद्वारे नीतीतत्वे रुजवणे,दक्षता जागृती सप्ताह साजरे करणे,सरकारी कर्मचाऱ्यांची अरेरावी आणि हस्तक्षेप टाळण्यासाठी कार्यपद्धतीचे सुलभीकरण करणे,प्रशिक्षण आणि कौशल्यविकासावर भर देणे इत्यादींचा समावेश आहे.इतकेच नव्हे तर कामकाजात अडथळे आणण्यासाठी कोणी गैरवर्तणूक केली असे सिद्ध झाल्यास जरब बसवील अशी शिक्षा त्याला सुनावली जाते.भ्रष्टाचाराविरुद्धची ही चळवळ लोकचळवळ व्हावी या उद्देशाने केंद्रीय दक्षता आयोगाने नागरिक आणि संस्था-संघटना यांच्यासाठी स्वेच्छेने इ-प्रतिज्ञा घेण्याची पद्धत सुरू केली आहे.पारदर्शी,कार्यक्षम आणि नागरिककेंद्री प्रशासन सक्षम करण्यासाठी,संस्था-संघटनांसाठी सत्यनिष्ठा आणि सचोटीचा निर्देशांक विकसित करण्यात आला आहे.

### लेखापरीक्षण कार्यपद्धती सामर्थ्यवान करताना

भारताचे नियंत्रक आणि महालेखापरीक्षक ही भ्रष्टाचाराविरुद्ध लढणारी एक महत्त्वाची संस्था आहे.वर्ष २०१४ पासून नियंत्रक आणि महालेखापरीक्षक कार्यालयाने संस्थेमध्ये सुशासन आणण्यासाठी,संस्थेच्या लेखा आणि लेखापरीक्षणासाठी सरकारच्या आर्थिक सुधारणांचा स्वीकार केला. आर्थिक सुधारणांपैकी सर्वात मोठा बदल झाला तो म्हणजे देशात सर्वसाधारण आणि रेल्वे अर्थसंकल्प एकत्रितपणे सादर करण्यात आला. याशिवाय योजना आणि योजनाबाह्य खर्चाचे विलीनीकरण करण्यात आले.थेट परकीय गुंतवणुकीसाठी अनेक क्षेत्रे खुली करण्यात आली. देशात वस्तू आणि सेवा करपद्धती लागू करण्यात आली.सरकारच्या त्रिस्तरीय शासन पद्धतीमध्ये शहरी स्थानिक संस्था आणि पंचायत राज्य संस्था दरवर्षी सुमारे १४लाख कोटी रुपयांचे उत्पन्न मिळवतात. मात्र कामकाजाच्या पद्धतीत हलगर्जीपणा,कमकुवत आर्थिक व्यवस्थापन आणि विश्वासार्हतेची कमतरता आदी दोषांनी ते त्रस्त आहेत. या शहरी आणि ग्रामीण स्थानिक संस्था,त्यांची संख्या,भौगोलिकदृष्ट्या त्यांचा झालेला विस्तार आणि त्यांच्याकडे असलेल्या उत्पन्नांच्या स्रोतातून त्यांच्याकडे येणारा पैशाचा प्रचंड ओघ.यामुळे नियंत्रक आणि महालेखापरीक्षकांना या संस्थांचे लेखापरीक्षण ही गंभीर बाब वाटली. भौतिकतेच्या आणि त्यात असलेल्या जोखमीच्या संदर्भात त्याचा विचार व्हायला हवा असे मत त्यांनी मांडले.महसूल अर्थव्यवस्थेतील हे

**आर्थिक सुधारणांपैकी सर्वात मोठा बदल झाला तो म्हणजे देशात सर्वसाधारण आणि रेल्वे अर्थसंकल्प एकत्रितपणे सादर करण्यात आला.याशिवाय योजना आणि योजनाबाह्य खर्चाचे विलीनीकरण करण्यात आले. थेट परकीय गुंतवणुकीसाठी अनेक क्षेत्रे खुली करण्यात आली. देशात वस्तू आणि सेवा करपद्धती लागू करण्यात आली.**

बदलते प्रवाह,काळा बाजार आणि बेकायदेशीर व्यवहार (सावली/पर्यायी/समांतर अर्थव्यवस्था)(शॅडो इकॉनॉमी) यांनी उभी केलेली आव्हाने,काळा पैसा,हस्तांतर किंमत ठरवणे,निवास हुंडी(बिल्स) इत्यादी सर्व गंभीर प्रश्नांची दखल नियंत्रक आणि महालेखापरीक्षकांनी घेतली आहे.त्याचप्रमाणे कर भरणे,मूल्यांकन,आणि वसुली या सर्वच प्रक्रिया आता स्वयंचलित झाल्याने प्रचंड प्रमाणावर डिजिटल

माहिती निर्माण होत आहे,या सर्व माहितीचे योग्य व्यवस्थापन करणे हे ही एक मोठे आव्हान आहे.

**सरकारी कामकाजात पारदर्शकता**

भारतीय लोकशाहीची मुळे आणखी घट्ट करणारा एक नवा कायदा २००५मध्ये आला,त्याचे नाव - माहिती अधिकार कायदा(आर.टी.आय.). हा अधिकारावर आधारित कायदा आहे. या कायद्यामुळे देशाच्या प्रशासनात नागरिकांचे स्थान चिरकाल टिकणारे झाले आहे.माहिती अधिकार कायद्याच्या अंमलबजावणीमुळे नागरिकांना केवळ जाणून घ्यायचा अधिकार मिळाला आहे असे नव्हे तर यामुळे त्यांना प्रश्न विचारण्याचा अधिकारही मिळाला आहे, असे पंतप्रधानांनी सांगितले.माहिती मिळवण्याची ही प्रक्रिया पारदर्शी, कालबद्ध आणि त्रासविरहीत असावी अशी तरतूद या कायद्यामध्ये आहे.

**भ्रष्टाचार प्रतिबंध कायद्याने गुन्हेगारी गैरवर्तणुकीच्या व्याख्येत बदल केला आहे. त्यानुसार स्वत:च्या उत्पन्नापेक्षा जास्त बेहिशेबी मालमत्ता मिळवण्याच्या हेतूने केलेली गैरवर्तणूक सिद्ध होणे आणि तसे झाल्यास ती मालमत्ता ताब्यात घेणे अशी तरतूद करण्यात आली आहे.अशा प्रकारे बेहिशेबी मालमत्ता मिळवण्याच्या गुन्ह्याला प्रतिबंध करण्यात आला आहे.**

या कायद्याच्या दशकभराच्या अंमलबजावणीनंतर देशभरात त्याची ताकद आणि उपयुक्तता नागरिकांना जाणवू लागली आहे. या कायद्यामुळे सरकारी कामकाजातही अनेक सुधारणा घडून येण्यास मदत झाली आहे.सरकारकडून माहिती मिळू लागल्यामुळे देशाचे नागरिक आता निर्णय घेण्याच्या प्रक्रियेचा एक भाग झाले आहेत.त्यामुळे सरकार आणि नागरिक यांच्यात एक विश्वासाचे नाते निर्माण झाले आहे.

**वर्ष २०१३ चा लोकपाल आणि लोकायुक्त कायदा**

वर्ष २००३ च्या केंद्रीय दक्षता आयोग कायद्यामधील काही तरततुदींमध्ये दुरुस्ती करून २०१३मध्ये लोकपाल आणि लोकायुक्त कायदा करण्यात आला. २००३च्या कायदयानुसार लोकपालाने संदर्भ दिलेल्या आणि नोंदवलेल्या ब,क आणि ड गटातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांबद्दलच्या तक्रारींची दखल घेऊन त्यांची प्राथमिक चौकशी करण्याचे अधिकार केंद्रीय दक्षता आयोगाला होते.याशिवाय अ वर्गातील अधिकाऱ्यांची चौकशी करण्याकरता आयोगान्तर्गत चौकशी संचालनालय उभारण्यात येईल अशी तरतूद होती.लोकपालांनी संदर्भ दिलेल्या प्रकरणांमध्ये वर्ग अ आणि ब गटातील अधिकाऱ्यांचा प्राथमिक चौकशी अहवाल आयोगाने लोकपालांकडेच पाठवणे आवश्यक असते.तसेच वर्ग क आणि ड कर्मचाऱ्यांच्या चौकशीच्या सूचना लोकपालांकडून आल्या असतील तर त्याबाबत पुढील तपास करण्याचे आणि त्यांच्यावर पुढे कोणती कारवाई करायची याचे अधिकार दक्षता आयोगाला देण्यात आले आहेत.

**१९८८च्या भ्रष्टाचार प्रतिबंध कायद्यामध्ये दुरुस्ती करताना**

भ्रष्टाचाराला प्रतिबंध करणाऱ्या कायद्याशी संबंध असलेल्या कायद्यामध्ये एकसंधपणा आणून आणि त्यामध्ये दुरुस्ती करून भ्रष्टाचार प्रतिबंध कायदा करण्यात आला.कायदेशीर कामकाजासाठी जे कायदेशीर वेतन ठरवून दिले आहे त्याच्या व्यतिरिक्त अधिक मानधन लाच म्हणून घेणाऱ्यांना या कायदयानुसार शिक्षा करता येते. याविषयी तपास करण्याचे अधिकार केंद्रीयअन्वेषणविभाग(सी.बी.आय.) आणि राज्याच्या पोलीस विभागाला देण्यात आले आहेत.सार्वजनिक क्षेत्रात सेवा देणाऱ्या सरकारी कर्मचाऱ्यांसाठी विश्वासार्हतेची मानके वास्तववादी ठेवायला हवीत म्हणजे ते प्रामाणिकपणे निर्णय घेताना कचरणार नाहीत,असे सरकारने नमूद केले आहे. भ्रष्टाचार प्रतिबंध कायद्याने गुन्हेगारी गैरवर्तणुकीच्या व्याख्येत बदल केला आहे.त्यानुसार स्वत:च्या उत्पन्नापेक्षा जास्त बेहिशेबी मालमत्ता मिळवण्याच्या हेतूने केलेली गैरवर्तणूक सिद्ध होणे आणि तसे झाल्यास ती मालमत्ता ताब्यात घेणे अशी तरतूद करण्यात आली आहे.अशा प्रकारे बेहिशेबी

मालमत्ता मिळवण्याच्या गुन्ह्याला प्रतिबंध करण्यात आला आहे.

**लोकसभेने डिसेंबर,२०११ मध्ये ''व्हिसल ब्लोअर्स प्रोटेक्शन बिल, २०११'' म्हणून मंजूर केले. राज्यसभेत ते फेब्रुवारी,२०१४मध्ये मंजूर झाले.९मे,२०१४ रोजी त्याला राष्ट्रपतींची मान्यता मिळाली. त्यानंतर २०१५ मध्ये या कायद्यात २१ दुरुस्त्या करण्यात आल्या. त्यानुसार अशी प्रकरणे उघडकीस आणणाऱ्यांना संरक्षण देत असतानाच पूर्वग्रहदूषितपणे देशाच्या सार्वभौमत्व आणि एकात्मतेला तसेच सुरक्षेला धोका पोचू नये म्हणून काही नव्या आवश्यक तरतुदींचा या कायद्यात समावेश करण्यात आला.**

## भ्रष्टाचारविरुद्ध आवाज उठवणाऱ्यांना अधिक संरक्षण देताना

देशात भ्रष्टाचाराविरुद्ध आवाज उठवण्याचा प्रयत्न अनेकजण करत असतात.एका अर्थाने ते समाजात जागृती घडवत असतात म्हणून त्यांना 'जागल्या' असेही म्हणता येईल.वाईट प्रवृत्तींविरुद्ध आवाज उठवून ते समाजाचे लक्ष वेधून घेतात म्हणून त्यांना 'ध्यानाकर्षक' म्हणूनही ओळखले जाते.अशा लोकांना कायदेशीर संरक्षण देण्यासाठी एक विधेयक,२०११ लोकसभेत ऑगस्ट,२०१०मध्ये मांडण्यात आले.सार्वजनिक हिताच्या बाबींचे प्रकटीकरण आणि अशी प्रकरणे उघडकीस आणणाऱ्यांना संरक्षण देणे असे या विधेयकाचे स्वरूप आहे. ते लोकसभेने डिसेंबर,२०११ मध्ये ''व्हिसल ब्लोअर्स प्रोटेक्शन बिल, २०११'' म्हणून मंजूर केले. राज्यसभेत ते फेब्रुवारी,२०१४मध्ये मंजूर झाले.९मे,२०१४ रोजी त्याला राष्ट्रपतींची मान्यता मिळाली. त्यानंतर २०१५ मध्ये या कायद्यात २१ दुरुस्त्या करण्यात आल्या. त्यानुसार अशी प्रकरणे उघडकीस आणणाऱ्यांना संरक्षण देत असतानाच पूर्वग्रहदूषितपणे देशाच्या सार्वभौमत्व आणि एकात्मतेला तसेच सुरक्षेला धोका पोचू नये म्हणून काही नव्या आवश्यक तरतुदींचा या कायद्यात समावेश करण्यात आला.राष्ट्रीय सुरक्षेबाबतच्या काही मुद्द्यांचा परामर्श या दुरुस्त्यांमध्ये घेण्यात आला. पूर्वग्रहदूषितपणे देशाच्या सार्वभौमत्व आणि एकात्मतेला धोका पोचू नये आणि प्रकरणे उघडकीस आणणाऱ्यांनाही संरक्षण मिळावे हा या दुरुस्त्या करण्यामागील मुख्य उद्देश होता.

## बेनामी व्यवहारांना सुरुंग

बेनामी व्यवहार(प्रतिबंध) कायदा,१९८८ हा कायदा कायद्याच्या पुस्तकात गेली २८वर्षे अस्तित्वात असला तरी त्याच्या निर्मितीपासूनच त्यामध्ये काही उणीवा राहिल्याने त्याचा प्रत्यक्षात वापर करता येऊ शकला नाही. बेनामी व्यवहारांना प्रभावीपणे आळा घालण्याच्या उद्देशाने या कायद्यामध्ये दुरुस्ती करून बेनामी व्यवहार प्रतिबंध सुधारित कायदा,२०१६ करण्यात आला.सुधारित कायदयानुसार प्राप्तिकर अधिकाऱ्यांना बेनामी मालमत्ता तात्पुरती ताब्यात घेण्याचे व अखेरीस ती जप्त करण्याचे अधिकार देण्यात आले आहेत. याशिवाय, सक्षम न्यायालयाकडून एखादी व्यक्ती बेनामी व्यवहारात दोषी असल्याचे सिद्ध झाले तर त्या व्यक्तीला एक ते सात वर्षांपर्यंत कठोर कारावासाची शिक्षा होऊ शकते.तसेच त्या व्यक्तीला त्या मालमत्तेची बाजारपेठेत सध्याची जी रास्त किंमत असेल त्यानुसार दंड भरावा लागतो.दंडाची ही रक्कम २५ टक्क्यांपर्यंत वाढू शकते.बेनामी व्यवहार (प्रतिबंध) सुधारित कायदा,२०१६, एक नोव्हेंबर,२०१६पासून लागू करण्यात आला.या सुधारित कायद्याची अंमलबजावणी सुरु झाल्यानंतर अनेक बेनामी व्यवहाराची प्रकरणे उघडकीस आली आहेत.

या लेखाचा समारोप करताना शेवटी एवढेच म्हणावेसे वाटते की,भारताचा भ्रष्टाचार आणि काळ्या पैशाविरुद्धचा हा लढा चालूच राहणार.स्मार्ट शासन हे लक्ष्य ठेवून केलेल्या या प्रयत्नांचे सकारात्मक परिणाम दिसून येत आहेत

■■■

*लेखक भारतीय प्रशासकीय सेवेतील १९८९च्या तुकडीतील अधिकारी आहेत. सध्या ते राजस्थान कर मंडळाचे अध्यक्ष असून राजस्थान महसूल मंडळाच्या अध्यक्षपदाचा अतिरिक्त कार्यभारही त्यांच्याकडे आहे.*

*email: vsrinivas@nic.in*

विवेचन

# नवभारतातील कौशल्य व उद्योजकता विकास

**-डॉ. अमितकुमार द्विवेदी, सारवणा वेलूस्वामी**

**एकूण राष्ट्रीय उत्पन्नात सेवा क्षेत्राचा मोठा वाटा असून त्याखालोखाल उद्योग व कृषी क्षेत्राचा वाटा आहे. देशातील निम्मे लोक स्वयंरोजगारात असून त्यातील ९३ टक्के असंघटित क्षेत्रात आहेत. भारतात काम करण्याच्या वयातील लोकांची संख्या ही २०२० पर्यंत १७० दशलक्ष होणार असून हे गृहितक सध्याच्या लोकसंख्या वाढीच्या वेगावर आधारित आहे. त्याचबरोबर शिक्षण पूर्ण करणाऱ्यांची संख्या वाढत आहे.**

भारतीय अर्थव्यवस्था ही जगातील एक मोठी आर्थिक व्यवस्था आहे त्यात आर्थिक विकास दर गेली दोन दशके तरी ७ टक्के होता. विकसनशील देशात नवीन औद्योगिक अर्थव्यवस्था म्हणून भारत ओळखला जातो. आपल्या देशाची लोकसंख्या मोठी असल्याने अजून तरी या आर्थिक प्रगतीचे लाभ समाजात सगळीकडे पोहोचलेले नाहीत. औद्योगिक उत्पादन, शहरीकरण व ग्रामीण भागातून शहरी भागात स्थलांतर या पार्श्वभूमीवर विकास चालू आहे. एकूण राष्ट्रीय उत्पन्नात सेवा क्षेत्राचा मोठा वाटा असून त्याखालोखाल उद्योग व कृषी क्षेत्राचा वाटा आहे. देशातील निम्मे लोक स्वयंरोजगारात असून त्यातील ९३ टक्के असंघटित क्षेत्रात आहेत. भारतात काम करण्याच्या वयातील लोकांची संख्या ही २०२० पर्यंत १७० दशलक्ष होणार असून हे गृहितक सध्याच्या लोकसंख्या वाढीच्या वेगावर आधारित आहे. त्याचबरोबर शिक्षण पूर्ण करणाऱ्यांची संख्या वाढत आहे. असे असोचेमच्या अभ्यासात म्हटले आहे. त्यामुळे आपण आतापासून तरूणाना प्रशिक्षण दिले नाही तर आपण तरूण मनुष्यबळाचा योग्य प्रकारे वापर करू शकणार नाही. रोजगार संधींची निर्मिती व रोजगारक्षम तरूणांची वाढती संख्या यांचा मेळ घातला पाहिजे.

कौशल्य अभाव- दर्जेदार शिक्षणाच्या अभावी तरूणांमध्ये रोजगाराची कमतरता आहे.त्यामुळे त्यांना रोजगार मिळत नाही. रोजगार संधी मर्यादित असल्याने रोजगार बाजारपेठेत स्पर्धा वाढली आहे. व्यावसायिक शिक्षण व कौशल्य प्रशिक्षणासाठी अकुशल मनुष्यबळ वाढत आहे. त्यामुळे ते असुरक्षित वातावरणात काम करीत आहेत. शाळा व महाविद्यालयातून विद्यार्थी गळतीचे प्रमाण वाढले असून त्याला उद्यमशील प्रेरणांच्या अभावाची जोड आहे त्यामुळे तरूणांमध्ये बेरोजगारी वाढत आहे. देशात रोजगार निर्मिती वाढवून उद्यमशीलतेला प्रेरणा देण्याचे वचन सरकारने दिले आहे. अर्थसंकल्प मांडताना अर्थमंत्री अरूण जेटली यांनी सांगितले होते की, शिक्षण, कौशल्ये व नोकऱ्या यांच्या माध्यमातून तरूणांना बळ दिले जाईल. पण सध्या रोजगार वाढ थंडावली आहे. तसेच त्यासाठी केले जाणारे प्रयत्न निष्फळ ठरणार आहेत. एकूण कामगारांपैकी १० टक्के लोकांना कौशल्य प्रशिक्षण मिळत आहे, असे 'अर्नेस्ट अँड यंग'

अहवालात म्हटले आहे. सध्याच्या प्रशिक्षण, दर्जा नियंत्रण व संबंधित यंत्रणांची क्षमता सुधारणे , संस्थात्मक यंत्रणा व अर्थपुरवठा या सुविधा देणे ही कौशल्य विकासातील खरी आव्हाने आहेत, असे या अहवालात म्हटले आहे.

**एकूण कामगारांपैकी १० टक्के लोकांना कौशल्य प्रशिक्षण मिळत आहे, असे 'अर्नेस्ट अँड यंग' अहवालात म्हटले आहे. सध्याच्या प्रशिक्षण, दर्जा नियंत्रण व संबंधित यंत्रणांची क्षमता सुधारणे , संस्थात्मक यंत्रणा व अर्थपुरवठा या सुविधा देणे ही कौशल्य विकासातील खरी आव्हाने आहेत, असे या अहवालात म्हटले आहे.**

### रोजगारक्षम मनुष्यबळ

असोचेम व टीस यांच्या अभ्यासानुसार भारताने पेटंट व नवउद्योगांमध्ये फारशी चमकदार कामगिरी केलेली नाही. राज्य व केंद्रीय विद्यापीठे यांना निधीची कमतरता आहे. त्यामुळे ते उद्यमशीलतेला उत्तेजन देऊ शकत नाहीत त्याचबरोबर संशोधन पायाभूत सुविधा निर्माण करू शकत नाहीत. असेही अहवालात म्हटले आहे. देशात उद्यमशीलता वाढवण्यासाठी कौशल्य निर्मिती करणे आवश्यक आहे. मागणी व पुरवठा यातील तफावत दूर करणे, प्रशिक्षण कार्यक्रम चालू ठेवणे, चांगले प्रशिक्षक नेमणे, प्रशिक्षणासाठी पायाभूत सुविधा निर्माण करणे यासाठी सरकारने प्रयत्न करणे आवश्यक आहे. या अहवालात

| मनुष्यबळ | कौशल्य प्रशिक्षण देण्याची आवश्यकता असलेल्यांची संख्या |
|---|---|
| १. नवीन (प्रथम कामगार) | दरवर्षी १२.८ दशलक्ष |
| २. संघटित कामगार क्षेत्र | २६ दशलक्ष |
| ३. असंघटित कामगार क्षेत्र | ४३३ दशलक्ष |
| ४. २०२२ पर्यंत कौशल्यक्षम कामगारांचे लक्ष्य | ५०० दशलक्ष |
| ५. एनएसडीसीची सध्याची क्षमता | दरवर्षी ३.१ दशलक्ष |

★ आकडे २००४-०५ स्त्रोत- कौशल्य विकासाचे २०१५ मधील धोरण.

म्हटल्यानुसार व्यावसायिक शिक्षण तसेच कौशल्य विकासासाठी साधने जुळवणे आवश्यक आहे. रोजगारक्षम मनुष्यबळ तयार करण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे.

### कौशल्यपूर्ण भारत कार्यक्रम

कौशल्य व उद्यमशीलता विकास हे नवे मंत्रालय भारत सरकारने सुरू केले आहे. त्यात कामगारांचा दर्जा व रोजगार उपलब्धता हे मुद्दे हाताळणे अपेक्षित आहे. कौशल्य विकासाच्या राष्ट्रीय धोरणात तंत्रज्ञान प्रगती व कामगार बाजारपेठेच्या गरजांप्रमाणे कौशल्ये विकसित करण्याचा दृष्टिकोन आहे. त्यामुळे उत्पादनशीलता वाढून गरिबांचे राहणीमान सुधारण्याच्या दिशने स्पर्धात्मकता निर्माण होईल.

प्रधानमंत्री कौशल विकास योजना- या योजनेत युवकांना रोजगार मिळण्यासाठी कोणती कौशल्ये उपयुक्त आहेत हे शोधून काढून तसे रोजगार कौशल्य त्यांच्यात निर्माण केले जाईल. युवकांनी अर्जित केलेली कौशल्ये व ज्ञान यांना प्रमाणित करण्याची सोयही यात आहे. तुम्ही अनुभवातून काही कौशल्ये आत्मसात केली असतील तर त्यांनाही प्रमाणित करण्याची व्यवस्था यात आहे. त्याला 'रेकगनिशन प्रॉयर लर्निंग' असे म्हणतात. त्यात लघु मुदतीचे प्रशिक्षण कार्यक्रम पीएमकेव्हीवाय केंद्रात घेतले जातील. कौशल्यक्षम भारत कार्यक्रमात रोजगार बाजारपेठेत प्रवेश करणारे तरूण हे लक्ष्य असतील. त्यात संघटित व असंघटित क्षेत्रांचा समावेश आहे.

वरील सारणीवरून असे दिसते की,कौशल्यक्षम भारत हा महत्वांकाक्षी कार्यक्रम असून त्यामुळे विविध क्षेत्रातील कामगारांना वेगवेगळी कौशल्ये शिकवली जातील. त्यामुळे सर्व औद्योगिक क्षेत्रांसाठी कौशल्यपूर्ण कामगारांचा पुरवठा होऊ शकेल. पीएमकेव्हीवाय या योजनेची अंमलबजावणी कौशल्य विकास महामंडळाने सुरू केली आहे. इतर संस्था व संघटनांनाही विशेष क्षेत्रातील प्रशिक्षणासाठी प्रोत्साहन दिले जात आहे. त्यात उद्यमशीलता, अर्थपुरवठा सेवा, इतर कौशल्ये यांचे प्रशिक्षण दिले जाते. राष्ट्रीय उद्यमशीलता व लघु उद्योग विकास संस्था ही प्रशिक्षण, सल्लासेवा, संशोधन यात काम करते त्यातून उद्यमशीलतेला उत्तेजन दिले जाते. ही

संस्था उद्यमशीलता तसेच कौशल्य विकास कार्यक्रम, प्रशिक्षकांचे प्रशिक्षण इतर उद्यमशीलता विकास कार्यक्रम चालवते.

**उद्यमशीलता अनुकूल वातावरण-**

विद्यापीठे ही नवीन संकल्पनांची केंद्रे आहेत व तेथे विद्यार्थी उद्योजकांना प्रोत्साहन देण्यासाठी काम केले जाते. त्यातून नवोद्योग म्हणजे स्टार्ट अप सुरू होत आहेत. अनेक राज्य सरकारे आता द्वितीय स्तरावरील शहरे ही नव उद्यम प्रारूपातून

**आर्थिक प्रगतीसाठी सरकार उद्यमशीलतेला उत्तेजन देत आहे. आयसीडने केलेल्या अभ्यासानुसार ८७ टक्के मुले जीवनात कुठल्यातरी टप्प्यावर उद्योजक बनण्याचा विचार करीत होती तर त्यातील ९० टक्के मुले उद्यमशीलतेस पूर्ण संधी आहे असे मानणारे होते. कमकुवत गटातील मुलांमध्ये उद्योजक बनण्याची इच्छा अधिक होती.त्यांचे सधन कुटुंबातील मुलांपेक्षा प्रमाण ४९ टक्के होते.**

साकारणाऱ्या नव उद्योगांसाठी सक्षम होतील असे प्रयत्न करीत आहेत. कौशल्य व उद्यमशीलता विकास मंत्रालय आता त्यासाठी आवश्यक तज्ञ मार्गदर्शक, इनक्युबेटर्स यांची फळी तयार करीत असून इ हब यांचाही त्यात समावेश आहे. आर्थिक प्रगतीसाठी सरकार उद्यमशीलतेला उत्तेजन देत आहे. आयसीडने केलेल्या अभ्यासानुसार ८७ टक्के मुले जीवनात कुठल्यातरी टप्प्यावर उद्योजक बनण्याचा विचार करीत होती तर त्यातील ९० टक्के मुले उद्यमशीलतेस पूर्ण संधी आहे असे मानणारे होते. कमकुवत गटातील मुलांमध्ये उद्योजक बनण्याची इच्छा अधिक होती.त्यांचे सधन कुटुंबातील मुलांपेक्षा प्रमाण ४९ टक्के होते. (बिझीनेस स्टँडर्ड २०१३) त्यामुळे आपल्या युवकांमध्ये उद्यमशीलतेच्या इच्छेचे प्रमाण जास्त आहे यात शंका नाही. उद्योग करण्यास इच्छुक नवप्रवर्तनशील तरूणांमध्ये उद्यमशीलता हा गुण महत्वाचा आहे. आता अर्थव्यवस्थाही ज्ञानाधिष्ठित बनत आहे. आधुनिक रोजगारात नवीन कौशल्ये व दृष्टिकोनांना महत्व आहे. त्यामुळे भारतातील कौशल्य विकास व रोजगार प्रशिक्षण कार्यक्रमात प्रगत कौशल्ये व प्रगत कार्य दृष्टिकोनाचा समावेश होणे गरजेचे आहे. त्यातून स्पर्धात्मक मनुष्यबळाची निर्मिती होऊ शकते.

उद्यमशीलतेतून रोजगार कौशल्ये- उद्योजक हा अनेक अडचणी व आव्हानातून संधी व साधने शोधत असतो. त्यातून नवीन उत्पादने तयार होतात शिवाय समाजात एक नवीन व्यवस्था निर्माण होतानाच धोरणातही प्रगती होते.समाजाच्या भल्यासाठी प्रगत तंत्रज्ञान व नवकल्पनांचा वापर करण्यात उद्योजकांचा वाटा असतो. प्रेरणा व उद्यमशीलता अशा दोन गुणातून ते नेहमीच्या समस्या सोडवण्यासाठी सांघिक काम करीत असतात. नवीन उद्योग व नवीन संकल्पना मांडणे यासाठी अनेक कौशल्ये लागतात त्यातूनच हे नवउद्यमी स्पर्धात्मक जगात टिकून राहतात. उद्यमशीलतेसाठी केवळ तांत्रिक कौशल्येच लागतात असे नाही तर तो नवीन कौशल्य संच असतो.त्यात जनसंपर्क, संस्थात्मक बांधणी, संज्ञापन, करिअर घडण, व्यक्तीमत्व विकास यांचाही समावेश असतो. उद्योग क्षेत्रात पडताना संबंधित उमेदवारांना ज्ञान, कौशल्ये व दृष्टिकोन यांनी परिपूर्ण करणे आवश्यक असते. 'दी आंत्रप्रेन्युरशिप डेव्हलपमेंट इन्सिट्यूट ऑफ इंडिया' या संस्थेची स्थापना अहमदाबाद येथे त्याच उद्देशाने करण्यात आली आहे. केवळ युवकांचाच नव्हेतर मुलांचा आत्मविश्वास वाढवण्याचे काम ही संस्था करीत आहे. त्यात त्यांच्या उद्यमशीलतेच्या गुणास प्रोत्साहन दिले जाते. त्यामुळे मुलांना लहान वयापासून जोखमीची, सर्जनशील विचारांची, पेच व्यवस्थापनाची सवय लागते. त्यांचे संवाद कौशल्य सुधारते. यात खेळ व व्यायामातून सांघिक कामाचे धडे दिले जातात. भारतातील १५ लाख शाळांमधून ३१५ दशलक्ष विद्यार्थी शिकतात त्यामुळे भारतातील शालेय शिक्षण व्यवस्था जगात मोठी आहे. जर शाळेपासूनच या मुलांना उद्यमशीलता व क्रियाशीलतेचे धडे दिले तर त्याचा फायदा होतो. त्यातूनच उद्याचे रोजगार निर्माते तयार होणार आहेत.

**कौशल्यशीलता कार्यक्रम**

उद्यमशील व्यक्तींसाठी केवळ उद्योगाचीच कौशल्ये असून चालत नाहीत तर त्यात समूहात काम करणे, नेतृत्व करणे, भाषिक ज्ञान, व्यक्तीगत चांगल्या सवयी ही कौशल्येही असावी लागतात.उद्योग क्षेत्रात आवश्यक कौशल्ये आत्मसात करता येतात. त्यामुळे या उद्योग व्यवसायात यशस्वी होण्यासाठी नवउद्योग निर्मिती, कौशल्याधिष्ठित उद्योग प्रारूप, उद्योग आराखडा

तयारी, बाजारपेठ पाहणी, कागदपत्रे व पर्यायी योजना सादरीकरण, स्वदेशी नवकल्पना, माहिती तंत्रज्ञानाचा वापर, उद्योगातील अर्थशास्त्राचे ज्ञान हे सगळे आवश्यक असते. त्याचे प्रशिक्षण देताना विद्यार्थ्यांपासून तरूणांपर्यंत सर्वांसाठी कार्यशाळा आवश्यक आहेत.

कार्यशाळा
उद्योग विकास कार्यक्रमात मनुष्यबळाला प्रशिक्षण देणे.

पर्याय
बौद्धिक संपदा हक्क, व्यवसाय कायदे, कायदेशीर रचना व जाहिरात तसेच ब्रँडिंग

**कौशल्यकर्मी निर्मितीसाठी उपाय**

कौशल्य विकासात महिला व समलिंगी व्यक्तींना संधी देणे आवश्यक आहे. प्रादेशिक असमतोलाचा मुद्दाही यात आहे. वंचित जाती गट व समुदाय यांना कौशल्य विकासात प्राधान्य देऊन सर्वसमावेशकता आणली पाहिजे.

वंचित समुदायांमध्ये शिक्षण व कौशल्यांचा अभाव हा एक अडसर आहे. त्यामुळे जबाबदारी घेण्यासाठी आत्मविश्वास राहत नाही. महिलांमध्येही आत्मविश्वासाचा अभाव असतो.तो दूर करणे आवश्यक आहे. त्यासाठी उद्यमशीलतेला प्रेरणा देतानाच या उणिवाही दूर केल्या पाहिजेत.

विविध सेवातील प्रशिक्षण दिले तर विविध आर्थिक सामाजिक गटांना दैनंदिन जीवनात फायदा होईल. त्यासाठी त्यांना सोयीच्या वेळा व प्रशिक्षण भाषा ठेवल्या पाहिजेत. सामान्य मुलांना समजेल अशा भाषेत शिकवले पाहिजे. त्यांच्या सोयीच्या ठिकाणी प्रशिक्षण कार्यक्रम घेतले पाहिजेत.

तज्ञ व विद्वान यांनी उद्यमशीलता प्रशिक्षण व कौशल्य विकासात ऑनलाइन मूल्यमापन पद्धती विकसित केल्या पाहिजेत. प्रशिक्षण अभ्यासक्रम तयार केले पाहिजेत, त्यातून संबंधित प्रशिक्षण संस्थांना उद्यमशीलता विकसित करण्यात मदत होईल.व्यावसायिक शिक्षणासाठी आंतरराष्ट्रीय मानकांची यादी तयार करून प्रशिक्षण देणे जास्त महत्वाचे आहे. व्यावसायिक शिक्षण हे राष्ट्रीय कौशल्य पात्रता व्यवस्थेचा एक भाग असून त्यात सतत सुधारणांची गरज आहे. उद्योजकता विकास कार्यक्रमासाठीच्या प्रोत्साहन योजनांचा परिणाम तपासला पाहिजे. संस्थात्मक संवादासाठी अनुकूल वातावरण निर्माण होते की नाही याचा विचार केला पाहिजे. यात सहभागी भागीदार व संस्था यांचा एक संघच नवीन उद्योगांसाठी तयार केला पाहिजे. उद्योग व संस्था यांचे एकमेकांशी संबंध गरजेचे आहेत. कौशल्य विकास कार्यक्रमात उद्योगांचा सहभाग आवश्यक आहे. प्रशिक्षण कार्यक्रमांना वाव, उद्दिष्टे व मर्यादा यांचाही विचार केला पाहिजे. भौगोलिक व लोकसंख्यात्मक घटकांचा यात अंतर्भाव आहे.

निधीशी संबंधित रोजगार प्रशिक्षण कार्यक्रमांची आखणी करताना त्याचे नियम स्पष्ट असले पाहिजेत. निधी संलग्न प्रशिक्षण कार्यक्रमात उद्यमशीलतेला प्राधान्य हवे.

कौशल्यनिर्माते व उद्योजक यांना उपयोगी पडेल असे प्रशिक्षण असले पाहिजे.

**निष्कर्ष**

कौशल्याधिष्ठित उद्योग व नवोद्योग यासाठी जी मुले कौशल्यशीलता व उद्यमशीलता दाखवतील त्यांना उत्तेजन दिले पाहिजे. त्यांची उद्यम कौशल्ये वाढवून त्यांच्या नव उद्योग प्रारूपांना संकल्पनात्मक रूप देण्यास मदत केली पाहिजे. त्यांची जोखीम क्षमता वाढवतानाच त्यांना प्रारंभीच्या काळातील अडथळ्यांवर मात करण्यास शिकवले पाहिजे. शाळेपासूनच त्यांच्यात उद्योग प्रेरणा निर्माण केल्या पाहिजेत. उद्योजकता शाळा, व्यवस्थापन संस्था, इनक्युबेशन सेंटर, सरकार व इतर संस्थांनी उद्यमशीलतेस अनुकूल परिसंस्था तयार केली पाहिजे.नव भारतात सुधारणांसाठी बाजारपेठेवर प्रभाव टाकण्याची क्षमता या नव उद्यमींमध्ये असली पाहिजे.

■■■


*लेखक अमित द्विवेदी अहमदाबाद येथील भारतीय उद्योजकता विकास संस्था (EDII)येथे अध्यापनाचे काम करतात, तर वेलूस्वामी हे याच संस्थेत संशोधक सहाय्यक आहेत. email: akdwived@ ediindia.org*

*email : sarvanan@ediindia.org*

विचार

# जातीमुक्त भारताची निर्मिती

अमरजीत एस नारंग



**जातीवाद हा सामाजिक आणि राजकीय शक्ती म्हणून उदयास येत आहे. यामुळे सामाजिक तंटे वाढून स्थैर्य लोप पावत आहे, शांती आणि एकता नष्ट होत आहे, निवडणूक निकालांवर परिणाम होऊन कायदेमंडळ आणि कार्यकारी मंडळास बाधा पोहचत आहे. केवळ हिंदू धर्माशी निगडीतच ही समस्या नाही तर प्रत्येक भारतीय जसे शीख, मुस्लीम, जैन, बौद्ध, आणि काही प्रमाणात ख्रिश्चन धर्मातही जातीव्यवस्थेला स्थान आहे.**

जातीवाद हा भारताच्या सामाजिक-आर्थिक विकासातील तसेच एकात्मतेतील सर्वात मोठा सामाजिक अवगुण आहे. आपण जेंव्हा एकात्मिक, महान आणि विकसित भारताकडे पाहतो, तेंव्हा लक्षात येते की, जातीवाद हा सामाजिक आणि राजकीय शक्ती म्हणून उदयास येत आहे. यामुळे सामाजिक तंटे वाढून स्थैर्य लोप पावत आहे, शांती आणि एकता नष्ट होत आहे, निवडणूक निकालांवर परिणाम होऊन कायदेमंडळ आणि कार्यकारी मंडळास बाधा पोहचत आहे. केवळ हिंदू धर्माशी निगडीतच ही समस्या नाही तर प्रत्येक भारतीय जसे शीख, मुस्लीम, जैन, बौद्ध, आणि काही प्रमाणात ख्रिश्चन धर्मातही जातीव्यवस्थेला स्थान आहे. राजकर्ते, धोरणकर्ते यांच्यामध्ये जातीव्यवस्था हद्दपार करावी जेणेकरुन भारत स्वंयपूर्ण बनेल. आणि दारिद्र्य, निरक्षरता, रोगराई यापासून मुक्त होऊन जागतिक व्यवस्थेत मानाचे स्थान पटकावेल. मात्र, यासाठी सर्वप्रथम एक बाब महत्त्वाची आहे ती म्हणजे, जातीव्यवस्थेबद्दल असलेल्या काही गैरसमजूती आणि वाढता जातीवाद आणि सद्यस्थिती समजून घेणे आवश्यक आहे.

## जातीव्यवस्था

जातीव्यवस्थेच्या व्याख्येविषयी निरीक्षक आणि तज्ज्ञांमध्ये मतभेद दिसून येतात. पायाभूत विचार केला असता असे दिसून येते की, जातीव्यवस्था म्हणजे स्थान आणि वंशपरंपरेने येणारी वर्णनात्मक व्यवस्था. सामाजिक स्तरीकरण प्रणालीचा एक भाग आहे जो काही समुदायांमध्ये विशिष्ट प्रथा-परंपरांचे पालन केल्यामुळे दिसून येतो. काही काळापूर्वी जातीव्यवस्था वर्णव्यवस्थेशी जोडली होती. संशोधकांनी जातीव्यवस्थेचे मूळ दोन हजार वर्षांपूर्वीच्या आर्थिक, राजकीय प्रक्रीयेतून शोधले आहे. याबद्दल निश्चित तथ्य उपलब्ध नाही, मात्र सामाजिक-राजकीय आणि ऐतिहासिक नोंदीतून ही बाब अधोरेखीत होते. ब्रिटीश शासकापूर्वी जातीव्यवस्था ही पोकळ आणि तरल होती.

## वसाहतवादाच्या काळातील जातीव्यवस्था

जातीव्यवस्था हे वास्तव बऱ्याच काळापासून होते, मात्र ब्रिटीशांच्या काळात जातीव्यवस्था ही भारतीय समाजातील प्रमुख आधार बनली. १८७१ च्या पहिल्या दशवार्षिक

जनगणनेत याची सुरुवात झाली. जातींची माहिती गोळा करुन त्याची वर्गवारी करण्याचे काम सुरू झाले. जाती-उपजाती, यांची आकडेवारी (नंबर इन सेन्सस-नीरज जायल-२००६) पाहिल्यास लक्षात येते की, जातीची नोंदणी आकडेवारीनूसार ठेवण्याचे काम याविषयी कोठेही नोंद नाही. १९०१ आणि १९११ च्या जनगणनेनंतर जातीच्या वर्गवारीची नोंद ठेवण्यास सुरुवात झाली. त्यामुळे जातींची ओळख ठळकपणे जाणवू लागली. ब्रिटीशांनी फोडा आणि राज्य करा या धोरणाच्या माध्यमातून जातीव्यवस्थेचा वापर करण्यास सुरुवात केली. त्यांनी जातीशी संलग्नता ठळकपणे जाणवेल याचा प्रयत्न केला. सरकारी संस्थांमध्ये कामासाठी ठळकपणे जातीचा उल्लेख करण्यास सुरुवात केली. ठराविक जातींना ठराविक कामांसाठी प्राधान्य देण्यात येऊ लागले. जसे पोलीस आणि सैन्यदल, तर काही जातींना गुन्हेगार ठरवण्यात आले. जातीव्यवस्था समोर ठेवूनच काही कायद्यांची निर्मिती करण्यात आली. याचा ताबडतोब परिणाम म्हणजे, श्रीनिवास यांनी सांगितल्याप्रमाणे, जातीविषयी चेतना निर्माण झाली आणि जाती-अंतर्गत स्पर्धा निर्माण झाली. जातसमुदाय स्थापन करुन ब्रिटीशांकडून आपल्या मागण्या पदरात पाडून घेण्याचे काम सुरू झाले. जायल यांनी लिहिल्याप्रमाणे केवळ धार्मिक कार्ये नाही तर, राजकीय आणि राष्ट्रीय चळवळीतही जातव्यवस्थेचा प्रभाव ठळकपणे जाणवून लागला. राष्ट्रीय नेत्यांनी जातीसंघर्ष कमी करुन सामाजिक न्याय स्थापित करण्याचा प्रयत्न केला, मात्र, त्यांना फारसे यश मिळाले नाही.

**स्वतंत्र भारतातील जातीव्यवस्था**

आपण पाहिले की ब्रिटीश काळात जातीव्यवस्थेला सामूहिक स्वरुप प्राप्त झाले. स्वातंत्र्यावेळी काही समुदाय हे आपल्या चिंता आणि मागण्यांविषयी आग्रही होते. राज्यघटनेची निर्मिती करताना समता, न्याय, बंधूता आणि सामाजिकता याला प्राधान्य दिले.

**१९०१ आणि १९११ च्या जनगणनेनंतर जातीच्या वर्गवारीची नोंद ठेवण्यास सुरुवात झाली. त्यामुळे जातींची ओळख ठळकपणे जाणवू लागली. ब्रिटीशांनी फोडा आणि राज्य करा या धोरणाच्या माध्यमातून जातीव्यवस्थेचा वापर करण्यास सुरुवात केली. त्यांनी जातीशी संलग्नता ठळकपणे जाणवेल याचा प्रयत्न केला. सरकारी संस्थांमध्ये कामासाठी ठळकपणे जातीचा उल्लेख करण्यास सुरुवात केली. ठराविक जातींना ठराविक कामांसाठी प्राधान्य देण्यात येऊ लागले. जसे पोलीस आणि सैन्यदल, तर काही जातींना गुन्हेगार ठरवण्यात आले.**

राज्यघटनेने जातीव्यवस्था अमान्य केली, भेदभावाचे साधन म्हणून अमान्य केले, कोणत्याही धर्माचे अनुकूरण करण्यास परवानगी आणि अस्पृश्यता पाळण्यास बंदी घातली. समता, न्याय आणि स्वातंत्र्य ही पायाभूत तत्त्वे मान्य करण्यात आली. तर, अनुसूचीत जाती, अनुसूचीत जमाती आणि इतर मागासवर्ग यांतील जून्या प्रथा-परंपरा नष्ट करुन त्यांच्या उन्नतीसाठी राज्यघटनेत तरतूद आली. ठराविक काळात सामाजिक-आर्थिक विकास वाढीस लागेल, ही त्यावेळी अपेक्षा होती.

स्वातंत्र्याच्या सात दशकानंतर आपण पाहतो की, सामाजिक आणि आर्थिक क्षेत्रात जातीव्यवस्थेचा प्रभाव कमी होत आहे मात्र राजकीय क्षेत्रात वाढताना आणि आपले वर्चस्व प्रस्थापित करताना दिसून येत आहे. जातीआधारीत संघटना, जातींमुळे वाढते ध्रुवीकरण, हिंसा आणि आरक्षणाचा वाद वाढत आहे. देशाच्या राजकीय-आर्थिक बाबीत जात ही ठळकपणे दिसून येत आहे. लोकशाही समजावून सांगताना निरक्षरांना ठळकपणे पटवून देण्याची गरज आहे की, आर्थिक कार्यक्रम आणि राजकारण याचा जातीशी संबंध नाही.

**जातीवाद**

जातीवाद म्हणजे ठराविक समुदायाची प्रवृत्ती. तसेच ती राजकीय निष्ठेची विचारसरणी बनत आहे, यामुळे अंधपणे गट तयार होत आहेत. प्रसंगी यामुळे जाती-जातींमध्ये तेढ निर्माण होत आहे. काही ठराविक राजकीय गट याचा लाभ घेत आहेत. आपल्या मागण्या पदरात पाडून घेण्यासाठी जातींचे दबावगट कार्यरत आहेत. याचा मुख्य मुद्दा म्हणजे आरक्षण या संकल्पनेला काहींचे समर्थन तर काहींचा विरोध.

### निर्मूलनाची आवश्यकता

आपण पाहिले की, जातीवाद आपल्या समाजाचा सामाजिक-आर्थिक आणि राजकीय सलोखा बिघडवण्याचे काम करत आहे. असे असले तरी सामाजिक स्तरावर जात ही हळूहळू नष्ट होत आहे. कट्टर धार्मिक परंपरा सोडून दिल्या जात आहेत. समूह भोजन आणि आंतरजातीय विवाहांसाठी किमान शहरी भागात आता पूर्वीएवढी नकारात्मक भावना संपली आहे. उलट उच्च शिक्षित लोक आणि काही शैक्षणिक संस्थांमध्ये जात हा मुद्दा वगळण्यात आला आहे. तसेच गेल्या काही वर्षातील सकारात्मक बाब म्हणजे, गेल्या काही लोकसभा निवडणुकांपासून जात हा मुद्दा मागे पडला आहे. राजकीय पक्षही आता विकास, भ्रष्टाचार, कामगिरी यावर बोलताना दिसत आहेत. तरीसुद्धा अजून काही पक्ष आणि गट असे आहेत की, त्यांना जातीचा आधार महत्त्वाचा वाटत आहे. राजकीय क्षेत्रात विकास, भ्रष्टाचार हे मुद्दे असले तरी त्याचे प्रमाण कमी आहे, त्यामुळे जातीचे समूळ उच्चाटन होणे ही काळाची गरज आहे.

जातीवाद नष्ट करण्याच्या दिशने पहिले पाऊल म्हणजे शिक्षण. शिक्षण म्हणजे केवळ साक्षरता किंवा विद्यालयीन शिक्षण नाही. यात जातीशी संबंधित मिथकांविषयी असलेले गैरसमज दूर करुन नव्या पिढीला साक्षर करणे. जातीचा संबंध धर्म किंवा धार्मिक कृत्याशी लावणे पूर्णत: चुकीचे आहे. मतदारांना आपल्या जातीतल्या नेत्यांकडून कसे फसवले जाते किंवा सर्व लाभ एकाच जातीला मिळतात, हा समज चूकीचा आहे. शाळांमध्ये शिक्षकांनी सर्व मुलांना सामुहिक खेळणे आणि समूहभोजनासाठी प्रवृत्त केले पाहिजे.

सामाजिक-सांस्कृतिक असमतोल दूर करुन समाजाला एका सूत्रात बांधण्याची गरज आहे. जर खरेच एखाद्या जातीय गटाला वाटत असेल की आपल्यावर अन्याय झाला आहे, त्यांनी अन्यायाविरोधात आवाज उठवला पाहिजे. उदाहरणार्थ, बऱ्याच अनुसूचित जाती गरीब आणि शोषित आहे. लोकशाहीमध्ये अशाप्रकारच्या गटांना संघटीत होऊन आवाज उठवण्याचा पूर्ण अधिकार आहे.

---

**सर्वच राजकीय पक्ष जातीचे उच्चाटन करण्याविषयी बोलतात, मात्र तिकीटवाटपावेळी जातीआधारीत तिकीटवाटप केले जाते. सध्या असे दिसून येते की, मतदार जात-धर्माच्या पुढे जाऊन विकासाच्या मुद्यावर विचार करत आहे, ही चांगली बाब आहे. हा कल वाढला पाहिजे. राजकीय पक्षांनीही राजकारणाच्या पलीकडे विचार करुन राष्ट्रनिर्मितीसाठी जातीनिर्मूलनाचा विचार केला पाहिजे. केवळ निवडणुका जिंकण्यापुरती लोकशाही मर्यादीत नाही.**

---

सामाजिक आणि राजकीय सुधारणांमध्ये नागरी समाजाची (सिविल सोसायटी) महत्वाची भूमिका आहे. त्यांनी लोकांमध्ये जागृती घडवून आणून मतदारांना जात-धर्माच्या आधारावर मतदान करण्यापासून प्रवृत्त केले पाहिजे. तसेच आंतरजातीय विवाहांना प्रोत्साहन दिले पाहिजे.

निवडणूक आयोगाचीही महत्त्वाची भूमिका आहे. जातीव्यवस्थेचे महत्त्वाचे अंग म्हणजे निवडणूककेंद्री राजकारण होय. त्यामुळे निवडणूक आयोगाने जातीव्यवस्थेला आळा घालण्यासाठी काही मार्ग शोधले पाहिजेत. त्यापैकी निवडणूकीला शासकीय निधीचा पुरवठा, आचारसंहितेची काटेकोर अंमलबजावणी हे काही मार्ग आहेत.

सर्वात महत्त्वाचं आहे ते राजकीय इच्छाशक्ती आणि एकमत. सर्वच राजकीय पक्ष जातीचे उच्चाटन करण्याविषयी बोलतात, मात्र तिकीटवाटपावेळी जातीआधारीत तिकीटवाटप केले जाते. सध्या असे दिसून येते की, मतदार जात-धर्माच्या पुढे जाऊन विकासाच्या मुद्यावर विचार करत आहे, ही चांगली बाब आहे. हा कल वाढला पाहिजे. राजकीय पक्षांनीही राजकारणाच्या पलीकडे विचार करुन राष्ट्रनिर्मितीसाठी जातीनिर्मूलनाचा विचार केला पाहिजे. केवळ निवडणुका जिंकण्यापुरती लोकशाही मर्यादीत नाही.

लोकशाहीचा खरा अर्थ प्रत्यक्षात उतरवण्यासाठी मतदारांनी स्वतंत्र आणि निर्भयपणे, जात-धर्म आणि कोणत्याही दबावाला बळी पडता कामा नये. आपण भारतीय या कसोटीवर खरे उतरु ही अपेक्षा आहे. आपल्या राज्यघटनेच्या शिल्पकारांचेही तेच स्वप्न होते, स्वांत्र्यानंतरच्या ७० वर्षानंतरही आपण हेच स्वप्न पाहत आहोत.

■■■

*लेखक इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठाचे राज्यशास्त्राचे प्राध्यापक असून विदेशातील विद्यापीठांतही त्यांनी अध्यापन केले आहे.*

email: asnarang7@hotmail.com

# तिहेरी तलाक निकाल: मुस्लीम महिलांचा विजय

**- आर के सिन्हा**



**तिहेरी तलाकच्या नावाखाली देशात मुस्लीम महिलांवर होणाऱ्या अन्यायापासून त्यांची सुटका झाली आहे, हे तर स्पष्टच आहे. तसेच, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही, गेल्या वर्षी लाल किल्यावरुन स्वातंत्र्यदिनाला राष्ट्राला उद्देशून केलेल्या भाषणात तिहेरी तलाकची प्रथा रोखण्यासाठी नवा कायदा आणण्याचे आश्वासन मुस्लीम महिलांना दिले होते, याची पुन्हा आठवण करून देण्याचीही गरज नाही.**

सर्वोच्च न्यायालयाने तिहेरी तलाक खटल्याप्रकरणी दिलेल्या ऐतिहासिक निर्णयामुळे मुस्लीम महिलांना या अमानुष प्रथेपासून मुक्त केले आहे. (या प्रथेनुसार मुस्लीम पुरुष त्याच्या पत्नीला केवळ तीन वेळा 'तलाक' हा शब्द उच्च्चारून घटस्फोट देऊ शकत असे.) सर्वोच्च नायालयाने,या निकालात केंद्र सरकारला, तिहेरी तलाक विषयी येत्या सहा महिन्यात संसदेत कायदा करण्याचे आदेश दिले आहेत. हा कायदा होईपर्यत या प्रथेवर बंदी घालण्यात आली आहे. सहा महिन्यांच्या मुदतीत हा कायदा झाला नाही, तर सर्वोच्च न्यायालयाने घातलेली बंदी पुढेही कायम राहिल.

सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश जे एस खेहर (आता सेवानिवृत्त) यांच्या अध्यक्षतेखालील घटनापीठाने ३-२ अशा बहुमताने हा निर्णय दिला. १९८६ साली सर्वोच्च न्यायालयापुढे आलेल्या शहाबानो खटल्यापासून धडा घेत, न्यायालयाने यावेळी अंतिम निर्णय देण्यापेक्षा हा प्रश्न सोडवण्याचा निर्णय संसदेकडे दिला आहे. मात्र त्याचवेळी, ही बंदी घालून न्यायालयाने आपला उद्देश आणि दृष्टीकोनही स्पष्ट केला आहे.

एकंदरीत, तिहेरी तलाकच्या नावाखाली देशात मुस्लीम महिलांवर होणाऱ्या अन्यायापासून त्यांची सुटका झाली आहे, हे तर स्पष्टच आहे. तसेच, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही, गेल्या वर्षी लाल किल्यावरुन स्वातंत्र्यदिनाला राष्ट्राला उद्देशून केलेल्या भाषणात तिहेरी तलाकची प्रथा रोखण्यासाठी नवा कायदा आणण्याचे आश्वासन मुस्लीम महिलांना दिले होते, याची पुन्हा आठवण करून देण्याचीही गरज नाही.

### मानवतेचा विजय :रूढीवादी दृष्टीकोनाचा पराभव

"न्याय आंधळा असतो" असं जे म्हंटलं जातं ते योग्यच आहे, आणि म्हणूनच आपली न्यायदेवता डोळ्यांवर काळी पट्टी बांधलेली दाखवण्यात आली आहे. अनेक रुढीवादी कट्टर मुस्लीम संघटना तिहेरी तलाक प्रथेचे जोरदार समर्थन करत असतानाही, त्याकडे दुर्लक्ष करून सर्वोच्च न्यायालयाने मुस्लीम महिलांना नवे जीवदान दिले आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयाआधी असे बोलले जात होते की हा निकाल काय लागतो, यावरून मानवता जिंकते की मुस्लीम रुढीवाद आणि अमानुष प्रथा

हेच स्पष्ट होईल, आणि या लढाईत मानवतेने रुढीवादावर मात केली आहे.

पाच न्यायाधीशांच्या या घटनापीठातल्या न्यायमूर्ती कुरियन जोसेफ, न्यायमूर्ती आर एफ नरीमन आणि न्यायमूर्ती यु यु ललित या तिघांनी तिहेरी तलाकची प्रथा घटनाबाह्य असल्याचा निर्वाळा दिला. तर दुसऱ्या बाजूला ,सरन्यायाधीश जे एस खेहर आणि न्यायमूर्ती एस अब्दुल नझीर यांनी ही प्रथा मुस्लीम पर्सनल लॉ बोर्डाचा भाग असून न्यायालय त्यात हस्तक्षेप करू शकत नाही असे मत नोंदवले. मात्र इतर तीन न्यायाधीशांनी खेहर आणि नझीर यांच्या मताशी सहमती दर्शवली नाही. तिहेरी तलाक हा राज्यघटनेच्या कलम १४ (समानतेचा अधिकार) चे उल्लंघन आहे, असे या तीन न्यायमूर्तींचे मत होते. या निकालाचा अर्थ असा, की न्यायालयाने तिहेरी तलाक प्रथेला घटनाबाह्य ठरवून ती बहुमताने रद्दबातल केली आहे. त्याशिवाय अनेक मुस्लीम राष्ट्रांमध्ये या प्रथेवर बंदी असताना भारतातून ही प्रथा रद्द का केली जाऊ नये? असेही न्यायालयाने नमूद केले आहे. ही प्रथा बंद करण्यासाठी संसदेने सहा महिन्यांच्या आता कायदा करावा, असेही न्यायालयाने म्हटले आहे.

### तिहेरी तलाक हे 'पाप' आहे

तिहेरी तलाक हा मुस्लीम समाजाच्या मूलभूत अधिकारांचा भाग असून न्यायालयाने त्यात हस्तक्षेप करायला नको, असे मत सरन्यायाधीश न्यायमूर्ती जे एस खेहर आणि न्यायमूर्ती एस अब्दुल नझीर यांनी व्यक्त केले. मात्र त्याचवेळी तिहेरी तलाक हे एक पाप आहे, आणि सरकारने या प्रथेविरोधात कायदा करताना ही बाब लक्षात घ्यावी, असेही या दोन्ही न्यायाधीशांनी म्हटले आहे. केंद्र सरकार आता मुस्लीम महिलांच्या सक्षमीकरणासाठी एक कायदा आणेल, यात शंकाच नाही.

---

**तिहेरी तलाक हा मुस्लीम समाजाच्या मूलभूत अधिकारांचा भाग असून न्यायालयाने त्यात हस्तक्षेप करायला नको, असे मत सरन्यायाधीश न्यायमूर्ती जे एस खेहर आणि न्यायमूर्ती एस अब्दुल नझीर यांनी व्यक्त केले. मात्र त्याचवेळी तिहेरी तलाक हे एक पाप आहे, आणि सरकारने या प्रथेविरोधात कायदा करताना ही बाब लक्षात घ्यावी, असेही या दोन्ही न्यायाधीशांनी म्हटले आहे.**

---

भारतातील मुस्लीम महिलांच्या स्थितीविषयी जर कोणाला जाणून घ्यायचे असेल, तर त्याने/तिने अब्दुल्ला बिस्मिल्ला यांनी लिहिलेली "झिनी झिनी बिनी चदरिया"ही कादंबरी जरूर वाचावी. या कादंबरीत काही मुस्लीम कुटुंबांचे वर्णन करण्यात आले आहे, या कुटुंबात महिलांना अगदी हीन दर्जाची वागणूक दिली जाते. या कादंबरीत, एका ठिकाणी लेखकाने, एका पात्राच्या तोंडी संवाद घातले आहेत, तो म्हणतो,"शेवटी महिलांचा दर्जा काय आहे? त्यांचा उपयोग काय आहे? त्यांनी केवळ स्वयंपाक करावा, घरकाम करावे, आम्हाला शैय्यासुख द्यावे, मुलांना जन्म द्यावा... एवढाच काय तो त्यांचा उपयोग.... जर यापैकी एखादी गोष्ट त्या करु शकत नसतील, तर सरळ 'तलाक तलाक तलाक' म्हणून त्यांना हाकलून द्यावे......."

### मुस्लीम महिलांचा शत्रू कोण ?

मुस्लीम महिलांना या अमानुष प्रथेतून मुक्त करण्यासाठीची चळवळ जेव्हा सुरु झाली, त्यावेळी अनेक मुस्लीम राजकारण्यांनी, जे स्वत:ला मुस्लीम समाजाचे हितचिंतक म्हणवून घेत, त्या सर्वांनी या चळवळीला विरोध करायला सुरुवात केली. त्याशिवाय, प्रसारमाध्यमांच्या व्यासपीठांवर जिथे जिथे ह्या विषयावर चर्चा झाल्यात तिथे तिथे त्यांनी, सरकारने तिहेरी तलाकविरोधात कायदा केल्यास त्यांना चोख प्रत्युत्तर देऊ अशा स्वरूपाच्या धमक्याही दिल्या. अशा चर्चामध्ये अनेक मुस्लीम मौलवी आणि उलेमा, मुस्लीम समाजाचे प्रतिनिधी म्हणून बाजू मांडत असत, मात्र एकाही मुस्लीम महिलेला चर्चेसाठी बोलावले जात नसे. आजच्या आधुनिक शतकातही, मुस्लीम महिलांनी मध्ययुगीन प्रथा-परंपरांचे पालन करावे अशी या मौलवींची अपेक्षा आहे आणि या मौलवीना पाठींबा देणारे राजकारणी सरकारच्या पुरोगामी भूमिकेला उघड उघड विरोध करत होते.

तिहेरी तलाकचे समर्थन करणे आणि मांस खाण्यावरून सरकारशी भांडणे याशिवाय त्यांनी काय केले आहे? हे या मुस्लीम नेत्यांना विचारायला हवे. जेव्हा तिहेरी तलाकचा खटला न्यायप्रविष्ट

होता, तेव्हा माझे मुस्लीम पर्सनल लॉ बोर्डाच्या एका सदस्याशी बोलणे झाले. मी त्याला काही प्रश्न विचारले. तिहेरी तलाकमुळे तुमच्या मुली आणि महिला सक्षम होणार आहेत, त्याचा हिंदूशी काय संबंध ?

दुसरे असे, सर्व मुस्लीम राष्ट्रांनी जेव्हा ही कालबाह्य आणि अमानुष तिहेरी तलाक प्रथा रद्दबातल केली तेव्हा इस्लामचे उल्लंघन झाले नाही, मग भारतात ही प्रथा बंद केली तर ईस्लाम धोक्यात येईल आणि मुस्लिमांच्या मूलभूत हक्कांवर गदा येईल असे का वाटते तुम्हाला ? त्या व्यक्तीजवळ माझ्या या प्रश्नांची काहीही उत्तरं नव्हती. जर हा समुदाय आजही अंधारयुगातच राहतो आहे, तर त्यासाठी हे तथाकथित मुस्लीम नेतेच जबाबदार आहेत.

महत्वाचे म्हणजे कुराण किंवा हदीसमध्ये मध्ये तलाक प्रथेविषयी काहीही लिहिलेले नाही.किंबहुना, कुराणात तर एके ठिकाणी असे म्हटले आहे की जर अल्लाला अप्रिय असणाऱ्या गोष्टींची यादी करायची झाली तर तलाक त्यात सर्वात वरच्या स्थानावर असेल. रसूल किंवा नबी यांच्यापैकी कोणीही त्यांच्या बायकांना घटस्फोट दिला नव्हता. जेव्हा त्यांच्यात आपल्या बायकांशी काही मुद्द्यांवर मतभेद झाले तेव्हा त्यांनी आपल्या बायकांना काही दिवसांसाठी दुसरीकडे नेऊन ठेवले होते, मात्र त्यावेळी त्यांना सगळ्या सुविधा देऊन त्यांची पूर्ण काळजी घेतली जाईल, अशी व्यवस्था केली होती.

विवाह, घटस्फोट आणि पोटगी याविषयी योग्य ते नियम, तरतुदी नसल्यामुळे अनेक मुस्लीम महिलांना अतिशय वाईट स्थितीत आयुष्य कंठावे लागते. मुस्लीम समाजाचा त्यांच्याच महिलांकडे बघण्याचा दृष्टीकोन अतिशय पक्षपाती आहे, यात दुमत नाही. मात्र आता ही परिस्थिती हळूहळू सुधारेल. जरी अनेक मुस्लीम पुरुष ही प्रथा रद्द करण्याच्या विरोधात होते, तरी मुस्लीम महिला मात्र या प्रथेविरोधात ठामपणे उभ्या राहिल्या.

---

**विवाह, घटस्फोट आणि पोटगी याविषयी योग्य ते नियम, तरतुदी नसल्यामुळे अनेक मुस्लीम महिलांना अतिशय वाईट स्थितीत आयुष्य कंठावे लागते. मुस्लीम समाजाचा त्यांच्याच महिलांकडे बघण्याचा दृष्टीकोन अतिशय पक्षपाती आहे, यात दुमत नाही. मात्र आता ही परिस्थिती हळूहळू सुधारेल. जरी अनेक मुस्लीम पुरुष ही प्रथा रद्द करण्याच्या विरोधात होते, तरी मुस्लीम महिला मात्र या प्रथेविरोधात ठामपणे उभ्या राहिल्या.**

---

भारतीय मुस्लीम महिला आंदोलन या संस्थेने केलेल्या एका सर्वेक्षणानुसार, भारतातील ९२.१ टक्के मुस्लीम महिलांनी, तोंडी आणि तिहेरी तलाक प्रथा बंद व्हावी, अशी मागणी केली आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या या ऐतिहासिक निर्णयामुळे त्यांना दिलासा नक्कीच मिळाला आहे, मात्र ही प्रथा पूर्ण रद्द होण्यासाठी एक ठोस कायदा अस्तित्वात आला तरच त्यांना खऱ्या अर्थाने न्याय मिळू शकेल.

आता सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानुसार सरकारला याविरोधात एक कठोर कायदा आणावा लागेल, तरच या महिलांच्या अधिकारांचे संरक्षण होईल, हा कायदा त्यांना एक उत्तम आयुष्य मिळवून देईल. आणि त्यासाठी सहा महिन्यांची वाट तरी का बघायची ? सरकारने नोव्हेंबरमध्ये सुरु होणाऱ्या संसदेच्या आगामी हिवाळी अधिवेशनातच हा कायदा करावा. मोदी सरकार हे महिलांना समान दर्जा आणि अधिकार मिळवून देण्यासाठी कटिबद्ध आहे, हे सिद्ध करण्यासाठी सरकारने लवकरच त्या दृष्टीने पावले उचलायला हवीत.

■■■

*लेखक राज्यसभा सदस्य असून हिंदुस्थान समाचार या वृत्तसंस्थेचे प्रमुख आहेत.*

*email: rkishore.sinha@sansad.nic.in*

**आगामी अंक**

**'लघु आणि मध्यम उद्योग'**

**नोव्हेंबर २०१७**

# स्वच्छ भारत निर्माण

- परमेश्वरन अय्यर




**अस्वच्छतेमुळे सुमारे १ लाख बालमृत्यू अतिसारासारख्या आजारातून होतात. जे सहज टाळू शकता येण्यासारखे आहे. जागतिक बँकेच्या अंदाजानुसार भारतातील सुमारे ४० टक्के मुले कुपोषित आहेत. याचे मुख्य कारण म्हणजे - अस्वच्छता. अर्थव्यवस्थेच्या संभाव्य वाढीवर याचा प्रतिकूल परिणाम होतो आहे. ही प्रतिकूलता राष्ट्रीय उत्पन्नाच्या ६ टक्के इतपत आहे. उघडयावरील शौचाचा प्रश्न महिलांच्या सुरक्षेच्या तसेच स्वाभिमानाच्या दृष्टीने महत्वाचा आहे.**

१५ ऑगस्ट २०१४ रोजी, पंतप्रधानांनी ऐतिहासिक अशा लाल किल्ल्याच्या तटबंदीवरुन भाषण करताना अस्वच्छतेविरुद्ध युध्द पुकारण्याचे आवाहन केले होते. उघड्यावरील शौचाला जोरदार विरोध केला होता. महात्मा गांधीजींची १५० वी जन्मतिथी येत्या २ ऑक्टोबर २०१९ रोजी साजरी होणार आहे. तत्पूर्वी त्यांच्या स्वप्नातील भारत निर्माण करुन अर्थात उघड्यावरील शौचापासून मुक्त आणि सर्वतोपरी स्वच्छ असा, भारत निर्माण करुन त्यांना आदरांजली वाहावी असा संदेश त्यांनी याच भाषणातून दिला आहे.

निर्विवादपणे हे एक महत्वाकांक्षी आणि धाडसी असे वक्तव्य आहे आणि साफसफाईबद्दल सार्वत्रिकपणे असे भाषण करणे निश्चितच कौतुकास्पद आहे. कौतुकास्पद एवढ्यासाठीच की आजपर्यंतचा एक बंदिस्त विषय सरळ राष्ट्रीय धोरणाचा भाग करुन स्वच्छतेवर चर्चा करणे किंवा विकासाच्या दृष्टीकोनातून पहाणे याला महत्व आहे. वर्षानुवर्षे उघड्यावर शौचाची परंपराच आपल्याकडे होती. या अस्वच्छतेमुळे सुमारे १ लाख बालमृत्यू अतिसारासारख्या आजारातून होतात. जे सहज टाळू शकता येण्यासारखे आहे. जागतिक बँकेच्या अंदाजानुसार भारतातील सुमारे ४० टक्के मुले कुपोषित आहेत. याचे मुख्य कारण म्हणजे - अस्वच्छता. अर्थव्यवस्थेच्या संभाव्य वाढीवर याचा प्रतिकूल परिणाम होतो आहे. ही प्रतिकूलता राष्ट्रीय उत्पन्नाच्या ६ टक्के इतपत आहे. उघडयावरील शौचाचा प्रश्न महिलांच्या सुरक्षेच्या तसेच स्वाभिमानाच्या दृष्टीने महत्वाचा आहे.

आपल्या पंतप्रधानांनी या बाबतीतील गरज ओळखली, यामध्ये सकारात्मक पावले उचलायला हवीत हे त्यांना उमगले आणि एका चळवळीच्या माध्यमातून कार्यक्रमाची आवश्यकता प्रतिपादिली. २१ वे शतक सुरु आहे. आगामी काळात आपण एक आर्थिक महासत्ता म्हणून उदयाला येणार आहोत. अशावेळी उघडयावरील शौच आणि घाणीला आळा बसायला हवा. स्वच्छता आणि साफसफाई हे राष्ट्रीय प्राधान्याचे विषय ठरवून त्यांनी याला राजकीय प्राधान्य दिले आहे.

### स्वच्छ भारत चळवळीची प्रगती

स्वच्छ भारत मोहिमेला जवळ जवळ तीन वर्षे पूर्ण झाली आहेत.

सर्वसाधारणपणे या मोहिमेची प्रगती चांगली आहे. सुरुवातीच्या काळात असलेला ग्रामीण स्वच्छतेचा सहभाग ३९ टक्के वरुन आज ६८ टक्के इतका वाढला आहे. २३ कोटीहून अधिक लोकांनी उघडयावरील शौच बंद केले आहे. १९३ जिल्हे आणि २३५००० गावे उघड्यावरील शौचापासून मुक्त झाल्याचे घोषित करण्यात आलेली आहेत. सिक्कीम, हिमाचल प्रदेश, केरळ, हरियाणा आणि उत्तराखंड ही राज्ये शौचमुक्त ठरलेली आहेत.

यातील उल्लेखनीय तसेच खास बाब अशी की पवित्र गंगा नदीच्या किनाऱ्यावरील ४००० हून अधिक गावे उघड्यावरील शौचालय मुक्त झाली आहेत.

**स्वच्छ भारत मोहिमेचे वेगळेपण कोणते ?**

स्वच्छ भारत मोहिम हा जागतिक पातळीवर अत्यंत वेगळेपण लाभलेला, व्याप्ती आणि श्रेणी या दोन्ही बाबींत इतर कोणत्याही कार्यक्रमापेक्षा अव्वल कार्यक्रम आहे. ५५ कोटी ग्रामीण भारतीयांना उघड्यावरील शौचापासून मुक्त करणे ही अतुलनीय अशी कामगिरीच होय. एक गोष्ट नक्की आहे की, पायाभूत सुविधांची बांधणी, उदा. रस्ते, मोठे पूल, वीजप्रकल्प इ.इ. पेक्षा लोकांच्या सवयी बदलणे, किंवा लाखो लोकांनी स्वयंस्फुर्तीने, शतकानुशतके चालत आलेल्या सवयी बदलणे, किंवा लाखो लोकांनी स्वयंस्फूर्तीने, शतकानुशतके चालत आलेल्या उघड्यावरील शौचाला विरोध करुन एक 'जनआंदोलन' चालवणे हे त्यामधील एक अत्यंत दुर्मिळ असे उदाहरण आहे. स्वच्छ अभियान हे लोकांमध्ये मानसिकरित्या बदल घडवून आणत आहे. पायाभूत सुविधा उभारणे हे याचे उद्दीष्ट्य नव्हे. त्यामुळेच या पूर्वीच्या स्वच्छता कार्यक्रमांपेक्षा आताचा हा कार्यक्रम बऱ्याच दृष्टीतून वेगळा भासतो.

सर्वप्रथम यातील त्याचे वेगळेपण सिध्द करणारा वास्तववादी मुद्दा असा की, माहिती, शिक्षण आणि संवाद यांच्या माध्यमातून लोकांच्या वर्तणुकीत आलेला बदल. याचा दृश्य परिणाम असा की, शौचालयांची बांधणी आणि उघड्यावरील शौच बंदी असलेली गावे निर्माण होण्यात झाला. या प्रक्रियेत समाज मध्यवर्ती भुमिकेत आहे. स्वच्छतेच्या कामी तेच पुढाकार घेत आहेत. मुले, महिला, ज्येष्ठ नागरिक आणि खास करुन तरुण नागरिक हे स्वच्छतेचे अग्रदूत आहेत. ही सारी मंडळी त्यांच्या त्यांच्या समाजाला एकत्र येऊन उघडयावरील शौचाविरुध्द लढा देण्याची स्फूर्ती देत आहेत आणि म्हणून आंतरराष्ट्रीय महिला दिनी माननीय पंतप्रधानांनी ६००० महिला सरपंचांचा मेळावा घेतला होता, तेथे या लढ्यातील १० स्फूर्तीदायक महिलांचा गौरव केला.

**स्वच्छ भारत मोहिमेला जवळ जवळ तीन वर्षे पूर्ण झाली आहेत. सर्वसाधारणपणे या मोहिमेची प्रगती चांगली आहे. सुरुवातीच्या काळात असलेला ग्रामीण स्वच्छतेचा सहभाग ३९ टक्के वरुन आज ६८ टक्के इतका वाढला आहे. २३ कोटीहून अधिक लोकांनी उघडयावरील शौच बंद केले आहे. १९३ जिल्हे आणि २३५००० गावे उघड्यावरील शौचापासून मुक्त झाल्याचे घोषित करण्यात आलेली आहेत. सिक्कीम, हिमाचल प्रदेश, केरळ, हरियाणा आणि उत्तराखंड ही राज्ये शौचमुक्त ठरलेली आहेत.**

लाखो स्वच्छता दूत ज्यांना 'स्वच्छताग्रही' (स्वच्छता आग्रही) संबोधले जाते, त्यांना प्रशिक्षण देऊन समाजामध्ये स्वच्छता निर्माण करणे यासाठी उद्युक्त केले जाते. पेयजल व स्वच्छता मंत्रालयातर्फे यासाठी आभासी वर्ग (व्हर्च्युअल क्लासरुम) देखील राबवले जातात. या ठिकाणी प्रशिक्षक आणि प्रशिक्षितार्थी यांच्यामध्ये विविध ठिकाणांहून संवाद साधला जातो. या माध्यमातून समाज परिवर्तनावर 'लक्ष्य' केंद्रीत केले जाते. 'स्वच्छताग्रहीं' ना मोबदला दिला जातो. ग्रामीण पातळीवर ते या गोष्टींचे महत्व तसेच खुलासे करतात. स्वच्छतागृहांचे महत्व पटविले गेल्यानंतर त्या त्या विभागातून, समाजातून किती शौचालयाची मागणी आहे, हे शासनाला कळवतात. आजच्या घडीला १५००० स्वच्छताग्रही देशभरात कार्यरत आहेत. त्यात वाढ होतच आहे. स्वच्छ भारत अभियानाचे उद्दीष्ट्य हेच की किमान एकतरी स्वच्छताग्रही प्रत्येक गावात असावा.

**स्वच्छ भारत मोहिम एक जन आंदोलन सामाजिक चळवळ व्हावी या करिता –**

केंद्रीय पेयजल आणि स्वच्छता मंत्रालय आणि राज्य सरकार यांचा असा प्रयत्न आहे की, या मोहिमेकरिता - स्थानिक लोकप्रतिनिधी, तळागाळातील संस्था, शालेय विद्यार्थी, नगरसेवक त्याचप्रमाणे समाजातील कार्यरत संस्था यांचा सहभाग असावा. इलेक्ट्रॉनिक तसेच वृत्तपत्र यांच्या माध्यमातून समाज मनावर सातत्याने स्वच्छतेचा आग्रह धरुन हा विचार पक्का करण्याचा या मंत्रालयाचा विचार आहे. या करिता चित्रपटसृष्टीतील तारे-तारका, क्रिकेट खेळाडू यांची मदत या कामी घेण्यात येत आहे. सुपरस्टार अमिताभ बच्चन या कामी पुढे आलेले आहेत. त्यांची दरवाजा बंद ही जाहिरात (विषय उघड्यावरील शौचालय) दूरदर्शनवर एक मोहिम म्हणून राबवली जाते. रेडिओवरही या जाहिरतीचा बोलबाला आहे. शिवाय रस्त्यावर फलक उभारुन देखील चांगली जागृती घडत आहे. अक्षयकुमार या हिंदी चित्रपटसृष्टीतील अभिनेत्याने उघड्यावरील शौच या विषयाला अनुसरुन, 'टॉयलेट-एक प्रेमकथा' नावाचा चित्रपट केला असून त्या द्वारेही हा विषय जोरकसपणे मांडला आहे. त्याला चांगला प्रतिसाद मिळत आहे.

एकदा का ग्रामसभेमध्ये गावाने 'उघड्यावरील शौचालयमुक्त' गाव घोषित केले की पुढील प्रवास सोपा आहे. काही महिन्यापूर्वी फक्त २५ टक्के तपासणी झालेल्या गावांची संख्या आता ६० टक्के इतपत पोहोचली आहे. स्वच्छ भारत मोहिमेचे – ग्रामविकासासाठीचे निकष असे की, गाव उघड्यावरील शौचमुक्त घोषित झाले की, ९० दिवसांचा 'निरिक्षण काळ' त्रयस्थ मंडळींकडून घेण्यात यावा. थोडक्यात या काळात गावाच्या वर्तनाचा अभ्यास असावा. त्यात काही त्रुटी दिसल्यास त्याची तात्काळ दखल घेऊन योग्य ती पावले उचलतील. ह्यापूर्वीच्या स्वच्छता मोहिमा आणि स्वच्छ भारत मोहिमा यात हाच मुलभूत फरक आहे.

**उघड्यावरील शौचबंदी टिकवणे हे, सोपे काम नव्हे. राज्ये, जिल्हे, गावे यांनी शिक्षण माहिती आणि संवाद यावर भर देऊन ती टिकवणे अनेक अर्थाने संयुक्तिक होईल. उघड्यावरील शौचास बंदी त्यामुळे शाश्वतरित्या टिकवता येईल. ज्याप्रमाणे पाइपलाइन जलयोजना राबविल्या जातात त्याचप्रमाणे प्रोत्साहनपर योजना अथवा तंत्रे येथे राबवता येऊ शकतात. एकूण उघड्यावरील शौच थांबवणे हे महत्वाचे.**

या कार्यक्रमांतर्गत जिल्हा तसेच राज्य पातळीवर मजबूत अशी तपासणी यंत्रणा आहे. राष्ट्रीय पातळीवर पेयजल आणि स्वच्छता मंत्रालय यांची स्वतंत्र यंत्रणा असून नमुना सर्वेक्षणाच्या माध्यमातून त्रयस्थ मंडळींकडून याचा शोध घेतला जातो. अलिकडच्या काळात असे एक सर्वेक्षण करण्यात आले. 'भारतीय सर्वेक्षण परिषद' (क्वालिटी कौन्सिल ऑफ इंडिया) यांनी ते सर्वेक्षण केले. २०१७ च्या मे-जून मध्ये १४०००० कुटुंबांच्या सर्वेक्षणात असे दिसून आले आहे की, देशभराचा विचार करता शौचालयाचा वापर ९१ टक्के इतपत वाढलेला आहे.

उघड्यावरील शौचासंदर्भात यापूर्वी जे कार्यक्रम राबवले गेले त्या संबंधीचा अनुभव चांगला नव्हता. गावे घोषित तर केली परंतु काही दिवसांतच पुन्हा 'उघड्यावर शौच' सुरु व्हायचे. जुन्या सवयी सुटायला कठीण असतात, हे यावरुन सिध्द होते. उघड्यावरील शौचबंदी टिकवणे हे, सोपे काम नव्हे. राज्ये, जिल्हे, गावे यांनी शिक्षण माहिती आणि संवाद यावर भर देऊन ती टिकवणे अनेक अर्थाने संयुक्तिक होईल. उघड्यावरील शौचास बंदी त्यामुळे शाश्वतरित्या टिकवता येईल. ज्याप्रमाणे पाइपलाइन जलयोजना राबविल्या जातात त्याचप्रमाणे प्रोत्साहनपर योजना अथवा तंत्रे येथे राबवता येऊ शकतात. एकूण उघड्यावरील शौच थांबवणे हे महत्वाचे. केंद्रीय पेयजल व स्वच्छता मंत्रालयाने राज्यांना उघड्यावरील शौच संदर्भात मार्गदर्शक तत्वे जारी केली आहेत. त्याचबरोबर शाश्वत बंदी करता प्रोत्साहनपर योजना आणून यामध्ये सातत्य राखता येईल असे पाहिले जाईल. जिल्हा-जिल्ह्यामधील झपाटलेली निकोप स्पर्धा असावी या करिता 'स्वच्छता दर्पण' या योजनेअंतर्गत, जिल्ह्याला क्रमवारी देण्यात येईल. त्यामधून त्या त्या जिल्ह्याची प्रगती दिसेल. यामुळे शाश्वतता जाणवेल तसेच पारदर्शकताही येईल.

या योजनेचे आणखी एक ठळक वैशिष्ट्य असे की पूर्वीच्या स्वच्छता योजना आणि स्वच्छ भारत मोहिम योजना यामध्ये घन तसेच द्रव कचरा व्यवस्थापनाचा समावेश असायचा. आता स्वच्छतेला अधिकाधिक महत्त्व देण्यात आलेले आहे. म्हणूनच तर 'कचरा' हा एक व्यवस्थापनाचा भाग नव्हे तर स्त्रोत समजला जातो. त्याचे नामकरण 'घन आणि द्रव स्त्रोत व्यवस्थापन' असे करण्यात आले आहे. ग्राम स्वच्छता निर्देशांकात गावे स्वत:शीच स्पर्धा करत आहेत. या प्रक्रियेत सुमारे दीड लाख गावांचा समावेश झाला आहे. यातून त्यांना त्यांचा कोठून कोठे हा प्रवास लक्षात येतो. नेमके कोठे पोहचायचे आहे हे लक्षात येते. ज्या गावांनी उघड्यावरील शौचबंदीबरोबरच घनकचरा व्यवस्थापन आत्मसात केले आहे. त्याना ओडिएफ प्लस (ओपन डिफिकेशन फ्री) असे संबोधले जाते.

**'स्वच्छ भारत मोहिम' प्रत्येकाचे कर्तव्य**

आपले पंतप्रधान वारंवार आपल्याला ठासून सांगत आहेत की, स्वच्छता ही प्रत्येकाच्या अंगी भिनली पाहिजे, ते प्रत्येकाचे कर्तव्य आहे. ती कोणा मंत्रालयाची, एखाद्या खात्याची जबाबदारी नाही. स्वच्छ आयकॉनिक प्लस (सिप) आणि स्वच्छता ॲक्शन प्लॅन (सॅप) ही दोन महत्वपूर्ण पावले उचलली आहेत. सिपच्या अंतर्गत केंद्राने २० अशी ऐतिहासिक तसेच सांस्कृतिक दृष्ट्या महत्वाची शहरे शोधली आहेत की, त्यांचा कायापालट करुन अतिसुंदर प्रेक्षणीय स्थळे ठरवते. अशा स्थळांपासून इतरांना प्रेरणा मिळावी. पुढच्या टप्प्यात ८० स्थळे शोधली जाणार आहेत. सॅपच्या अंतर्गत सर्व मंत्रालयामध्ये संवाद साधला जाणार असून त्यांच्या त्यांच्या अखत्यारितीतील क्षेत्रांमध्ये स्वच्छता व साफसफाई यावर भर दिला जाणार आहे, हे ही मोठे आव्हान असून सन २०१७-१८ सालाकरिता या कामी १२००० कोटींची तरतूद करण्यात आली आहे. 'स्वच्छ भारत मोहिम' हा कदाचित एकमेव असा धागा असावा की हा सर्व खात्यांशी जोडला गेला आहे.

> **खाजगी क्षेत्र 'स्वच्छ भारत' मोहिमेमुळे चांगलेच सुखावले असून त्यांचा वाटा उचलण्यास ते तयार आहेत. 'कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी' या तरतूदी अंतर्गतच नव्हे तर खाजगी क्षेत्र मनुष्यबळ देखील पुरवण्यासाठी सिध्द आहे. टाटा ट्रस्टने यात सिंहाचा वाटा उचलला आहे. त्यांनी भारतातील प्रत्येक जिल्ह्यात ६०० तरुण व्यवसायिक मनुष्यबळाच्या कामी नेमले आहेत.**

खाजगी क्षेत्र 'स्वच्छ भारत' मोहिमेमुळे चांगलेच सुखावले असून त्यांचा वाटा उचलण्यास ते तयार आहेत. 'कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी' या तरतूदी अंतर्गतच नव्हे तर खाजगी क्षेत्र मनुष्यबळ देखील पुरवण्यासाठी सिध्द आहे. टाटा ट्रस्टने यात सिंहाचा वाटा उचलला आहे. त्यांनी भारतातील प्रत्येक जिल्ह्यात ६०० तरुण व्यवसायिक मनुष्यबळाच्या कामी नेमले आहेत. त्यांचे काम उघड्यावरील शौचालयासंबंधी आढावा घेणे त्याच प्रमाणे ओडिएफ व चांगल्या एसएलडब्ल्यूएमच्या कामी लक्ष ठेवणे होय. या तरुण व्यावसायिकांना 'जिल्हा स्वच्छ भारत प्रेरक' असे संबोधले जाते. या तरुणांमध्ये असलेल्या गुणवत्तेचा उपयोग करुन घेण्यात आला असून समाजातील तरुणांमध्ये असलेले सारे कसब या स्वच्छ भारत अभियानाअंतर्गत हे 'स्वच्छता प्रेरक' बाणवून घेत आहेत. सर्व राज्य शासनांनी याची प्रशंसा केलेली आहे.

स्वच्छ भारत अभियान आपल्या तिसऱ्या वर्षात पदार्पण करत आहे. आपण अशा एका उच्च पातळीवर पोहोचला आहोत की, तेथून ही मोहीम एक लोकचळवळ बनू पाहात आहे. मा. पंतप्रधानांच्या आवाहनाला प्रतिसाद देत स्वच्छ भारत अभियानाने नव्याने कात टाकत ही चळवळ सामान्य लोकांपर्यंत पोहचवत स्वच्छतेची धुरा भारतीयांकडे दिली आहे. स्वच्छताथॉन-स्वच्छ भारत हॅकॅथॉन ही संकल्पना नूतन तंत्रज्ञानाला आवाहन करुन स्वच्छ भारत मोहिमेअंतर्गत येणाऱ्या आव्हानांना तोंड देण्याचा प्रयत्न आहे. या संदर्भात काही प्रश्नही उपस्थित होतात, त्यामध्ये, शौचालयाचा वापर कोणत्या पध्दतीने होतो, हे स्पष्ट होऊ शकत नाही. लोकांच्या वर्तवणुकीतील बदलाची ही नोंद ठेवणे, तंत्रज्ञानाच्या फायदा मोजता येऊ शकत नाही, कठीण भौगोलिक स्थितीत साधे शौचालय कसे बरे उभारावे, शाळाशाळांमध्ये याचा फायदा कसा बरे पोहोचवता येईल,

महिलांच्या मासिक पाळी संदर्भातील कचरा व त्याचे लवकरात लवकर विघटन हे प्रश्नही शिल्लक राहतात. स्वच्छता मोहिमेने देशभरातून या संदर्भात सूचना मागवल्या आहेत. त्यातील नाविन्यपूर्ण कल्पनांचा उपयोग भारत स्वच्छता अभियानात नक्कीच होईल.

पंतप्रधानांनी दिलेल्या 'संकल्प से सिध्दी' या घोषणेने प्रेरित होऊन स्वच्छ भारत मोहिमेंने 'स्वच्छ संकल्प से स्वच्छ सिध्दी' असा सुरेख नारा दिला आहे. स्वच्छ भारत मोहिम एक जनआंदोलन बनावे यासाठी व्यापक प्रयत्न केले जात आहेत. त्यामध्ये - चित्रपट बनवणे, निबंध स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, आदींचे संपूर्ण भारतभर आयोजन केले जात आहे. विविध शालेय मुलांचे गट, मिलटरी सेवेतील लोक, तरुणांची विविध मंडळे, तसेच सर्व सामान्य जनता फार मोठ्या प्रमाणात यामध्ये सामील होत आहेत. त्याचप्रमाणे पूर्वीप्रमाणे पेन पेन्सिलच्या वापराविना आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करत, या माध्यमातून निबंध चित्रफितींचे व्हिडीओ रेकॉर्डिंग त्यांचे अनुभवकथन, त्यांच्या बाबतीतील योजना यांचाही स्वच्छतेमधील सहभाग वाढत आहे.

या सर्व उपक्रमातून आम्हाला १ कोटी निबंध आणि स्वच्छतेवरील ५०००० चित्रपट लघुपट यांची प्राप्ती होईल अशीही अपेक्षा आहे. कोट्यावधी जनतेच्या मनातील जागरुकता यामुळे दिसून आली आहे. स्वच्छ भारत मोहिमेमुळे लोकांमध्ये उत्साह दिसत आहे. मा. पंतप्रधांनांनी या कामात घेतलेला पुढाकार आणि त्यासंदर्भातील त्यातील सर्वांत महत्वाकांक्षी घोषणा, त्यांनी २७ ऑगस्टला राष्ट्राला उद्देशून केलेल्या 'मन की बात' मधील भाषणामध्ये केली. एक कालबध्द कार्यक्रम आखून, शौचालये बांधण्याचे काम अधिक गतीमान करण्याचे तसेच सार्वजनिक ठिकाणे अधिक चांगली करण्याचे (स्वच्छ करण्याचे) आवाहन केले आहे. स्वच्छ भारत मोहीम जोरात राबवून, श्रमदानासारख्या सामाजिक उपक्रमातून १५ सप्टेंबर

**पंतप्रधानांनी 'स्वच्छता ही सेवा' असे या कार्यक्रमाला संबोधले. केंद्रीय पेयजल आणि स्वच्छता मंत्रालय पंतप्रधानांच्या या पुढाकारामध्ये शासकीय पुढारी, लोकप्रतिनिधी, सामाजिक संस्था, तरुणांची मंडळे, सुरक्षा कर्मचारी, कार्पोरेटस् आणि सामान्य जनता यांना सहभागी करुन घेत आहे. भारताच्या राष्ट्रपतीजींनी उत्तरप्रदेशमधील एका कार्यक्रमात दि. १५ ऑगस्ट रोजी सहभाग घेतला होता.**

ते २ ऑक्टोबर या पंधरवड्यामध्ये कार्य करावे असे सुचवले. पंतप्रधानांनी 'स्वच्छता ही सेवा' असे या कार्यक्रमाला संबोधले. केंद्रीय पेयजल आणि स्वच्छता मंत्रालय पंतप्रधानांच्या या पुढाकारामध्ये शासकीय पुढारी, लोकप्रतिनिधी, सामाजिक संस्था, तरुणांची मंडळे, सुरक्षा कर्मचारी, कार्पोरेटस् आणि सामान्य जनता यांना सहभागी करुन घेत आहे. भारताच्या राष्ट्रपतीजींनी उत्तरप्रदेशमधील एका कार्यक्रमात दि. १५ ऑगस्ट रोजी सहभाग घेतला होता.

पंतप्रधान २ ऑक्टोबर २०१७ रोजी पंधरवडाभर राबवलेल्या कार्यक्रमाची सांगता करणार आहेत. त्यादिवशी राष्ट्रीय स्वच्छ भारत पुरस्कार तसेच 'स्वच्छ संकल्प से स्वच्छ सिध्दी' पुरस्कारांचे वितरणही करणार आहेत.

या सर्व पुढाकारांमुळे स्वच्छ भारत मोहिमेला ऊर्जा मिळत आहे. पूर्वीपेक्षा आता कितीतरी पटीने ही मोहिम सशक्त होत आहे. लोकांना स्फूर्ती मिळत आहे. ते त्यांचा परिवर्तशील प्रवास करत आहेत. जनतेने या कल्पनेला दाद दिली आहे. ती स्वत:ची मोहीम आहे. असे त्यांना वाटते. स्वातंत्र्यानंतर ७० वर्षे शांत असलेला हा विषय, गांधीजींच्या स्वप्नातील स्वच्छ भारत एक वस्तूस्थिती बनू पाहत आहे. उद्दीष्ट गाठण्यासाठी अशक्यप्राय असलेला विषय, उघड्यावरील शौचबंदीचा विषय याला पंतप्रधानांनी जाहीर वाचा फोडली. ते अत्यंत धाडसी आणि वस्तूस्थिती मांडणारे आहे. ५ वर्षांत हे उद्दीष्ट आपल्याला गाठायचे आहे. वरवर पाहता हे अवघड उद्दीष्ट वाटत असले तरी येथे प्रगतीला खूप वाव आहे. येत्या १२ ते १५ महिन्यांत लोकसहभाग अपेक्षेप्रमाणे वाढला तर मात्र हे उद्दीष्ट खात्रीने गाठता येईल.


■■■

*लेखक केंद्रीय पेयजल आणि स्वच्छता मंत्रालयाचे सचिव असून सार्वजनिक स्वच्छता क्षेत्रातील कामाचा त्यांना प्रदीर्घ अनुभव आहे.*

*email:* param.iyer@gov.in

# 'न्यू इंडिया'साठी नवीन कृषी, शेतकरी कल्याण हीच गुरुकिल्ली

डॉ. जगदीप सक्सेना




**भारत सरकारने २०२२ पर्यंत म्हणजे देशाच्या स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षापर्यंत शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याची वचनबद्धता व्यक्त केली आहे. नव्या योजना आणि उपक्रमांना योग्य प्रकारे पाठबळ देण्यासाठी आणि निधी पुरवण्यासाठी सरकारने सातत्याने कृषी आणि ग्रामीण क्षेत्रासाठी अर्थसंकल्पीय तरतुदीत वाढ केली आहे. २०१७-१८ या वर्षाच्या अर्थसंकल्पात १८७० अब्ज रुपये इतकी भरघोस तरतूद या क्षेत्रांसाठी करण्यात आली आहे.**

न्यू इंडिया' हा भारताचा विशाल आणि महत्त्वाकांक्षी दृष्टिकोन असून देशाचे एका समृद्ध, निरोगी, सुशिक्षित, स्वच्छ आणि हरित देशामध्ये परिवर्तन करणे हा त्यामागील उद्देश आहे. मात्र, ही उद्दिष्टे साध्य करण्यासाठी आपल्या पूर्वापार कृषी अर्थव्यवस्थेमध्ये सुमारे ५५ टक्के मनुष्यबळाला रोजगार पुरवणारे आणि देशाच्या सकल राष्ट्रीय उत्पादनामध्ये १४ टक्के योगदान देणारे कृषी क्षेत्र अतिशय महत्त्वाच्या बाबींपैकी एक आहे. ही वस्तुस्थिती लक्षात घेऊन विद्यमान सरकारने कृषी क्षेत्राला सर्वोच्च प्राधान्य दिले आहे आणि गेल्या तीन वर्षात या क्षेत्रात अनेक सुधारणांची अंमलबजावणी केली आहे. याच प्रयत्नांना आणखी पुढे नेताना भारत सरकारने २०२२ पर्यंत म्हणजे देशाच्या स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षापर्यंत शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याची वचनबद्धता व्यक्त केली आहे. नव्या योजना आणि उपक्रमांना योग्य प्रकारे पाठबळ देण्यासाठी आणि निधी पुरवण्यासाठी सरकारने सातत्याने कृषी आणि ग्रामीण क्षेत्रासाठी अर्थसंकल्पीय तरतुदीत वाढ केली आहे. २०१७-१८ या वर्षाच्या अर्थसंकल्पात १८७० अब्ज रुपये इतकी भरघोस तरतूद या क्षेत्रांसाठी करण्यात आली आहे. यापूर्वीच्या अर्थसंकल्पातील तरतुदीपेक्षा ही तरतूद २४ टक्क्यांनी जास्त आहे. २०१६-१७ या वर्षात खाद्य उत्पादनाने आतापर्यंतचा २७४ दशलक्ष टनांचा उच्चांक नोंदवला आहे. नवे कार्यक्रम आणि धोरणे आणि त्यांना आपले प्रामाणिक शेतकरी, नवनिर्मितीक्षम शास्त्रज्ञ, कार्यक्रम राबवणारे अधिकारी आणि इतर संबंधित यांनी दिलेल्या पाठबळाचा हा प्रभाव आणि यश आहे. यापुढे जाऊन विचार केल्यास, २०११-१४ या काळाशी तुलना केल्यावर मत्स्योत्पादन आणि दुग्ध उत्पादनात २०१४-१७ या काळात अनुक्रमे २० टक्के आणि १७ टक्के इतकी वाढ झाल्याचे दिसते. २०१६-१७ या काळात कृषी क्षेत्राचा एकंदर विकासदर ४.४ टक्के झाला. २०२२ पर्यंत जर शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करायचे लक्ष्य साध्य करायचे असेल तर हा विकासदर १०.४ टक्क्यांपर्यंत न्यावा लागेल.

**अभिनव योजनांच्या माध्यमातून नियोजनबद्ध पावले**

नवीन कृषी धोरणे आणि शेतकऱ्यांची समृद्धी यांवर भर देत 'न्यू इंडिया'चा दृष्टिकोन प्रत्यक्षात आणण्यासाठी कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालयाने सात कलमी धोरणात्मक योजना तयार केली आहे. ही धोरणात्मक योजना म्हणजे शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्यासाठी आवश्यक असलेले उपाय आणि मार्ग सुचवण्यासाठी नियुक्त केलेल्या तज्ज्ञांच्या समितीने या संदर्भात सखोल विचारमंथन करून सादर केलेल्या चार खंडांच्या अहवालाचा एक भाग आहे. या धोरणात्मक योजनेमध्ये, २०१५-१६ या वर्षात शेतकरी कुटुंबांचे सरासरी ९६,७०३ रुपये असलेले उत्पन्न २०२२-२३ मध्ये १,९३,४०० रुपये करण्याचे उद्दिष्ट निर्धारित करण्यात आले आहे. या अहवालानुसार हे उद्दिष्ट गाठण्यासाठी या काळात खाजगी आणि सार्वजनिक क्षेत्राकडून १४८६ अब्ज रुपयांची संकलित गुंतवणूक होणे भारतासाठी गरजेचे आहे. पीक उत्पादनात वाढ, लागवडीच्या खर्चात कपात, हंगाम पूर्ण झाल्यावर होणारे तोटे कमी करणे आणि कृषी बाजारपेठांच्या सुधारणा यावर या धोरणाचा विस्तृत भर आहे. शेतमाल शेतातून बाहेर पडतानाच त्याच्या दरनिश्चितीच्या सुविधा करून मूल्यवर्धन, पीक विमा आणि आपत्तीच्या काळात मदत यांच्या माध्यमातून जोखीम कपात आणि फलोत्पादन व दुग्ध उत्पादन यांसारख्या उच्च मूल्य असलेल्या क्षेत्रांना प्रोत्साहन अशा इतर गोष्टींवर लक्ष केंद्रित केले जाणार असल्याचे या अहवालात नमूद केले आहे.

पाण्याच्या वापराची क्षमता वाढवण्यासाठी आणि सिंचन सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी सरकार आटोकाट प्रयत्न करत आहे. सूक्ष्म सिंचन तंत्रज्ञानाच्या माध्यमातून सिंचन क्षेत्राचा विस्तार करण्याचे विशिष्ट उद्दिष्ट असलेल्या प्रत्येक थेंबातून अधिक पीक या 'पर ड्रॉप मोअर क्रॉप' मोहीमेअंतर्गत सरकारचे हे प्रयत्न सुरू आहेत. पंतप्रधान कृषी सिंचन योजना (पीएमकेएसवाय) या योजनेंतर्गत केलेल्या प्रयत्नांमुळे २०१३ मध्ये सूक्ष्म सिंचनाखाली असलेल्या ४.३ लाख हेक्टर क्षेत्रात वाढ होऊन ते क्षेत्र २०१६-१७ मध्ये ८.३ लाख हेक्टरपर्यंत पोहोचले आहे. २०१७ च्या स्वातंत्र्यदिनाच्या सोहळ्यात केलेल्या भाषणामध्ये पीएमकेएसवाय अंतर्गत ३० प्रकल्प पूर्ण झाल्याची घोषणा केली होती. आणि आणखी ५० प्रकल्पांवर काम सुरू असल्याची माहिती दिली होती. सरकारच्या मृदा आरोग्य पत्रिका योजनेमुळे शेतकऱ्यांना रासायनिक खतांचे योग्य ते प्रमाण निश्चित करता येत असल्याने आणि मृदेची उत्पादकता शाश्वत रितीने वाढवता येत असल्याने त्यांना लागवडीच्या खर्चात कपात करण्यामध्ये या मृदा आरोग्य पत्रिकेची मदत होत आहे. देशभरात अतिशय व्यापक प्रमाणात राबवलेल्या प्रत्यक्ष शेतातील मृदा तपासणीच्या निष्कर्षांच्या आधारे सुमारे ७.१ कोटी शेतकऱ्यांना मृदा आरोग्य पत्रिका वितरित करण्यात आल्या आहेत. सेंद्रिय उत्पादनांना मिळणारा उच्च दर आणि लागवडीसाठी तुलनेने होणारा कमी खर्च यामुळे शेतकऱ्याला जास्त उत्पन्नाची हमी देणाऱ्या सेंद्रिय शेती अंतर्गत असलेल्या क्षेत्राचा परंपरागत कृषी विकास योजना (पीकेव्हीवाय) या योजनेअंतर्गत विस्तार करण्याचे सरकारचे लक्ष्य आहे. व्यावसायिक पद्धतीने सेंद्रिय शेती करण्यासाठी शेतकऱ्यांना समूह स्थापनेसाठी एकत्र आणले जात आहे. सरकारच्या आर्थिक मदतीने आतापर्यंत ९१०० हून अधिक समूह स्थापन झाले आहेत. हे समूह संभाव्य उत्तम मागणी असलेल्या बाजारपेठेकडे सेंद्रिय उत्पादने शेतकऱ्यांकडून संकलित करून त्यांची वाहतूक करण्यालाही सरकार पाठबळ देत आहे.

**पंतप्रधान कृषी सिंचन योजना (पीएमकेएसवाय) या योजनेंतर्गत केलेल्या प्रयत्नांमुळे २०१३ मध्ये सूक्ष्म सिंचनाखाली असलेल्या ४.३ लाख हेक्टर क्षेत्रात वाढ होऊन ते क्षेत्र २०१६-१७ मध्ये ८.३ लाख हेक्टरपर्यंत पोहोचले आहे. २०१७ च्या स्वातंत्र्यदिनाच्या सोहळ्यात केलेल्या भाषणामध्ये पीएमकेएसवाय अंतर्गत ३० प्रकल्प पूर्ण झाल्याची घोषणा केली होती. आणि आणखी ५० प्रकल्पांवर काम सुरू असल्याची माहिती दिली होती.**

शेतकऱ्यांचा उदरनिर्वाह सुरू

राहावा आणि शाश्वत उत्पन्नाची हमी मिळावी, यासाठी प्रधानमंत्री पीक विमा योजना हा सरकारचा एक आघाडीचा कार्यक्रम आहे. या कार्यक्रमामुळे सर्व प्रकारची अन्नधान्ये, तेलबिया आणि वार्षिक व्यापारी पिके यांना एक हंगाम एक दर या आधारावर अतिशय अल्प हप्त्याने विम्याचे छत्र उपलब्ध झाले आहे. या योजनेमुळे शेतकऱ्याच्या कृषी हंगामातील प्रतिबंधात्मक पेरणीपासून, पीक उभे राहीपर्यंत आणि त्यानंतर हंगाम संपल्यानंतर होणाऱ्या नुकसानापर्यंत सर्व प्रक्रियांना विमा संरक्षण देण्यात आले आहे. आतापर्यंत सुमारे ५.७५ कोटी शेतकऱ्यांना या योजनेखाली आणण्यात आले आहे आणि या योजनेअंतर्गत असलेल्या पीक क्षेत्राचा विस्तार २०१६-१७ मधील ३० टक्क्यांवरून २०१७-१८ साठी ४० टक्क्यांपर्यंत करण्यात येणार असल्याने त्यामध्ये आणखी शेतकरी सामावले जाण्याची शक्यता आहे. एखाद्या बोनसप्रमाणे ही योजना कृषी क्षेत्रातील गुंतवणुकांना आकर्षित करत आहे आणि प्रोत्साहन देत आहे. शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवण्यासाठी बाजारपेठेत असलेली कृषीमालाची अधिक चांगली किंमत माहित असणे अतिशय महत्वाचे आहे आणि सरकारने सुरू केलेल्या ई-नाम (नॅशनल ॲग्रीकल्चर मार्केट) या स्तुत्य उपक्रमामुळे १३ राज्यातील ४१० मंडया व्यापार आणि व्यवहारांसाठी एकाच छत्राखाली आल्याने या मुद्द्याचे निरसन व्हायला मदत होत आहे. आतापर्यंत ६९ जिन्नसांसाठी व्यापारयोग्य निकष निर्धारित करण्यात आले आहेत आणि ४५ लाखांहून अधिक शेतकऱ्यांनी ई-नाम या ऑनलाइन मंचावर स्वत:ची नोंदणी केली आहे. या सुधारणेमुळे दलाल आणि नाईलाजाने मिळेल त्या भावाने होणारी शेतमालाची विक्री यांना टाळता येऊ लागल्याने शेतकऱ्यांच्या

---

**भारतीय कृषी संशोधन परिषद या देशातील सर्वोच्च संशोधन संस्थेने उत्पादनाची पातळी एका नव्या उंचीवर नेण्यासाठी गेल्या तीन वर्षात पीकांच्या सुमारे ६०० नव्या प्रजाती विकसित केल्या आणि शेतकऱ्यांना उपलब्ध करून दिल्या आहेत. उत्पादकता वाढवण्यासाठी शेतामध्ये नव्या कृषी तंत्रज्ञानाचा वापर वाढवणे गरजेचे आहे.**

---

उत्पन्नात यशस्वीरित्या वाढ होऊ लागली आहे. त्याशिवाय अतिरिक्त परिणाम म्हणजे विविध प्रकारच्या शेतमालाच्या घाऊक दरात वाढ होऊ लागली आहे आणि तज्ज्ञांच्या मते शेतमालाच्या भावात १३ टक्के वाढ झाल्याने शेतकऱ्यांच्या उत्पन्नात ९.१ टक्के वाढ झाली आहे. मात्र, शेतकऱ्यांना मिळणाऱ्या दरात आणखी वाढ करण्यासाठी आणि त्यांचे उत्पन्न वाढवण्यासाठी आणखी बराच वाव आहे. परंतु शेतकऱ्यांच्या उत्पन्नात अपेक्षित वाढ होण्यासाठी, या योजना व कार्यक्रम कालबद्ध पद्धतीने राबवणे गरजेचे आहे.

### अधिक फायद्यासाठी उत्पादकतेत वाढ

अलीकडेच नीती आयोगाने 'शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट' या संकल्पनेवर आधारित धोरण पत्र आणले आहे. ज्यामध्ये ही योजना अगदी तळागाळापासून राबवण्याबाबत कृती आराखडा मांडला आहे. प्रति एकक शेतजमिनीची उत्पादकता वाढवण्यासाठी सिंचन आणि नव्या तंत्रज्ञानाची अतिशय महत्त्वाची भूमिका आणि त्यायोगे त्याच क्षेत्रात शेतक-यांची उत्पन्नवाढ यावर या धोरणपत्रात भर दिला आहे. अधिक प्रभावी यंत्रणेचा विस्तार आणि किफायतशीर दरांमध्ये बियाण्यांचा पुरवठा यांमुळे पीकांच्या जास्त उत्पादन देणाऱ्या नव्या आणि सुधारित प्रजातींचा वापर शेतकऱ्यांकडून वाढत चालला असल्याचे निदर्शनास आले आहे. भारतीय कृषी संशोधन परिषद या देशातील सर्वोच्च संशोधन संस्थेने उत्पादनाची पातळी एका नव्या उंचीवर नेण्यासाठी गेल्या तीन वर्षात पीकांच्या सुमारे ६०० नव्या प्रजाती विकसित केल्या आणि शेतकऱ्यांना उपलब्ध करून दिल्या आहेत. उत्पादकता वाढवण्यासाठी शेतामध्ये नव्या कृषी तंत्रज्ञानाचा वापर वाढवणे गरजेचे आहे. अतिशय अचूक पद्धतीची कृषी प्रणाली, एकात्मिक शेती, संसाधनांचे जतन करणारे तंत्रज्ञान आणि संरक्षित लागवड ही काही उदाहरणे आहेत ज्यांमध्ये उत्पादनवाढीची खूप मोठी क्षमता आणि हमी आहे. लेझर लँड लेव्हलर, प्रिसिजन

सीडर अँड प्लँटर(अचूक पेरणी व लावणी यंत्र) आणि सिस्टम ऑफ राइस इंटेन्सिफिकेशन(एसआरआय) यांसारख्या आधुनिक शेती पद्धती, डायरेक्ट सीडेड राइस, झिरो टिलेज, रेइड बेड प्लँटेशन अँड रिज प्लँटेशन यांमुळे देखील गुंतवणुकीवर अतिशय आकर्षक परताव्याची हमी मिळते आणि शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होते.

प्रति एकर जमिनीतून मिळणारे उत्पन्न वाढवण्यासाठी तीव्र पीकवाढ हा देखील आणखी एक तंत्रज्ञानविषयक भक्कम पर्याय आहे. सिंचनाच्या सुविधांची उपलब्धता आणि नवे तंत्रज्ञान यांमुळे मुख्य पीक हंगामांनंतर (खरीप व रब्बी) अल्प कालावधीत मिळणारी पिके घेणे देखील शेतकऱ्यांना शक्य होऊ लागले आहे. त्याच प्रकारे एकात्मिक शेती प्रणालीची मॉडेल्स नफ्यात वाढ करण्यासाठी विकसित करण्यात आली आहेत. विपरित हवामानाच्या काळात अशी मॉडेल्स अधिक स्थिर उत्पन्न मिळवून देत आहेत. उच्च मूल्य देणाऱ्या उत्पादनांकडे (फळे, भाज्या, तंतू, मसाला पीके, औषधी आणि सुगंधी वनस्पती) वळून शेतीमध्ये विविधता आणल्यास त्यामुळे देखील आपले उत्पन्न वाढवण्यासाठी शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणावर वाव आहे. त्याच प्रकारे इतर संबंधित क्षेत्रांकडे वळल्यासही शेतकऱ्यांना उत्पन्नवाढीची संधी आहे. ही क्षेत्रे म्हणजे वनीकरण, कृषीउत्पादनांवरील प्रक्रिया उद्योग इ. नीती आयोगाच्या धोरणपत्रात शेतीमधील मनुष्यबळ उत्पन्नवाढीसाठी आणि चरितार्थाच्या संधी मिळवण्यासाठी इतरत्र हलवण्याची शिफारस केली आहे. सरकारने अलीकडेच सुरू केलेले कौशल्य विकासविषयक उपक्रम अधिक उत्पन्न मिळवून देण्यासाठी संबंधित किंवा बिगर कृषी क्षेत्रात कृषी समुदायाचे कौशल्य विकसित करण्यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावू शकतील.

---

**भारत सरकार २०२२ पर्यंत विविध प्रकारच्या सुधारणा, धोरणे व उपक्रम यांच्या माध्यमातून शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्यासाठी झटत आहे. त्यानुसार शेती क्षेत्रातील समस्या कमी करणे आणि शेतकऱ्यांचे उत्पन्न व बिगर कृषी क्षेत्रात काम करणाऱ्या व्यक्तींचे उत्पन्न एका समान पातळीवर आणण्याचे नव्या दृष्टीकोनाचे लक्ष्य आहे. भारतीय कृषी क्षेत्राचे नवे सुधारित रूप आता 'न्यू इंडिया' चे स्वप्न साकारण्यासाठी सज्ज झाले आहे.**

---

## नवा दृष्टिकोन

यापूर्वीच्या काळात सरकारचा दृष्टिकोन आणि धोरण हे मुख्यत: अन्नसुरक्षेसाठी कृषी उत्पादनवाढीवर केंद्रित होते. त्यानंतर धोरणकर्त्यांना शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवण्याची आणि त्याचबरोबर शेतकऱ्यांच्या कल्याणाला प्रोत्साहन देण्याची आवश्यकता लक्षात आली. त्यासाठी पहिले पाऊल म्हणून २०१५ मध्ये भारत सरकारने कृषी मंत्रालयाचे नामकरण कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालय असे केले. तेव्हापासून भारत सरकार २०२२ पर्यंत विविध प्रकारच्या सुधारणा, धोरणे व उपक्रम यांच्या माध्यमातून शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्यासाठी झटत आहे. त्यानुसार शेती क्षेत्रातील समस्या कमी करणे आणि शेतकऱ्यांचे उत्पन्न व बिगर कृषी क्षेत्रात काम करणाऱ्या व्यक्तींचे उत्पन्न एका समान पातळीवर आणण्याचे नव्या दृष्टीकोनाचे लक्ष्य आहे. भारतीय कृषी क्षेत्राचे नवे सुधारित रूप आता 'न्यू इंडिया' चे स्वप्न साकारण्यासाठी सज्ज झाले आहे.

२०२२ पर्यंत शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्यासाठी कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालयाने तयार केलेल्या तीन वर्षांच्या (२०१७-२०१९) कृती आराखड्याची प्रमुख वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत.

- बियाणे ग्राम कार्यक्रमाचा विस्तार ३०००० गावांवरून ६०००० गावांपर्यंत करणार आणि पंचायत पातळीवर ५०० बियाणे उत्पादन व प्रक्रिया केंद्रे उभारणार
- खेडेगावांमध्ये स्थानिक उद्योजकांच्या माध्यमातून मृदा तपासणीसाठी १००० लघु प्रयोगशाळा उभारणार
- नाबार्डच्या माध्यमातून पूर्णपणे सिंचनासाठी वापरला जाईल असा ५००० कोटी रुपयांचा निधी कार्यान्वयित केला जाईल आणि ४.८ दशलक्ष हेक्टर क्षेत्र

सूक्ष्म सिंचनाखाली आणले जाईल.

- २०२० पर्यंत तीन लाख हेक्टर क्षेत्र लागवडीखाली आणण्यासाठी भात लागवड होणाऱ्या पडित क्षेत्राचा वापर डाळी आणि तेलबियांच्या लागवडीसाठी करून पीक लागवडीचे प्रमाण दर वर्षाला एक लाख हेक्टरने वाढवण्यात येईल.
- पाच लाख मेट्रिक टनाची शीतगृह, १००० बंदिस्त खोल्या आणि १५० पक्वता कक्षांची उभारणी करून सुगी हंगामाच्या पश्चात आवश्यक असलेल्या पायाभूत सुविधांना बळकटी देणार
- ३५० कृषी उत्पादक संघटनांच्या माध्यमातून २.५ लाख हेक्टर क्षेत्रावर सेंद्रीय शेतीला प्रोत्साहन देणार
- लहान आणि गरीब शेतकऱ्यांना अल्प मुदतीच्या कर्जाचा लाभ मिळवून देण्यासाठी या योजनांचा विस्तार करून या लाभधारकांचे प्रमाण ४३ टक्क्यांवरून २०१८-१९ पर्यंत ५० टक्क्यांवर नेणार
- प्रधानमंत्री पीक विमा योजना आणि हवामान आधारित पीक विमा योजना या योजनांखालील एकूण क्षेत्राचा विस्तार सध्याच्या ३० टक्क्यांवरून २०१७-१८ मध्ये ४० टक्के आणि २०१८-१९ मध्ये ५० टक्क्यांपर्यंत करण्यात येणार आहे.
- मार्च २०१८ पर्यंत एकत्रित दूध संकलनाचे प्रमाण १६००० गावांवरून वाढवून ५०००० गावे इतके करून दूध संकलनाच्या क्षमतेला बळकटी देणार
- नील क्रांती करण्यासाठी मत्स्य उत्पादनाला प्रोत्साहन देणार
- राष्ट्रीय दुग्धविकास मंडळाच्या धर्तीवर राष्ट्रीय पशुधन विकास संस्था स्थापन करणार.
- पीकांमध्ये विविध प्रकारचे रोग आणि जीवाणू विषाणूंच्या हल्ल्याला तोंड देण्याची क्षमता विकसित करण्यासाठी आणि मिळणाऱ्या उत्पादनात आश्चर्यकारक वाढ करण्यासाठी आनुवंशिकताशास्त्र/आनुवंशिकतावाहक फेरफार तंत्रज्ञानात संशोधन व विकास
- प्रथिनांचे प्रमाण जास्त असलेल्या अन्नासाठी बायो-फॉर्टिफिकेशनमध्ये संशोधन व विकास
- प्राण्यांसाठी उष्ण वातावरणात टिकून राहणाऱ्या लसींचा विकास

■■■

*लेखक भारतीय कृषी संशोधन परिषद, नवी दिल्लीचे माजी मुख्य संपादक आहेत.*

*ई-मेल jgdsaxena@gmail.com*

## लेखकांना आवाहन

योजना मासिकासाठी लेख पाठवितांना लेखकांनी UNICODE (Mangal) or KRUTI DEV या फॉन्ट मध्येच आपले लेख पाठवावेत, हे नम्र आवाहन.



विकास समर्पित मासिक

**योजना**

नियमित वाचा, वर्गणीदार व्हा.

**मिमांसा**

# नव भारतासाठी नावीन्यपूर्ण सुधारणा वास्तवात आणणारे 'चॅम्पियन्स'

**-डॉ उन्नत पंडित**




**विविध क्षेत्रातल्या उद्योजकांना, सरकारशी थेट संवाद साधून त्यांच्या स्वप्नातला नव भारत घडवण्यासाठी त्यांचा दृष्टिकोन जाणून घेण्याचा प्रयत्न करून, केंद्र सरकारच्या निती आयोगाने, 'चॅम्पियन्स ऑफ चेंज' ही संकल्पना वास्तवात आणण्यासाठी पहिला उपक्रम हाती घेतला. महत्वाचे निर्णय घेणाऱ्या या उच्च सरकारी अधिकाऱ्यांनी उद्योजकांचे सादरीकरण पाहिले, त्यांचे मुद्दे जाणून घेतले.**

भारताच्या स्वातंत्र्याला २०२२ मधे ७५ वर्षे पूर्ण होत असल्यानिमित्त देशाला नवा जोश आणि नव चैतन्य देण्याबरोबरच ही परिवर्तनाची आणि नव भारत घडवण्याची वेळ आहे.

स्फूर्तीदायी, प्रोत्साहनदायी, सरकारबरोबर भागीदारी सबळ करणारा आणि देशाच्या सर्व समावेशक विकासावर भर देणारा 'न्यू इंडिया' अर्थात नव भारत.'आपल्या देशाच्या विकासाच्या वाटचालीत प्रत्येक नागरिकाकडे काही ना काही योगदान देण्यासारखे असतेच' असे पंतप्रधानांनी म्हटले आहे. सहयोग आणि देशाची सेवा करण्याची संधी देणारा नव भारत. नव भारत निर्मिती अभियान परिपूर्ण करण्याची अनोखी संधी.

विविध क्षेत्रातल्या उद्योजकांना, सरकारशी थेट संवाद साधून त्यांच्या स्वप्नातला नव भारत घडवण्यासाठी त्यांचा दृष्टिकोन जाणून घेण्याचा प्रयत्न करून, केंद्र सरकारच्या निती आयोगाने, 'चॅम्पियन्स ऑफ चेंज' ही संकल्पना वास्तवात आणण्यासाठी पहिला उपक्रम हाती घेतला. महत्वाचे निर्णय घेणाऱ्या या उच्च सरकारी अधिकाऱ्यांनी उद्योजकांचे सादरीकरण पाहिले, त्यांचे मुद्दे जाणून घेतले. प्रभावी प्रशासनासाठी त्याचबरोबर या सुधारणा प्रक्रियेत येणाऱ्या आव्हानांकडे, मुद्यांकडे सर्व बाजूनी विचार करून धोरण आखण्यासाठी हे निश्चितच फायदेशीर ठरणार आहे. या उपक्रमामुळे,युवकांच्या संकल्पनेतला भारत साकारण्यासाठी अधिक कल्पक आणि नाविन्यपूर्ण मंच लाभण्यात सुलभता येईल, उत्सुकता जोपासण्यासाठी पद्धतशीर सुधारणा होतील. त्याचबरोबर युवकांच्या सृजनशीलतेला आणि कल्पकतेला वाव मिळेल.

प्रशासन विकेंद्रीकरण मॉडेल- आपल्या देशाच्या सर्वंकष सामाजिक विकासासाठी सरकारने पाऊले उचलली आहेत. देशातल्या सर्व नागरिकांसाठी प्रभावी प्रशासनाकरिता सरकारने ठळक सुधारणा केल्या.कालबाह्य झालेले १२०० कायदे रद्दबातल करणे, प्रधान मंत्री जन धन योजनेद्वारे बँकिंग आणि वित्तीय क्षेत्राची व्यापकता समाजाच्या तळागाळातल्या व्यक्तीपर्यंत वाढवणे, प्रशासकीय प्रक्रियेचे विकेंद्रीकरण करून ती

पारदर्शी करणे, गव्हर्मेंट ई मार्केट प्लेस द्वारे व्यापारात भागीदार बनण्याची संधी उपलब्ध करून देणे, यांचा यात समावेश आहे. प्रभावी प्रशासनाने सर्व राज्यांना विकासासाठी बळ पुरवले आहे. समाजाच्या सेवेकरिता सर्वतोपरी प्रयत्न करण्यासाठी राज्यांना प्रोत्साहन मिळत आहे. स्त्री-पुरुष समानता, दळणवळण, कृषी विकास, हवामान बदल, नवीकरणीय ऊर्जा, वित्तीय क्षेत्रात डिजिटल परिवर्तन,अशा अनेक उत्कृष्ट उपक्रमांनी नव भारताचा मार्ग प्रशस्त केला आहे. युवा वर्गाच्या आशा-आकांक्षा आणि स्वप्नाची पूर्ती करणारा नव भारत.

नाविन्याचा ध्यास घेतलेली, कल्पक भावी पिढी तयार करण्यासाठी, नाविन्याचा शोध घेणारी दहा लाख मुले आणि युवा घडवण्याचे भारताचे उद्दिष्ट आहे.देशकार्य करणाऱ्या प्रत्येकाचे कार्य मोलाचे आहे, अशी भावना गांधीजींनी प्रत्येकाच्या मनात जागृत केली. महात्मा गांधींनी स्वातंत्र्य लढ्याला जन आंदोलनाचे स्वरूप दिले आणि त्याचा परिणाम आपण पाहिला.त्याप्रमाणे भारताचा विकास ही जन चळवळ बनवण्याची गरज आहे. आपण सर्वानी एकत्र येऊन कार्य केले तर आपल्या देशाला भेडसावणाऱ्या प्रत्येक समस्येवर आपण तोडगा काढू शकतो.नव भारत निर्मितीत येणारी आव्हाने दूर करण्यासाठी आपल्या बलस्थानाचा उपयोग करणे ही समाज म्हणून आपली जबाबदारी आहे. अटल इनोव्हेशन मिशन, नॅशनल आयपीआर पॉलिसी, स्टार्ट अप इंडिया,यासारख्या सरकारच्या उपक्रमाद्वारे, नीती आयोगाने, चॅम्पियन्स ऑफ चेंज' साठी मार्गदर्शन केले. डिजिटल अर्थव्यवस्थेमुळे विकासाला चालना मिळाली आहे.

अटल इनोव्हेशन मिशन (एआयएम) : कल्पकता, उद्योजकता, शिक्षण व्यवस्थेतले विकेंद्रीकरण याद्वारे देशाचा विकास साधण्याचे एआयएमचे उद्दिष्ट आहे. विचार कसा करायचा आणि आता कोणता विचार करायचा हे मुलांना शिकवले पाहिजे.मात्र आपण त्यांच्यावर, काळजी घे, बोलू नको, यावर चढू नको, कपडे मळवू नको, हे करू नको आणि ते करू नको, अशा सूचनांचा भडीमार करत असतो. ही यादी वाढतच जाते. आपल्या अनुभवावर या सूचना आधारलेल्या असतात हे मान्य. या सूचना मुलाच्या विचारप्रक्रियेवर अधिराज्य करतात. त्यामुळे त्यांच्या मनात भीती,पूर्वग्रह,आत्मविश्वासाचा आणि जिज्ञासेचा अभाव बळावतो. याचा परिणाम म्हणजे त्या मुलाला मोजकेच मित्र राहतात,सामाजिक वर्तुळही मर्यादित राहते आणि त्याचे वाचनही कमी राहते.अशा मुलामध्ये उत्साह आणि जोश फारसा आढळत नाही आणि प्रेरणेचाही अभाव दिसून येतो.

**प्रभावी प्रशासनाकरिता सरकारने ठळक सुधारणा केल्या.कालबाह्य झालेले १२०० कायदे रद्दबातल करणे,प्रधान मंत्री जन धन योजनेद्वारे बँकिंग आणि वित्तीय क्षेत्राची व्यापकता समाजाच्या तळागाळातल्या व्यक्तीपर्यंत वाढवणे, प्रशासकीय प्रक्रियेचे विकेंद्रीकरण करून ती पारदर्शी करणे, गव्हर्मेंट ई मार्केट प्लेस द्वारे व्यापारात भागीदार बनण्याची संधी उपलब्ध करून देणे, यांचा यात समावेश आहे.**

मुलांना अशा बंधनांनी जखडताना, वडीलधाऱ्यांना याचा पूर्ण विसर पडतो की आपण बालपणी अनेक गोष्टी स्वानुभवातून आणि चिकाटीतून शिकलेल्या असतो.

अंगभूत कौशल्याचा पुरेपूर उपयोग करता यावा या दृष्टीने महान गुरु, आपल्या शिष्यामध्ये, निर्णायक विचार शक्ती,सुरक्षाविषयक जाणीव आणि कोणत्याही परिस्थितीत शांतपणे विचार करण्याची क्षमता या तीन आवश्यक मनोधारणांची बैठक पक्की करतो. मुलांच्या आवडीनिवडी आणि छंद कोणतेही असले तरी पालकांनी आणि मुलांच्या गुरुजनांनी त्यांना,योग्य गोष्टीचे योग्य पद्धतीने निरीक्षण करणे शिकवलेच पाहिजे.

'सर्वसाधारणपणे मुल दिवसभरात अनेक सोपे आणि कधी कधी अर्थहीन प्रश्न विचारते, मात्र ते शाळेशी परिचित झाले की १० ते १२ वर्षापर्यंतच्या मुलाला जाणवू लागते की विचारपूर्वक प्रश्न विचारण्यापेक्षा, प्रश्नाचे अचूक उत्तर मिळवण्याला जास्त महत्व आहे.'

**चिमुकल्या मनात मोठ्या कल्पनांना खतपाणी**

भू सुरुंग निकामी करणे आणि धोकादायक भागाची माणसाकरवी इंच इंच तपासणी करणे ही अतिशय संथ,कठीण,धोकादायक आणि कष्टप्रद प्रक्रिया आहे.भू सुरुंग असण्याची दाट शक्यता असलेल्या भागाची धातू शोधक यंत्राद्वारे तपासणी करणे आवश्यक आहे. एखादी संशयास्पद वस्तू आढळल्यास ती काळजीपूर्वक निकामी केली पाहिजे.

छत्तीसगड मधल्या हथबंध इथल्या उच्च माध्यमिक विद्यालयातल्या विद्यार्थ्यांना त्यांच्या कारागिरीचे कौशल्य समृद्ध करण्याचे शिक्षण देण्यात आले आणि या विद्यार्थ्यांनी या प्रश्नांची दखल घेत ध्वनी तंत्रज्ञानाचा वापर करत त्यावर आधारित सुरुंग शोधक उपकरण आणले.संवेदक तंत्राचा वापर करत ध्वनी लहरींच्या फ्रिक्वेन्सीमधला बदल हे उपकरण टिपते. त्यामुळे सुरुंग असल्याची सूचना देणारा गजर वाजतो.स्मार्ट फोन,ब्लु टूथ यासारख्या दूरसंवेदकाद्वारे हे उपकरण नियंत्रित करता येते आणि सध्याच्या पद्धतीपेक्षा हे खूपच वेगवान आहे.या उपकरणासाठी नऊ व्होल्ट ऊर्जेचा वापर केला जातो आणि पाच मिनिटात या यंत्राची जुळणी करता येते.

जगभरातल्या अंध व्यक्ती, आपल्या वाटेत येणारे अडथळे जाणण्यासाठी काठीचा उपयोग करत अपघात टाळण्याचा प्रयत्न करतात. मात्र ही संपूर्ण सुरक्षित पद्धत नाही. सोपा मात्र तंत्रज्ञानावर आधारित असा उपाय यासाठी गरजेचा असून ज्याद्वारे अंध व्यक्तींना प्रभावीपणे मार्गदर्शन करता येईल.

बेंगलुरूच्या उत्तरहाळी माध्यमिक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी,अटल टिंकरिंग मंचाचा उपयोग करत, अंधांसाठी, कंपन लहरींचा उपयोग करणारे, संवेदक बसवून त्याद्वारे अडथळा शोधणारे उपकरण निर्माण केले. ध्वनी लहरी आणि कंपना वरून हे उपकरण त्या व्यक्तीला सूचित करत अपघात टाळण्यासाठी मदत करते.

**अटल टिंकरिंग प्रयोगशाळेतल्या शिक्षणाचा उपयोग करत,ध्वनी लहरीवर आधारित, रिमोट कंट्रोल अग्निशमन यंत्र विकसित करण्याचा प्रयत्न केला. ध्वनी तंत्राचा उपयोग करत आग विझवण्यासाठी मदत करणारा रोबो या विद्यार्थ्यांनी तयार केला. आगीपासून दूर अंतरावरून या रोबोवर नियंत्रण ठेवता येते.४०-४०० हर्ट्झ इतक्या कमी कंपनाच्या लहरींचा वापर करत आग विझवण्यासाठी मदत केली जाते.**

अंध व्यक्तींना मार्गदर्शन करणारे भरवशाचे उपकरण निर्माण करून, त्यांच्यासाठी सोपा आणि प्रभावी मार्ग काढून त्यांना सहकार्य करण्याचा विद्यार्थ्यांचा प्रयत्न होता.

सध्या, सर्वच कार्यालये आणि गृह संकुलात,अवजड अग्निशमन यंत्रे असतात. अरुंद रस्ते,वाहतुकीची कोंडी यामुळे बरेचदा अग्निशमन सेवा वेळेवर उपलब्ध होण्यात अडचणी येतात.या समस्येवर मात करण्यासाठी प्रभावी आणि किफायतशीर तोडग्याची आवश्यकता आहे.

चंदीगडच्या सेक्टर ३७ 'बी' मधल्या सिनियर सेकंडरी विद्यालयातल्या विद्यार्थ्यांनी, अटल टिंकरिंग प्रयोगशाळेतल्या शिक्षणाचा उपयोग करत,ध्वनी लहरीवर आधारित, रिमोट कंट्रोल अग्निशमन यंत्र विकसित करण्याचा प्रयत्न केला. ध्वनी तंत्राचा उपयोग करत आग विझवण्यासाठी मदत करणारा रोबो या विद्यार्थ्यांनी तयार केला. आगीपासून दूर अंतरावरून या रोबोवर नियंत्रण ठेवता येते.४०-४०० हर्ट्झ इतक्या कमी कंपनाच्या लहरींचा वापर करत आग विझवण्यासाठी मदत केली जाते. तंत्रज्ञानावर आधारित हा कल्पक उपाय असून वजनाला हलका आणि ने-आण करण्यासाठी सुलभही आहे.

रस्त्यावर पाणी तुंबणे ही पण एक मोठी समस्या ठरत आहे.मुसळधार पावसामुळे अहमदाबादमधल्या बेस्ट हायस्कुलमधल्या विद्यार्थ्यांना अनेकदा सक्तीची सुटी घ्यावी लागे. शाळेकडे जाणारे रस्ते खोलगट भागात असल्याने पावसाळ्यात या रस्त्यावर पाणी साचते.कधी कधी नागरिकांना इथे वावरणे अशक्य होते आणि वाहतुकीच्या कोंडीने त्यात आणखी भर पडते.

अटल टिंकेरींग प्रयोगशाळेत, विद्यार्थ्यांनी अशा प्रारूपावर काम केले, ज्याद्वारे पावसाळ्यात ज्या

भागात पाणी साठलेले असेल त्याचे मोजमाप या द्वारे घेऊन ही माहिती महापालिकेकडे पाठवली जाईल. त्याचबरोबर त्या भागातल्या सुपरवायझरलाही याची माहिती मिळून त्यावर योग्य ती पावले उचलली जातील.

आसाममधल्या मालीगाव इथल्या रेल्वे केंद्रीय विद्यालयातल्या विद्यार्थ्यांनी या समस्येकडे वेगळ्या दृष्टिकोनातून पाहत अशी यंत्रणा निर्माण केली जी रस्त्यावर पाणी किती साठले आहे हे जाणून शहरातल्या विविध भागातल्या नागरिकांना मोबाईल फोनद्वारे आणि एस एम एस मार्फत ही माहिती देऊन त्यांना या यंत्रणेमार्फत सतर्कतेचा संदेश देता येतो, त्यामुळे वाहतूक कोंडीही टाळता येते. वसाहतींजवळच्या वनक्षेत्रातून बिबट्या कोठून प्रवेश करतो हे शोधून काढणाऱ्या उपकरणासाठीही हे विद्यार्थी प्रयत्नशील आहेत. वन अधिकाऱ्यांच्या मदतीने सावधानतेचा इशारा देणारी यंत्रणा बसवता येईल जी, बिबट्या ज्या ठिकाणाहून हद्दीत शिरला आहे तिथून सक्रिय होईल आणि ज्या वेळी बिबट्या वन क्षेत्र सोडून शहराच्या हद्दीत शिरेल त्या वेळी संबंधित यंत्रणेला सतर्क करेल. बिबट्या शहराच्या हद्दीत जाऊन नागरिकांना इजा पोहोचवण्याच्या आत, संबंधित यंत्रणेला सतर्कतेचा इशारा मिळून योग्य ती पाऊले उचलता येतील.

हा उपाय कदाचित फारच छोटा असेल पण सामाजिक प्रश्न सोडवण्यासाठी तंत्रज्ञानाचा आधार घेण्याच्या दृष्टिकोनासाठी उत्साहवर्धक आहे. डॉक्टर एपीजे अब्दुल कलाम यांनी तंत्रज्ञानाच्या माध्यमातून समाजात परिवर्तन घडवण्यासाठी अथक प्रयत्न केले.देशाच्या युवा पिढीला आणि विद्यार्थ्यांना स्फूर्ती आणि प्रेरणा देण्याला त्यांनी सदैव महत्व दिले. त्यांच्या जीवनापासून प्रत्येक भारतीयाने शिकण्यासारखे खूप आहे.आपल्याला शिक्षक म्हणून सदैव ओळखले जावे अशी त्यांची इच्छा होती. २१ व्या शतकात, विद्यार्थी आणि युवा वर्गच आपल्या देशाचा पाया भक्कम करेल, हे त्यांनी जाणले होते.त्यांची भाषणे मुलांसाठी नेहमीच प्रेरणादायी राहिली आहेत. मुलांमध्ये आणि युवकांमध्ये निर्णायक विचारशक्ती वाढवण्यासाठी उत्तम उपाय म्हणजे त्यांना नेहमी चौकटीबाहेर विचार करण्याची सवय लावा, भोवतालच्या परिसराचे निरीक्षण करून त्यातल्या समस्या जाणून त्या सोडवण्यासाठी त्यांना प्रोत्साहन द्या. त्यांच्या अपयशातून त्यांना शिकू द्या,निरीक्षणावर आधारित त्यांची मते, त्यांचे विचार मांडण्यापासून त्यांना रोखू नका. प्रत्येकाने आयुष्यात उच्च ध्येय ठेवले पाहिजे कारण अल्प उद्दिष्ट ठेवणे म्हणजे गुन्हा आहे, असे त्यांचे विद्यार्थ्यांना आणि युवकांना सांगणे होते.म्हणूनच उच्च उद्दिष्ट ठेवण्याच्या दृष्टीने विचारप्रक्रिया घडवण्यासाठी विद्यार्थ्यांना मदत करा,समस्यांच्या निराकरणासाठी, त्यांच्या कल्पनांची त्यांना अंमलबजावणी करायला वाव द्या. त्यातूनच नवनिर्मितीकडे वाटचाल होणार आहे.यामुळे नव्या गोष्टी शोधायला आणि त्याबाबत इतरांना माहिती देण्याची क्षमता विकसित व्हायला खतपाणी मिळेल. त्यातून त्यांना स्वनिर्मितीचा आनंद मिळेल आणि त्या शोधातून अचूकतेकडे जाण्यासाठी बळ मिळेल. समाजाच्या तळाला भेडसावणाऱ्या प्रश्नांची उकल करण्यासाठी विज्ञान,तंत्रज्ञान, अभियांत्रिकी आणि गणिताचे (एस टी इ एम )महत्व त्यांना शिकू द्या.यामुळे समस्येवर उत्तम उपाय शोधण्यासाठी विश्लेषणात्मक कौशल्य विकसित होईल.यशस्वी होण्यासाठी शिकण्याची प्रक्रिया अविरत सुरु ठेवली पाहिजे आणि ज्ञान प्राप्तीसाठी परिश्रम घेतले पाहिजेत. 'कॅप्टन' बनून समस्यांचे निराकरण करा असे कलाम यांचे विद्यार्थ्यांना सांगणे असे. ज्ञान वृद्धीसाठी आणि

**स्टीव्ह जॉब्स,बिल गेट्स आणि इतर उद्योजक एका रात्रीत घडले नाहीत.एखाद्या क्षेत्रातली तज्ञ व्यक्ती एका काळी नवखी होती हे विद्यार्थ्यांनी अनुभवातून शिकले पाहिजे. वंदनीय व्यक्तित्व बनण्यासाठी अनेक वर्षे खर्ची घालावी लागतात. आपल्या चुका या व्यक्तींनी व्यर्थ घालवल्या नाही तर त्यातून बोध घेतला. युवकाच्या मनात जिज्ञासा, सृजनशीलता आणि कल्पकता वाढीला लागावी असे ए टी एल चे उद्दिष्ट आहे.**

उद्दिष्ट साध्य करण्यासाठी, आपण आयुष्यभर विद्यार्थी आहोत हे अगदी पालक आणि शिक्षकांनी सुद्धा लक्षात घेणे महत्वाचे आहे. बालकांप्रमाणेच प्रत्येकाला आपली निर्मिती आपले सहकारी,सहाध्यायी आणि शिक्षकांना सांगण्यात मोठा आनंद लाभतो कारण ते स्फूर्ती देणारे मोठे घटक असतात.शिक्षक आणि पालक जेव्हा मुलाच्या कामाचे कौतुक करून त्याला पाठबळ देतात. त्यातून त्याचा आत्मसन्मान वाढतो आणि एस टी इ एम प्रति त्याचा ओढा वाढतो. प्रशंसोद्गार,वर्गात त्या विद्यार्थ्यांची स्तुती अशा स्वरूपात हे प्रोत्साहन असू शकते.अशा प्रशंसेमुळे नवी आव्हाने पेलण्यासाठी नवा जोश प्राप्त होतो, प्रोत्साहन मिळते. हेच तत्व इतर वयोगटातल्या व्यक्तींनाही त्याच्या व्यावसायिक कारकिर्दीसाठी लागू होते. स्टीव्ह जॉब्स,बिल गेट्स आणि इतर उद्योजक एका रात्रीत घडले नाहीत.एखाद्या क्षेत्रातली तज्ञ व्यक्ती एका काळी नवखी होती हे विद्यार्थ्यांनी अनुभवातून शिकले पाहिजे. वंदनीय व्यक्तित्व बनण्यासाठी अनेक वर्षे खर्ची घालावी लागतात.आपल्या चुका या व्यक्तींनी व्यर्थ घालवल्या नाही तर त्यातून बोध घेतला. युवकाच्या मनात जिज्ञासा, सृजनशीलता आणि कल्पकता वाढीला लागावी असे ए टी एल चे उद्दिष्ट आहे.महत्वाचे प्रश्न सोडवण्याच्या दृष्टीने आपल्या कल्पना मांडण्यासाठी आणि त्या एकमेकांना सांगण्यासाठी देशाच्या होतकरू प्रतिभेसाठी ए टी एल हा मंच उपलब्ध आहे. एस टी इ एम शिक्षण,संपर्क,रोबोटिक्स आणि इतर साहित्यासह सुसज्ज असा मंच ए टी एल द्वारे, युवा विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिला जातो, ज्यायोगे त्यांना मनोरंजनातुन शिक्षणही घेता येते. दैनंदिन जीवनातल्या समस्यांवर तंत्रज्ञानावर आधारित उपाय शोधण्यासाठी, विद्यार्थ्यांकरिता, मंच म्हणून त्याच बरोबर युवकांना संशोधन आणि कल्पकतेला मोठ्या प्रमाणात उद्युक्त करण्याचे काम ए टी एल करते. उद्योजक म्हणून त्यांची जोपासना व्हावी यासाठी संधीही त्यांना उपलब्ध करून दिली जाईल. वैज्ञानिक साधने आणि उपकरणे पुरवून विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला आणि सृजनशीलतेला वाव देत प्रयोगात्मक शिक्षण ही संकल्पना राबवण्याचा ए टी एल चा मानस आहे. सध्या ३३ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशात ९४१ मान्यताप्राप्त शाळांमध्ये, देशाच्या ५५%जिल्ह्यात ए टी एल ची व्याप्ती आहे.देशाच्या सर्व जिल्ह्यात व्याप्ती वाढवण्यासाठी या वर्षात १३०० आणखी ए टी एल सुरु करण्याचा प्रयत्न आहे. संपूर्ण युवा पिढीपर्यंत मग तो युवक ग्रामीण भागातल्या खेड्यातला असो वा शहरी भागातला असो, त्या सर्वांपर्यंत ए टी एल पोहोचावे असा निर्धार आहे. हा उपक्रम प्रभावी ठरावा यासाठी समुपदेशन कार्यक्रमात विद्यार्थी आणि शिक्षकांनाही समाविष्ट करण्यात येईल.सृजनशील भारत-नाविन्यपूर्ण भारत हे स्वप्न सत्यात उतरण्यासाठीच्या प्रदीर्घ प्रवासाची ही केवळ सुरवात आहे. सृजनशीलता आणि नाविन्यपूर्ण कल्पकतेला खऱ्या अर्थाने चालना देण्यासाठी आणि त्यातून उद्योजकतेला प्रोत्साहन देण्यासाठी आणि सामाजिक- आर्थिक आणि सांस्कृतिक विकासाला चालना देणारा सृजनशील भारत- नाविन्यपूर्ण भारत. प्रत्येक भारतीयासाठी महानता आणि अभिमानाचे स्थान राहणारा,देशात विकास अग्रस्थानी ठेवणारा,संरचनात्मक मूलगामी सुधारणा राबविणारा आणि शाश्वत विकास साध्य करण्यासाठी नावीन्यतेवर आधारित परिवर्तनाला प्रोत्साहन देण्यासाठी अभूतपूर्व उपक्रमांचा अंगीकार करणारा भारत, असे भारताच्या भविष्याचे चित्र विद्यार्थ्यांनी रेखाटले आहे.

■■■

*लेखक बौद्धिक संपदा आणि नाविन्यपूर्ण उपक्रम क्षेत्रातील व्यावसायिक असून सध्या 'निती' आयोगातील अटल इनोव्हेशन मिशन मध्ये कार्यरत आहेत.*

*email : pandit.unnat@nic.in*

# विकास आराखडा

## भारतात बुलेट ट्रेनचा 'प्रवास' सुरु



मुंबई आणि अहमदाबाद या दोन शहरांदरम्यान धावणार असणाऱ्या भारतातील पहिल्या अतिवेगवान अशा 'बुलेट ट्रेन' प्रकल्पाची पायाभरणी १४ सप्टेंबर २०१७ रोजी अहमदाबादेत करण्यात आली. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि जपानचे पंतप्रधान शिंजो आबे यांच्या हस्ते या प्रकल्पाची पायाभरणी करण्यात आली. याप्रसंगी पंतप्रधान मोदी यांनी नव्या भारताच्या मोठ्या महत्वाकांक्षा आणि प्रबळ इच्छाशक्तीचा उल्लेख केला.

मुंबई-अहमदाबाद हाय स्पीड रेल (एमएएचएसआर) प्रकल्प अर्थात मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन हा एक नवी दिशा देणारा प्रकल्प असून सुरक्षित, वेगवान प्रवास आणि उत्तम सुविधा यांचा समावेश असलेले नवे युग या प्रकल्पाच्या रूपात भारतीय रेल्वेच्या इतिहासात अवतरणार आहे.

प्रकल्पास लागणार कमी खर्च

मोठे पायाभूत सुविधा प्रकल्प बहुधा कर्जाच्या रकमेतूनच उभारले जातात. त्यातही व्याजाची रक्कम मोठी असते. बुलेट ट्रेन प्रकल्पासाठी मात्र जपान सरकारने भारताला केवळ ०.१ टक्के इतक्या अल्पदराने तब्बल ८८००० कोटी रुपये कर्ज उपलब्ध करून दिले आहे. त्याच्या परतफेडीसाठीही तब्बल ५० वर्षांची मुदत देण्यात आली आहे. उभय देशांदरम्यान झालेल्या सहकार्य करारामुळे हे शक्य झाले आहे. विशेष म्हणजे कर्जाची परतफेड कर्ज मिळाल्यानंतरच्या १५ वर्षानंतर सुरु होणार आहे.

अशा प्रकारचे कर्ज जागतिक बँक किंवा इतर वित्तीय संस्थाकडून घ्यायचे असेल तर ५-७ टक्के व्याजदर आकारला जातो. शिवाय परतफेडीचा कालावधीही २५ ते ३५ वर्ष इतकाच ठेवला जातो. त्या तुलनेत जपानकडून खूपच स्वस्त दराने कर्ज मिळणार आहे.या कर्जामुळे आपल्या देशासमोर उपलब्ध असलेल्या आर्थिक स्रोतांवरही कोणताही बोजा पडणार नाही. कारण, प्रकल्प खर्चाच्या ८० टक्क्यांहून अधिक रक्कम थेट जपान सरकार देणार आहे. भारताच्या इतिहासात पहिल्यांदाच एखाद्या पायाभूत विकास प्रकल्पासाठी इतक्या लाभदायक अटीवर कर्ज मिळत आहे.

**मेक इन इंडिया**

'मेक ईन इंडिया' हे बुलेट ट्रेन प्रकल्पाचे एक प्रमुख उद्दिष्ट असून प्रकल्प पूर्ण व्हायच्या आधीच हे उद्दिष्ट पूर्ण होणे अपेक्षित आहे. उभय देशांच्या सरकारांमध्ये झालेल्या करारानुसार बुलेट ट्रेन प्रकल्पाद्वारे 'मेक ईन इंडिया' आणि तंत्रज्ञानाचे हस्तांतरण ही दोन उद्दिष्ट्ये ठेवण्यात आली आहेत. यासाठी कृती दल आणि चार उपगट काम करणार आहेत. उभय देशांच्या उद्योग प्रतिनिधींमध्ये कृतिशील संवादाला सुरुवातही झाली असून येत्या काही काळात बुलेट ट्रेनशी संबंधित उत्पादनासाठी अनेक संयुक्त प्रकल्प सुरु होणे अपेक्षित आहे. यातून भारतीय उद्योग क्षेत्राला नवे तंत्रज्ञान तर मिळेलच शिवाय रोजगाराच्या अनेक संधीही निर्माण होतील. 'मेक ईन इंडिया' पुढाकारामुळे या प्रकल्पात गुंतविली जाणारी बहुतांश रक्कम भारतातच खर्च केली जाईल.



या प्रकल्पामुळे भारतातील बांधकाम क्षेत्राला नवी उभारी मिळेल. बांधकाम क्षेत्रात नवी गुंतवणूक तर होईलच शिवाय,नवे तंत्रज्ञान आणि नवी कार्य संस्कृतीही आपणास मिळेल. प्रकल्प उभारणीच्या काळात सुमारे २५००० कामगारांना रोजगार मिळेल. या कामगारांना विशेष प्रशिक्षण दिले जाईल. ज्याचा उपयोग भविष्यात भारतात अशाच प्रकारचे प्रकल्प साकारताना होईल. प्रशिक्षण कार्यक्रमाचा एक भाग म्हणून वडोदरा येथे 'हाय स्पीड रेल्वे ट्रेनिंग इन्स्टिट्यूट' उभारण्यात येत आहे.


जपानमधील इन्स्टिट्यूट प्रमाणेच या ठिकाणी सिम्युलेटर्स आदि प्रकारचे सर्व अत्याधुनिक साहित्य आणि उपकरणे प्रशिक्षणासाठी उपलब्ध असतील. २०२० सालापर्यंत हे प्रशिक्षण केंद्र कार्यान्वित होईल आणि पुढील तीन वर्षांमध्ये सुमारे ४००० भारतीय कर्मचाऱ्यांना याठिकाणी प्रशिक्षित केले जाईल. याच कर्मचाऱ्यांकडून नंतर बुलेट ट्रेनचे परिचालन आणि देखभाल दुरुस्तीची कामे करून घेतली जातील. त्यामुळे प्रत्येक वेळी विदेशी तंत्रज्ञांची मदत घेण्याची गरज पडणार नाही. भविष्यातील मनुष्यबळ विकास कार्यक्रमाचा भाग म्हणून भारतीय रेल्वेच्या ३०० तरुण अधिकाऱ्यांना सध्या जपानमध्ये हाय स्पीड ट्रॅक टेक्नॉलॉजिचे प्रशिक्षण दिले जात आहे. याशिवाय दीर्घकालीन नियोजन म्हणून जपानमधील विद्यापीठांमध्ये पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या २० जागा भारतीय विद्यार्थ्यांसाठी दरवर्षी राखून ठेवल्या जाणार असून या कार्यक्रमासाठी जपान सरकार निधी उपलब्ध करून देणार आहे.

बुलेट ट्रेनसाठी वापरण्यात येणारे शिंकासेंन तंत्रज्ञान अत्यंत विश्वसनीय आणि सुरक्षित मानले जाते. या तंत्रज्ञानावर आधारित बुलेट ट्रेनचा जपानमध्ये मागील ५० वर्षात एकही अपघात झालेला नसून रेल्वे उशिराने धावण्याचा सरासरी वेळ एक मिनिटाहून कमी आहे.

■■■

# संकल्प ते सिध्दीसाठी महाराष्ट्राचे समर्थ योगदान

**- सुरेश वांदिले**



**नवा भारत घडवण्याचे स्वप्न प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी बघितले आहे. माजी राष्ट्रपती डॉ.ए.पी.जे अब्दूल कलाम यांनी सांगितलं होतं की कोणतेही स्वप्न हे दिवसा बघा आणि त्याचा पाठपुरावा करा. श्री मोदी यांनी नव भारताच्या निर्मितीचे बघितलेले हे स्वप्न असेच दिवसा बघितलेले आहे. हे स्वप्न वास्तवात यावे यासाठी त्यांनी स्वंयस्पष्ट दिशा निर्धारित केली आहे. त्यांनी या दिशेला दिलेले नाव आहे, संकल्प ते सिध्दी.**

आपला देश सध्या एका संक्रमणातून जात आहे. हे संक्रमण आहे देशाला एका नव्या उंचिवर नेऊन ठेवण्याच्या महत्वाकांक्षेला मूर्त रुप मिळावे म्हणून प्रयत्नांची दिशा सुनिश्चित करण्याचे. नवा भारत घडवण्याचे स्वप्न प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी बघितले आहे. माजी राष्ट्रपती डॉ.ए.पी.जे अब्दूल कलाम यांनी सांगितलं होतं की कोणतेही स्वप्न हे दिवसा बघा आणि त्याचा पाठपुरावा करा. श्री मोदी यांनी नव भारताच्या निर्मितीचे बघितलेले हे स्वप्न असेच दिवसा बघितलेले आहे. हे स्वप्न वास्तवात यावे यासाठी त्यांनी स्वंयस्पष्ट दिशा निर्धारित केली आहे. त्यांनी या दिशेला दिलेले नाव आहे, संकल्प ते सिध्दी.

९ ऑगस्टच्या क्रांतीदिनी प्रधानमंत्र्यांनी याचे सुतोवाच केले. यासाठी त्यांनी ९ ऑगस्टचाच दिवस निवडला कारण, गांधीजींनी या दिवशी १९४२ साली इंग्रजांना चले जाव असे ठणकावून सांगितले आणि पुढे पाच वर्षात म्हणजे १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत स्वतंत्र झाला. पाच वर्षाच्या कालावधीत क्रांती घडली. अशीच क्रांती पंतप्रधान मोदी यांना घडवायची आहे. ९ ऑगस्ट २०१७ ते १५ ऑगस्ट २०२२ या पाच वर्षात त्यांना भारत भ्रष्टाचार मुक्त, दारिद्र्य मुक्त, संप्रदाय मुक्त,जातवाद मुक्त, अस्वच्छता मुक्त, भ्रष्टाचार मुक्त करावयाचा आहे. त्यासाठी त्यांनी हा, संकल्प ते सिध्दी म्हणजेच, आजच्या काळातला अनेक अनिष्ट बाबींसाठी चले जावचा नारा दिला आहे. गांधीजींनी १९४२ साली हीच अपेक्षा प्रत्येक भारतीयाकडून व्यक्त केली होती. तेव्हा प्रत्येकाने आपले सर्वस्व दिले आणि देशाला पारतंत्र्याच्या बेडीतून मुक्त केले. लोकांची ही सामूहिक शक्ती कोणतेही शिवधनुष्य उचलण्यास समर्थ असल्याचे पंतप्रधान चांगलेच जाणतात. त्यामुळेच त्यांनी प्रत्येकास संकल्प ते सिध्दी या महायज्ञात सहभागी होण्याचे आवाहन केले आहे.

**सबका साथ सबका विकास**

गेल्या तीन वर्षापासून भारत सरकारने सबका साथ सबका विकास

हा नारा देत विकासाला मानवी चेहरा देऊन देशाच्या सर्वसमावेशकता या मूळ गाभ्यास कुठेही बाधा पोहचणार नाही याची खबरदारी घेतली आहे. त्यामुळेच गेल्या तीन वर्षात प्रत्येक घटकांसाठी अनेक नाविण्यपूर्ण योजना कार्यान्वित झाल्या. यामध्ये उज्ज्वला योजना, जनधन योजना, अटल पेन्शन योजना, बेटी बचाव बेटी पढावो योजना, प्रधानमंत्री विमा योजना, सुकन्या समृध्दी योजना, मुद्रा योजना, जीवन ज्योती विमा योजना, सुरक्षा विमा योजना, प्रधानमंत्री आवास योजना, आदर्श ग्राम योजना, ग्राम सिंचन योजना, गरिब कल्याण योजना, प्रधानमंत्री जन औषधी योजना, किसान विकास पत्र, दीन दयाल उपाध्याय ग्राम ज्योती योजना आणि नुकतीच जाहीर झालेली सौभाग्य योजना यांचा ठळकरीत्या उल्लेख करता येईल. दारिद्र्य निर्मूलनाच्या दिशेने या योजनांच्या माध्यमातून टाकलेले पाऊल केवळ दमदारच नसून प्रधानमंत्र्यांच्या संकल्प ते सिध्दी या भव्य स्वप्नाच्या पूर्तीसाठी मोठे योगदान देण्याची क्षमता ठेऊन आहे.

## ऐतिहासिक नोटाबंदी

भ्रष्टाचार मुक्तीसाठी केंद्र सरकारने नोटाबंदीचा जो ऐतिहासिक निर्णय घेतला तो क्रांतीकारी होता. अशी हिम्मत हाताच्या बोटावर मोजता येतील इतक्या सुध्दा जगातील देशांना करता आलेली नाही. काळापैसा बाहेर काढणे, दहशतवांद्यांना अशा पैशाचा लाभ मिळू न देणे आणि अर्थव्यवस्थेतील साचलेपण दूर सारणे याबाबी साध्य करण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला. देशातील सामान्य नागरिकांना याचे महत्व निश्चितच पटले असून प्रांरभी काही त्रास होऊनही त्यांनी या निर्णयाच्या पाठिमागे ठामपणे उभे राहून देशकार्यासाठी आपलेही योगदान दिले.

कोणतीही क्रांती होते तेव्हा काही पडझडी अपेक्षितच असतात. नोटाबंदीनंतरही काही पडझड अपेक्षित


# Subscription Coupon

**[For New Membership / Renewal / Change of Address]**

I want to subscribe to :

**Yojana** : 1 Yr. **Rs. 230/-;** 2 Yrs. **Rs. 430/-;** 3 Yrs. **Rs. 610/-**

(Circle the period of subscription)

DD / MO No. ______________________ date ______________

Name (in block letters) : ______________________

Subscriber profile : Student / Academician / Institution / Others

Address : ______________________

Phone No. / email : ______________________

PIN : ☐☐☐☐☐☐

Please allow us 4 to 6 weeks to the despatch of the first issue.

P.S. : For Renewal / change in address, please quote your subscription number.

**सभासद शुल्क मनी ऑर्डर किंवा डिमांड ड्राफटद्वारे पाठवावे,**

**अथवा** www.bharatkosh.gov.in/product **येथे ऑनलाईन भरावे.**

होती. पण अशा क्रांतीची चांगली फळे एका विशिष्ट कालावधीनंतर दिसायला लागतात. नोटाबंदीचा निर्णय हा सुध्दा संकल्प ते सिध्दी मधील भ्रष्टाचारमुक्त भारताला नवनिर्माणाच्या दिशेने घेऊन जाणारा महत्वाचा टप्पा ठरणार आहे.

या कायद्याची अंमलबजावणी सुरु झाल्यावर ऑगस्ट २०१७ अखेर ९२ हजार २८३ कोटी महसूल संकलन झाले. ही बाब नोटाबंदीच्या निर्णयाशी अप्रत्यक्षरीत्या जोडता येते. एकूण अपेक्षित जीएसटी दात्यांपैकी जवळपास ६५ टक्क्यांनी जीएसटी चुकता करण्याची प्रक्रिया पूर्ण केल्यानंतरची ही आकडेवारी आहे. १०० टक्के जीएसटी दाते या प्रक्रियेत सहभागी होतील तेव्हा ही आकडेवारी वाढलेली असेल.

नोटाबंदीनंतर लोकांचा बचतीकडे ओढा वाढून अधिकाधिक नागरिक भांडवली बाजारात म्युच्यूएल फंडांकडे वळू लागले आहेत. रिझर्व्ह बँकेकडील तरलता (लिक्विडिटी) १०.५ लाख कोटी रुपयांपर्यंत वाढली. वर्षभरापूर्वी ती ५.२ लाख कोटी रुपये होती. तरलेत वाढ झाल्याने बँकांनी व्याजदर कमी केले. नोटाबंदीनंतर १५,४९७ कोटी रुपयांचे बेहिशेबी उत्पन्न किंवा काळा पैसा उघडा झाला. मागील वर्षीपेक्षा ही वाढ ३८ टक्क्यांची आहे. बँकामध्ये जमा झालेला पैसा हा कदाचित काळा पैसा असण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे आता ऑपरेशन 'क्लिन मनी' ही मोहीम ३१ जानेवारी पासून सुरु झाली आहे. त्यामध्ये १८ लाख संशयास्पद खात्यांची छाननी सुरु करण्यात आली आहे. आयकर परताव्यांमध्ये ३४ टक्के वाढ झाली तर वैयक्तिक प्राप्तिकराचे अग्रिम कर संकलन ४२ टक्क्यांनी वाढले.

नोटाबंदीनंतर डिजिटल अर्थकारणास गती मिळावी यासाठी प्रयत्न केले गेले. ही एक नवी सुरुवात होती. नियमित स्वरुपाच्या कार्यशैलीत बदल झाला की काही काळ त्याचा त्रास होतो. बदल स्वीकारण्यास आपण नाखुष असतो. तसे याचेही झाले. पण आता

Yojana : Published in Hindi, English, Urdu, Tamil, Telugu, Malayalam, Kannada, Gujarati, Marathi, Punjabi, Bengali, Assamese & Oriya

Send your subscription by DD / MO in the name of Director, Publications Division, addresses to :

**Advertisement & Criculation Manager, Publications Division, Ministry of Information & Broadcasting**
**Room No. 48 to 53, Soochna Bhavan, CGO Complex, Lodhi Road, New Delhi - 110003.**
**Subscriptions will arise also be accepted at our sales emporia:**

● Hall No.196, Old Secretariat, **Delhi-110054,** Ph.011-2389 0205 ● A-wing, Rajaji Bhavan, Besant Nagar, **Chennai-600090,** Ph.: 044-2491 7673 ● 8, Esplande East, **Kolkata - 700069,** Ph: 033-2248 8030 ● Bihar State Co-operative Bank Building, Ashoka Rajpath, Patna-800004. Ph.: 0612-268 3407 ● Press Road, Near Govt., Press **Thiruvananthapuram-695001,** Ph.: 0471-2330 650 ● Hall No. 1, 2nd floor, Kendriya Bhawan, Sector - H, Aliganj, **Lucknow-226024,** Ph.: 0522-232 5455 ● 701, C-Wing, 7th Floor, Kendriya Sadan, C.B.D. Belapur, **Navi Mumbai-400614,** Ph.: 022-2756 6582 ● Block 4, 1st Floor, Gruhakalpa Complex, M.G. Road, Nampally, **Hyderabad - 500001.** Ph.: 040-2460 5383 ● 1st Floor, F-Wing, Kendriya Sadan, Koramangala **Bangalore-560034.** Ph.: 080-2553 7244 ● KKB Road, New Colony, House No.7, Chenikuthi, Guwahati-781003, Ph.: 0361-2665 090 ● Ambica Complex, 1st Floor, Paldi, **Ahmedabad - 380007.** Ph.: 079-2658 8669.

**For Yojana Tamil, Telugu, Malayalam, Kannada, Gujarati, Marathi, Bengali, Assamese, Oriya, Urdu and English, Hindi - please enrol yourself with Editors of the respective at the addressess given Below;**

Editor, Yojana (Marathi), B-701, Kendriaya Sadan, C.B.D. Belapur, Navi Mumbai-400614. Ph.: 022-2756 6582
Editor, Yojana (Gujarati), Ambika Complex, 1st Floor, Paldi, Ahemdabad-380007. Ph.: 079-2658 8669
Editor, Yojana (Assamese), KKB Road, New Colony, House No. 7, Chenikuthi, Guwahati-781003. Ph.: 0361-266 5090
Editor, Yojana (Bengali), 8, Esplanade East, Ground Floor, Kolkata-700069. Ph.: 033-2248 2576
Editor, Yojana (Tamil), 'A' Wing, Rajaji Bhawan, Basant Nagar, Chennai-600090. Ph: 044-2491 7673
Editor, Yoajna (Telugu), Block No. 4, 1st Flr., Gruhakalpa Complex, M.G.Rd, Nampally, Hyderabad-500001. Ph.:040-2460 5383
Editor, Yojana (Malayalam), Press Road, Near Govt. Press, Thiruvananthapuram-695001, Ph: 0471-233 0650
Editor, Yojana (Kannada), 1st Floor, 'F' Wing, Kendriya Sadan, Koramangala, Bangalore-560034, Ph: 080-2553 7244.

डिजिटल व्यवहार वाढण्याची चिन्हे आहेत. डिजिटल व्यवहारवाढीतूनच पारदर्शकतेला अधिक चालना मिळणे अपेक्षित आहे.

सेवा आणि वस्तू कराचे वर्णन प्रधानमंत्री यांनी गुड आणि सिम्पल टॅक्स असे केले आहे. एक कर एक देश ही संकल्पना आतापपर्यंत केवळ कागदावरच होती. त्यास मूर्तरुप आणण्यासाठी चर्चाच होत राहिल्या मात्र प्रधानमंत्र्यांनी त्यापलिकडे जाऊन निर्णायक स्वरुपाची कृती केली. करजंजाळातून मुक्तीच्या दिशेने टाकलेले हे एक महत्वाचे पाऊल आहे.

**अस्वच्छतेपासून मुक्ती**

अस्वच्छतेपासून मुक्तीचा मोठा लढाच श्री मोदी यांनी आरंभला आहे. अस्वच्छता ही आपली दुसरी ओळख होऊ घातली असताना पंतप्रधानांनी या समस्येच्या सोडवणुकीकडे प्राधान्याने लक्ष केंद्रित केले. अतिशय प्रभावीरीत्या स्वच्छ भारत अभियानाचा शंख फुंकला. आपले या स्वच्छतेशी काय घेणे देणे अशी नकारात्मक भूमिका घेऊन जगणाऱ्या भारतीयांना अस्वच्छतेविरुध्द लढण्यास प्रवृत्त केले. गेल्या तीन वर्षात या अभियानास उत्तम असा प्रतिसाद मिळाला आहे. कित्येक गावे हागणदारी मुक्त झाली आहेत. उघड्यावर शौचालयास जाण्याची प्रवृत्ती निश्चितपणे कमी होत आहे. शहरी भागातील कचरा मोठ्या संख्येने काढला जात आहे. नदी किनारे, समुद्र किनारे स्वच्छ होत आहेत. हीच गती आणि उत्साह कायम राहिला तर २०२२ पर्यंत संपूर्ण भारतात स्वच्छतेचा एक नवा अध्याय सुरु झालेला आपणास दिसू शकतो.

---

**बँकामध्ये जमा झालेला पैसा हा कदाचित काळा पैसा असण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे आता ऑपरेशन 'क्लिन मनी' ही मोहीम ३१ जानेवारी पासून सुरु झाली आहे. त्यामध्ये १८ लाख संशयास्पद खात्यांची छाननी सुरु करण्यात आली आहे. आयकर परताव्यांमध्ये ३४ टक्के वाढ झाली तर वैयक्तिक प्राप्तिकराचे अग्रिम कर संकलन ४२ टक्क्यांनी वाढले.**

---

**संप्रदायमुक्ती आणि जातवाद मुक्ती**

नवा भारत घडवण्यासाठी सर्वांचे सहकार्य अत्यावश्यक ठरणार आहे. त्यामुळेच संप्रदायमुक्ती आणि जातवाद मुक्ती हे महत्वाचे उद्दिष्ट्य ठेवण्यात आले आहे. या दोन बाबींनी अनेक अर्थाने देशाचे नुकसानच केले आहे.

भारतातील जाती, या निबंधात भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी, भारत हा अनेक वंशांच्या मिश्रणातून निर्माण झालेला देश असल्याचे मत मांडले आहे. हिंदू व्ह्यू ऑफ लाइफ, या ग्रंथात डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांनी सुध्दा अशीच भूमिका मांडली आहे. आपल्या देशात भिन्न वंशियांच्या मिश्रणाची प्रक्रिया आठ ते दहा हजार वर्षापासून सुरु आहे. येथील जाती एकमेकांपासून अलग असल्यातरी त्यांच्यामध्ये या भूमिची सांस्कृतिक एकता सामावलेली असून ती अतिशय खोलवर अशी आहे..

ही बाब लक्षात घेता आपणा सर्वांना एकदिलाने आणि एका मनाने राष्ट्र कार्यासाठी एक होणे गरजेचे आहे. या शक्तीच्या एकत्रित आविष्करणातून संकल्प ते सिध्दीचा प्रवास यशदायी ठरणार आहे.

**महाराष्ट्राचा संकल्प**

देशाच्या या संकल्प सिध्दीच्या कार्यात महाराष्ट्राने अग्रेसर राहण्याचा निर्धार केला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भ्रष्टाचार मुक्ती, करजंजाळातून मुक्ती, अस्वच्छतेतून मुक्ती, प्रदुषणातून मुक्ती, शेतकऱ्यांची कर्जापासून मुक्ती, दुष्काळापासून मुक्ती, बिल्डरांच्या मनमानीपासून मुक्तीचा संकल्प केला आहे. या संकल्पानुसार महाराष्ट्राने विविध निर्णय घेतले आहेत. धोरणे आखली आहेत. योजना कार्यान्वित केल्या आहेत.

**कर्जापासून मुक्ती**

शेतकऱ्यांना कर्जापासून मुक्ती देण्यासाठी महाराष्ट्राने देशातील आजपर्यंतची सर्वात मोठी कर्जमाफी घोषित केली आहे. छत्रपती शिवाजी

महाराज शेतकरी सन्मान योजना या नावाने ही योजना कार्यान्वित करण्यात आली आहे. या योजनेंतर्गत ३४ हजार कोटी रुपयांचे शेतकऱ्यांचे कर्ज माफ केले जाणार आहे. यामध्ये सरसकट दीड लाख रुपये कर्ज माफीचा समावेश आहे. वेगवेगळया प्रकारच्या कर्जमाफीच्या सूत्रानुसार साधारणत: ८९ लक्ष शेतकऱ्यांचे कर्ज माफ होणार आहे. त्यामुळे हे सर्व शेतकरी नव्याने कर्ज मिळवण्यासाठी पात्र होतील. ही सर्व प्रक्रिया पारदर्शक, गतिमान आणि त्रुटीरहीत व्हावी यासाठी ऑनलाइन केली गेली आहे.

शेतकऱ्यांच्या शेताला शास्वत स्वरुपाचे पाणी मिळावे, त्याच्या उत्पादनात वाढ व्हावी आणि दुष्काळापासून मुक्ती मिळावी यासाठी महाराष्ट्रात जलयुक्त शिवार योजना अतिशय प्रभावीरीत्या राबवली जात आहे. ही लोकचळवळ झाली असून त्याद्वारे जलसंधारणाची कोट्यावधी रुपयांची कामे पूर्ण झाली आहेत. जलयुक्त शिवार अभियानातून गावागावांमध्ये कितीतरी कामे मूर्त स्वरुपात आली. नद्यानाल्यांचे गाळ काढले गेले. शेततळी झालीत. नाल्यांचे रुंदीकरण झाले. लोकांनी या कामांमध्ये भरभरुन योगदान दिले. गेल्या दोन वर्षात महाराष्ट्रात ११ हजार ४९३ गावांमध्ये जलसंधारणांची विविध ३ लाख ९७ हजारांहून अधिक कामे पूर्ण झाली आहेत. यामुळे २१.११ लाख हेक्टर सिंचन क्षमता निर्माण झाली. जलयुक्त शिवारच्या कामांमुळे मोठ्या प्रमाणावर टँकरमुक्ती झाली आहे. गेल्या वर्षी मे महिन्यात ६,२०० टँकर्सने पाणी पुरवठा केला जात होता. यंदा ही संख्या १२शेवर आली. १२ शेच्या आसपास गावे टँकरमुक्त झाली असून आणखी ५ हजार गावे टँकरमुक्त होण्याच्या मार्गावर आहेत. कर्जमुक्ती ते दुष्काळमुक्तीचा हा प्रवास राज्यातील शेतकऱ्यांना समृध्दीच्या नव्या दिशा दाखवणारा ठरणार आहे. या

**देशाच्या या संकल्प सिध्दीच्या कार्यात महाराष्ट्राने अग्रेसर राहण्याचा निर्धार केला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भ्रष्टाचार मुक्ती, करजंजाळातून मुक्ती, अस्वच्छतेतून मुक्ती, प्रदुषणातून मुक्ती, शेतकऱ्यांची कर्जापासून मुक्ती, दुष्काळापासून मुक्ती, बिल्डरांच्या मनमानीपासून मुक्तीचा संकल्प केला आहे. या संकल्पानुसार महाराष्ट्राने विविध निर्णय घेतले आहेत.**

सोबतच गाळयुक्त शिवाय, मागेल त्याला शेततळे, गाळमुक्त धरण अशा योजनाही कार्यान्वित करण्यात आल्या आहेत. या कामांमध्ये नद्या आणि नाले पुनरुज्जीवित झाली आहेत. शेतीतील उत्पादन वाढले आहे.काही ठिकाणी दुबार पिके घेण्यास प्रारंभ झाला आहे.

**प्रदुषण मुक्ती**

महाराष्ट्रात प्रदुषण मुक्तीसाठी योग्य दिशेने काम सुरु आहेत. विशेषत: महावृक्षलागवडीचा कार्यक्रम यशस्वी होत आहे. गेली दोन वर्षे याला चांगले यश मिळाले. यंदा पाच कोटीहून अधिक वृक्ष लागवड करण्यात आली. २०१८ मध्ये १३ कोटी आणि २०१९ मध्ये ३३ कोटी वृक्ष लागवडीचे लक्ष्य निर्धारित करण्यात आले आहे. पर्यावरण रक्षणासाठी १ कोटी नागरिकांचा सहभाग असलेल्या हरित सेनेची निर्मिती करण्याचा संकल्प सोडण्यात आला आहे. त्यासाठी आतापावेतो ३० लाख नागरिकांनी सदस्यत्व स्वीकारले आहे. मराठवाड्यात वनाचे प्रमाण कमी असल्याने दर तीन-चार वर्षांनी पाणीटंचाई व दुष्काळास सामोर जावे लागायचे. त्यामुळे मराठवाड्यात मोठ्या प्रमाणावर वृक्ष लागवड, वृक्षसंवर्धन यासाठी निवृत्त सैनिकांच्या सहाय्याने १४८ इको बटालियन स्थापन करण्यात येत आहे. रेल्वेच्या रिकाम्या जागेत आणि राष्ट्रीय महामार्गाच्या दुतर्फा वृक्ष लागवडीचे नियोजन करण्यात आले आहे.

**वायु आणि जलप्रदूषण मुक्ती**

औद्योगिकीकरण आणि नागरिकरणामुळे वायु आणि जलप्रदूषण पातळी धोकादायक पातळीवर पोहोचले आहे. या

दोन्ही प्रदूषणामुळे नागरिक अनेक आजारांना बळी पडत आहेत. हवेची गुणवत्ता चिंताजनक पातळीपर्यंत पोहचली आहे. तथापी राज्यशासन या समस्यांच्या निराकरणासाठी अनेक उपाययोजना करित आहे. अकोला, अमरावती, औरंगाबाद, बदलापूर, चंद्रपूर, जळगाव, जालना, कोल्हापूर, लातूर, मुंबई, नागपूर, नाशिक, नवी मुंबई, पुणे, सांगली, सोलापूर व उल्हासनगर या १७ शहरांमध्ये हवेतील प्रदुषण निर्धारित राष्ट्रीय हवा गुणवत्ता मानकांपेक्षा अधिक असल्याचे आढळून आहे. अशा शहरातील हवेची गुणवत्ता पातळी वाढविण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ, भारतीय प्रौद्योगिक अभियांत्रिकी संस्था, मुंबई (आय.आय.टी), राष्ट्रीय पर्यावरण अभियांत्रिकी संशोधन संस्था(नीरी) यांच्या संयुक्त विद्यमाने हवा गुणवत्ता सनियंत्रण, शुद्ध हवा संकल्प-महाराष्ट्र २०२२ या प्रकल्पाची सुरुवात झाली आहे.

राज्यातील ४९ नदी पाण्याचे पट्टे प्रदुषित असल्याचे केंद्रीय प्रदूषण मंडळाच्या अभ्यासात आढळून आले. महाराष्ट्र प्रदूषण मंडळाने या अनुषंगाने केलेल्या तपासनीत १४ नद्यांचे पट्टे अप्रदुषित निघाले. उर्वरित नद्यांमधील प्रदुषण कमी करुन पाण्याची गुणवत्ता वाढवण्यासाठी विविध उपाययोजना करण्यात येत आहेत. 'नमामी गंगे' या प्रकल्पाच्या धर्तीवरच चंद्रभागा नदीच्या प्रदूषणमुक्तीसाठी 'नमामी चंद्रभागा' ही योजना कार्यान्वित करण्यात आली आहे. त्यासाठी 'नमामि चंद्रभागा प्राधिकरण' स्थापन करण्यात आले आहे. मुळा-

**राज्यातील ४९ नदी पाण्याचे पट्टे प्रदुषित असल्याचे केंद्रीय प्रदूषण मंडळाच्या अभ्यासात आढळून आले. महाराष्ट्र प्रदूषण मंडळाने या अनुषंगाने केलेल्या तपासनीत १४ नद्यांचे पट्टे अप्रदुषित निघाले. उर्वरित नद्यांमधील प्रदुषण कमी करुन पाण्याची गुणवत्ता वाढवण्यासाठी विविध उपाययोजना करण्यात येत आहेत. 'नमामी गंगे' या प्रकल्पाच्या धर्तीवरच चंद्रभागा नदीच्या प्रदूषणमुक्तीसाठी 'नमामी चंद्रभागा' ही योजना कार्यान्वित करण्यात आली आहे.**

मुठा नदीच्या संवर्धनासाठी ९९० कोटींचा निधी केंद्राने मंजूर केला असून महानगरपालिकेतर्फे विविध कामांना प्रारंभ झाला आहे

राष्ट्रीय व राज्य नदी कृती योजनेअंतर्गतही प्रदूषण कमी करण्यासाठी विविध उपाययोजना करण्यात येत आहेत. जलसिंचन, जलयुक्त शिवार, शेततळे, नदी खोलीकरण व सरळीकरण यामुळे नद्यांचे स्त्रोत वाढले आहे. स्मार्ट शहर या योजनेमध्ये २५ टक्के निधी सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापनासाठी राखून ठेवणे संबंधित महानगरपालिका व नगरपालिकेस बंधनकारक केले आहे. या सर्व उपायांमुळे नद्यांमधील प्रदूषण कमी झाल्याचे निदर्शनास आले आहे.

महाराष्ट्र पदूषण मंडळाने वीटभट्ट्यांमुळे होणारे हवा प्रदूषण, खनीज पदार्थांच्या चढउतारामुळे व साठवणुकीमुळे होणारे प्रदूषण, टायर्सपासून तेल निर्माण करणाऱ्या उद्योगांमुळे होणारे प्रदूषण, दगडखाणीमुळे होणारे प्रदूषण रोखण्यासाठी मार्गदर्शक तत्वे तयार केली आहेत. त्यासाठी वेगवेगळे अभ्यासगट स्थापन केले आहे. या अभ्यासगटांनी काही तांत्रिक उपाय योजना सुचवल्या आहेत. त्यानुसार धुलीकण संकलन केंद्र स्थापन केले जाणार आहेत. पर्यावरणपूरक उत्पादनांसाठीची मार्गदर्शक तत्वे मंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आली आहेत. कारखान्यांच्या प्रदूषण पातळीचे मूल्यांकन करण्यासाठी पर्यावरण दक्षता केंद्र स्थापन करण्यात आले आहे. वाहतुकीमुळे होणारे प्रदूषण कमी करण्यासाठी - वायू - या संयंत्रणेची उभारणी मुंबईमध्ये विविध ठिकाणी करण्यात आली आहे. ध्वनी प्रदूषण नियम २०००ची अंमलबजावणी सुयोग्यरीत्या करण्यासाठी ध्वनी प्राधिकारी नियुक्त केले आहेत. पर्यावरण नियमांचे उल्लंघन करणारे राज्यातील ७५

कत्तलखाने बंद करण्यात आले आहेत. प्लास्टिक कॅरीबॅगवर बंदी आणण्याचा निर्णय गुढीपाडव्यापासून घेण्यात येणार आहे. कागदी पिशव्यांचा अधिकाधिक वापर नागरिकांनी करावा यासाठी प्रबोधन करण्यात येणार आहे.

**अस्वच्छेतेपासून मुक्ती**

महाराष्ट्रात नागरी आणि ग्रामीण भागात स्वच्छता अभियानाचे काम अतिशय वेगवान रितीने होत आहे. त्यामुळे स्वच्छता अभियानात राज्याने उत्तम काम केले आहे. शौचालय बांधण्याच्या उपक्रमाची प्रभावीरीत्या अंमलबजावणी झालेल्या सिंधुदुर्ग, कोल्हापूर, सातारा, रत्नागिरी, वर्धा, सांगली, ठाणे, भंडारा, पुणे, नागपूर, गोंदिया हे ११ जिल्हे हागणदारीमुक्त झाले आहेत. उर्वरित २३ जिल्हे २०१८ पर्यंत हागणदारीमुक्त करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. १६३ तालुके, २६ हजार गावे, १८ हजार ५०० ग्रामपंचायती हागणदारी मुक्त झाल्या आहेत. सिंधुदूर्ग जिल्ह्याने स्वच्छतेमध्ये देशात प्रथम क्रमांक पटकावला. २ ऑक्टोबर २०१४ नंतर ग्रामीण भागात ४३ लाखापैक्षा अधिक वैयक्तीक शौचालये बांधण्यात आली. मागील तीन वर्षात वैयक्तीक शौचालयाची व्याप्ती ८५ टक्क्यांपर्यंत वाढली.

महाराष्ट्रात गुड मार्निंग पथके सकाळी गावात फिरुन उघड्यावर शौच करणाऱ्या व्यक्तींना फुले देऊन, त्यांनी पुन्हा असे करु नये यासाठी प्रेरित करतात. जिल्हा परिषदेच्या अधिकाऱ्यांना एक एक गाव दत्तक घेण्यास सांगण्यात आले आहे. या गावात मुक्काम करुन हे अधिकारी स्वच्छतेविषयी मार्गदर्शन करतात. जालना जिल्हयात लोटाबंदी उपक्रम राबवण्यात आला. १८ लाख कुटुंबांना प्रत्यक्ष भेटी देऊन त्यांना स्वच्छतेचे महत्व समजावून सांगण्यात आले. शौचालय बांधण्याच्या कार्यक्रमाला गती येण्यासाठी एकाच दिवसात

**शौचालय बांधण्याच्या उपक्रमाची प्रभावीरीत्या अंमलबजावणी झालेल्या सिंधुदुर्ग, कोल्हापूर, सातारा, रत्नागिरी, वर्धा, सांगली, ठाणे, भंडारा, पुणे, नागपूर, गोंदिया हे ११ जिल्हे हागणदारीमुक्त झाले आहेत. उर्वरित २३ जिल्हे २०१८ पर्यंत हागणदारीमुक्त करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. १६३ तालुके, २६ हजार गावे, १८ हजार ५०० ग्रामपंचायती हागणदारी मुक्त झाल्या आहेत. सिंधुदूर्ग जिल्ह्याने स्वच्छतेमध्ये देशात प्रथम क्रमांक पटकावला.**

जास्तीत जास्त खड्डे करण्याचा उपक्रम घेण्यात आला. उस्मानाबाद जिल्हयाने १९ तासात १० हजार पेक्षा जास्त खड्डे खोदले. लातूर जिल्हात १२ तासात ८ हजार खड्डे खोदण्यात आले. ९ ते १५ ऑगस्ट या कालावधीत उघड्यावर शौचास बसण्यापासून मुक्ती हा कार्यक्रम राबविण्यात आला. स्वच्छता कार्यक्रमात लोकसहभाग अधिक वाढावा नव-नवीन कल्पना, तंत्रज्ञान यांचा वापर व्हावा या उद्देशाने नुकतीच स्वच्छथॅान ही राष्ट्रीय स्पर्धा आयोजित करण्यात आली. या स्पर्धेत महाराष्ट्राच्या स्वच्छ रेडिओ या उपक्रमाला राष्ट्रीय पातळीवर दुसऱ्या क्रमांकाचे पारितोषिक मिळाले. महाराष्ट्र स्वच्छ रेडिओ म्हणजे स्वच्छता अभियानात राबवित असलेले विविध उपक्रम, कार्यक्रम यांचे दररोज माहिती देणारे बातमीपत्र. ते व्हॅाट्सअप ग्रुपवर देण्यात येते. २०१९ पर्यंत स्वच्छ भारत करण्याचे उद्दिष्ट प्रधानमंत्री महोदयांनी निर्धारित केले आहे. मात्र राज्यात हे उद्दिष्ट्य मार्च २०१८ पर्यंतच पूर्ण करण्याचा संकल्प मुख्यमंत्री फडणवीस यांनी केला आहे.

राज्यातील नागरी भागात २ ऑक्टोबर २०१९पर्यंत सर्व शहरे घनकचरा व्यवस्थापनांतर्गत स्वच्छ करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. ३१ जुलै, २०१७ पर्यंत १५ महानगरपालिका व २६८ नगरपरिषदा / नगरपंचायती अशी एकूण ३५० हून अधिक शहरे हागणदारी मुक्त झाली आहेत. ८ महानगरपालिका व ३४ नगरपरिषदा / नगरपंचायती अशी एकूण ४२ शहरांनी हागणदारी मुक्तीचा ठराव

केला असून तपासणीच्या विविध टप्प्यावर आहेत. हागणदारी मुक्त शहरांच्या तपासणीसाठी त्रयस्त संस्थेने केलेल्या तपासणीत देशातील १० शहरांमध्ये राज्यातील पाचगणी, कागल, मुरूगुड, पन्हाळा व वेंगुर्ला या ५ शहरांचा समावेश आहे.या संस्थेची नियुक्ती केंद्रशासनाने केली आहे.

घनकचरा व्यवस्थापनाअंतर्गत शहरांचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी प्रत्येक महसूली विभागाकरिता एका संस्थेची नियुक्ती करण्यात आली आहे. डिसेंबर २०१७ पर्यंत राज्यातील सर्व शहरांचे सविस्तर प्रकल्प अहवाल तयार केले जातील. आता पर्यत २२ शहरांचे प्रकल्प तयार झाले आहेत. केंद्र शासनाच्या निधीचा पहिला हप्ता प्राप्त झाल्याने कामांना प्रारंभ झाला आहे. सर्व शहरांमध्ये घनकचरा विलगीकरण मोहीम (at Source Waste Segregation) दिनांक १ मे, २०१७ पासून राबविण्यात येत आहे. विलगीकरण केलेल्या कचऱ्यापासून कंपोस्ट खत तयार करण्यात येते. या खताच्या विक्री व विपणनासाठी 'महा हरित सिटी कंपोस्ट' हा ब्रँड नोंदणी केला आहे. घनकचरा व्यवस्थापनात राज्यातील अनेक नगरपालिका व नगरपरिषदांनी उत्कृष्ट काम केले आहे. चंद्रपूर जिल्ह्यातील बल्लारपूर नगर परिषदेने तर प्लास्टिकच्या कचऱ्याचा उपयोग रस्ते बांधणीसाठी करण्याचा अभिनव उपक्रम राबवला आहे.

**भ्रष्टाचारमुक्ती**

भ्रष्टाचारमुक्ती साठी राज्यशासनाने पारदर्शकतेला अधिकाधिक महत्व देण्याचे धोरण अवलंबले आहे. त्याअनुषंगाने सेवा हमी अधिनियमाची राज्यात अंमलबजावणी सुरु झाली आहे. "पारदर्शकता आणि जबाबदारीत शासन तडजोड करणार नाही. अधिक चांगल्या सेवा पुरविणे आणि भ्रष्टाचार संपुष्टात आणण्याकरिता सुधारणा हे शासनाचे सर्वोच्च प्राधान्य राहील. विकासाची फळे ही शेवटच्या माणसाकडे आणि शेवटच्या मैलांपर्यंत पोहोचली पाहिजेत " असे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले आहे.

**घनकचरा व्यवस्थापनाअंतर्गत शहरांचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी प्रत्येक महसूली विभागाकरिता एका संस्थेची नियुक्ती करण्यात आली आहे. डिसेंबर २०१७ पर्यंत राज्यातील सर्व शहरांचे सविस्तर प्रकल्प अहवाल तयार केले जातील. आता पर्यत २२ शहरांचे प्रकल्प तयार झाले आहेत.केंद्र शासनाच्या निधीचा पहिला हप्ता प्राप्त झाल्याने कामांना प्रारंभ झाला आहे.**

'आपले सरकार' वेबपोर्टलद्वारे ३९९ सेवा ऑनलाइन दिल्या जातात. आतापावेतो १.१४ कोटी अर्ज प्राप्त झाले. १ कोटीहून अधिक प्रकरणांमध्ये सेवा पुरवण्यात आल्या. हे प्रमाण ८८ टक्के आहे. याच पोर्टलवर १ कोटी ७७ लाख तक्रारी प्राप्त झाल्या. त्यापैकी ८५ टक्के तक्रारींचे निराकरण करण्यात आले. ७८ टक्के नागरिकांनी या निराकरणावर समाधान व्यक्त केले. शेततळ्यांसाठीची अर्ज प्रक्रिया ही ऑनलाइन पध्दतीने राबवण्यात आली. २ लाख ८३ हजारांहून अधिक अर्ज प्राप्त झाले. ५१ हजारपेक्षा अधिक शेततळी बांधून पूर्णही झालीत. अडीच कोटी शिधापत्रिकांचे डिजिटायझेशन करण्यात आले. आधार लिंकिगमुळे १० लाख शिधापत्रिका कमी झाल्या. लाभार्थ्यांची बायोमेट्रिक ओळख पटवून धान्य वितरण केले जाते. डिजिटायझेशनमुळे दरमहा ३८ हजार मेट्रिक टन धान्याची बचत झाली.

उद्योग विभागाच्या मैत्री या ऑनलाइन यंत्रणेद्वारे ७४८ घटकांच्या ८९१ अडचणींचे निराकरण केले गेले. ९० हजार कोटींच्या प्रकल्पांना या ऑनलाइन यंत्रणेचा फायदा झाला. ग्रामपंचायत पातळीवर ३०,००० आपले सरकार ऑनलाइन सेवा केंद्र सुरू करण्यात आले. रत्नागिरी, सिंधुदुर्ग व रायगड हे तीन जिल्हे वगळता इतर जिल्ह्यांमध्ये ऑक्टोबरपासून ऑनलाईन सात बारा दिला जाणार आहे. महानेट प्रकल्पामध्ये २९ हजार गावांमध्ये शाश्वत इंटरनेट सेवा पुरवली जाईल. डिसेंबर २०१८ पर्यंत हा प्रकल्प पूर्ण करण्यात येईल. डिजिटायझेशनच्या

निर्णयामुळे ४०,९१३ गावांच्या कायापालटाच्या प्रक्रियेला सुरुवात झाली आहे. राज्य शासनाच्या सर्व विभागांच्या परीक्षा महापरीक्षा या वेबपोर्टलद्वारेच घेण्यात येतील. याचा सुमारे दीड कोटी तरुणांना फायदा होणार आहे.

'महा डीबीटी' या वेबपोर्टलच्या माध्यमातून ५००० कोटी रुपयांच्या शिष्यवृत्ती थेट विद्यार्थ्यांच्या खात्यात जमा होतील. यामुळे शिष्यवृत्ती वाटपातील गैरव्यवहार संपुष्टात येईल. सुयोग्य ५० लक्ष विद्यार्थ्यांनाच लाभ मिळेल. निर्धारित केलेल्या मापदंडानुसार व गुणवत्ता असलेले प्रकल्प ऑनलाइन सादर करणे बंधनकारक असल्याने महावास्तू या वेबपोर्टलच्या माध्यमातून इमारत बांधणी प्रकल्पाचे गैरव्यवहार थांबतील. त्यामुळे भ्रष्टाचाराला वाव उरणार नाही. कर्जमाफीचे अर्ज सादर करण्यासाठी ऑनलाइन अर्ज भरणे बंधनकारक केल्याने खऱ्या कर्जबाजारी शेतकऱ्यालाच कर्जमाफिचा लाभ मिळणे सुनिश्चित झाले आहे.

**बिल्डरांच्या मनमानीपासून मुक्ती**

बिल्डरांच्या मनमानीपासून मुक्तीसाठी महारेरा (महाराष्ट्र रिअल इस्टेट रेग्युलेटरी अथॉरिटी- स्थावर संपदा प्राधिकरण) ची स्थापना करण्यात आली. असे प्राधिकरण स्थापन करण्यात आलेले महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरले आहे. बांधकाम व्यावसायिकांबाबतच्या तक्रारींचे गतिने निराकारण हे प्राधिकरण करेल. घर ग्राहकांची फसवणूक होऊ नये यासाठी आता प्रत्येक विकासकास त्याच्या प्रस्तावित आणि चालू असलेल्या प्रकल्पांची नोंदणी महारेराकडे बंधनकारक करण्यात आली आहे. बांधकाम प्रकल्पाची संपूर्ण माहिती (इमारत आराखडा/ सदनिकेची वैशिष्ट्ये/ सोयीसुविधा/ करारपत्र/ कन्व्हेएन्स डीड) सुध्दा या विकासकास महारेराच्या संकेतस्थळावर ठेवावी लागेल. गृहनिर्माण प्रकल्प वेळेवर पूर्ण करणे विकासकांना बंधनकारक करण्यात आले आहे. विकासकाच्या प्रत्येक खात्याचे दरवर्षी लेखा परीक्षण केले जाईल. यापुढे विकासकास हवे तसे आराखड्यात बदल करता येणार नाहीत. तसे करावयाचे असल्यास ग्राहकाची परवानगी घ्यावी लागेल. निर्धारित वेळेवर जर घर देता आले नाही तर त्याला व्याज द्यावे लागेल. घराच्या ताबा मिळाल्यावर एक दोन वर्षात घरामध्ये काही दोष निर्माण झाल्यास त्याचे उत्तरदायित्व सुध्दा विकासकावरच राहणार आहे.

महारेरामुळे ग्राहकांना कायदेशीर संरक्षण मिळाले आहे. या कायद्याचे पालन विकासकाने न केल्यास त्याला कठोर दंड आणि शिक्षा होऊ शकते. या कायद्यान्वये कुठलीही जात, धर्म वा लिंग या कारणावरुन विकासकाला ग्राहकांमध्ये भेदभाव करता येणार नाही. ग्राहकाला घर नाकारता येणार नाही. ग्राहकांनी महारेरा कडे तक्रार केल्यावर ३० दिवसांच्या आत याचे निराकरण करावे लागेल. ग्राहकांच्या तक्रारीचा तपास आणि निवाडा करण्याचे अधिकार प्राधिकरणास देण्यात आल्याने बिल्डरांच्या मनमानीपासून ग्राहकांची निश्चितपणे मुक्ती होऊ शकते.

प्रधानमंत्री महोदयांच्या आवाहनास अनुसरुन महाराष्ट्राने विविध क्षेत्रातील अनिष्ट बाबी आणि प्रथा यांच्या मुक्तीसाठी प्रयत्नांना उत्तम सुरुवात केली आहे. त्यासाठी निश्चित असा आराखडा तयार केला आहे. त्यानुसार कार्यवाही करण्यात येत असून त्याची दृष्यफळे नजिकच्या काळात दिसून येतील. भारत एक वेगळी उंची गाठत असतानाच त्यासाठी आपले समर्थ असे योगदान देण्यासाठी महाराष्ट्र सज्ज झाला आहे.

■■■

*लेखक महाराष्ट्र शासनाच्या 'लोकराज्य' मासिकाचे संपादक असून मुख्यमंत्र्यांचे माजी जनसंपर्क अधिकारी आहेत.*

*email : ekank@hotmail.com*

# भारतातील सहकारी गृहनिर्माण चळवळ

भारतीय राष्ट्रीय सहकारी गृहनिर्माण महासंघ ही देशातील संपूर्ण सहकारी गृहनिर्माण चळवळीची शिखर संघटना आहे. १९६९ मध्ये स्थापना झाल्यापासून सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या कामकाजाला प्रोत्साहन, विकास आणि समन्वय साधण्याचे काम ती करत आहे. स्थापनेनंतर एनसीएचएफने देशातील सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या नियोजन आणि विकासाकरता अनेकविध उपाय योजले आहेत. राज्य सरकारे/केंद्रशासित प्रदेश प्रशासनाच्या साथीने एनसीएचएफने २० शिखर सहकारी गृहनिर्माण संस्था महासंघ प्रवर्तित केले असून त्यांची संख्या ६ वरून २६ वर नेली आहे. १९६९-७० मध्ये जेव्हा एनसीएचएफ अस्तित्वात आला तेव्हा देशात फक्त १६,३०८ प्राथमिक सहकारी गृहनिर्माण संस्था होत्या आणि त्यांचे ११ लाख १० हजार सदस्य होते. आज अगदी तळापासून पाहिले तर सुमारे एक लाख प्राथमिक सहकारी गृहनिर्माण संस्थांना असून त्यांचे ७० लाखांहून अधिक सदस्य आहेत. या प्राथमिक सहकारी गृहनिर्माण संस्थाना राज्य स्तरावरील २६ शिखर सहकारी गृहनिर्माण महासंघ मदत करत असून ते एनसीएचएफशी संलग्न आहेत. एनसीएचएफबाबत नुकत्याच केलेल्या अभ्यासात असे निष्पन्न झाले आहे की, देशातील सार्वजनिक, खासगी आणि सहकारी क्षेत्रातील १०० घरांपैकी ११ घरे ही सहकारी गृहनिर्माण संस्थांनी सुकर केली आहेत.

सहकारी गृहनिर्माण संस्थांची व्याख्या मर्यादित साधने असलेल्या व्यक्तींचा कायदेशीररीत्या अंतर्भाव केलेला आणि सामायिक गृहनिर्माणाची गरज किंवा सामायिक सहाय्यावर आधारित सुधारणेच्या गरजांचा पाठपुरावा करणारा गट अशी करण्यात आली आहे. अशा सहकारी संस्थांमध्ये सदस्यत्व ऐच्छिक असून नियंत्रण लोकशाही पद्धतीने चालते आणि प्रत्येक सदस्य आवश्यक भांडवलात समान योगदान देत असतो. यात स्वयंसहाय्यतेवर मुख्यत: जोर दिला जातो आणि सहकारी पद्धतीने केलेली कृती ही अशा सहकारी गृहनिर्माण संस्थांचे प्राथमिक वैशिष्ट्य असते. विविध राज्यांमध्ये सहकारी गृहनिर्माण संस्थांचे कामकाज संबंधित सहकारी सोसायटी कायदा आणि सहकारी सोसायटी नियमांनुसार चालवले जाते आणि सरकारने नेमलेल्या सहकारी सोसायटी निबंधकांद्वारे प्रशासन केले जाते. राष्ट्रीय स्तरावरच्या सहकारी संस्था आणि मल्टीस्टेट सहकारी संस्थांचे प्रशासन मल्टीस्टेट सहकारी सोसायटी कायदा आणि नियमांतील तरतुदींद्वारे केले जाते.

सोसायटी म्हणजे सात किंवा अधिक लोकांची संघटना असून ती १८६० च्या सोसायटी नोंदणी कायद्यानुसार नोंदणीकृत असते- हा कायदा अखिल भारतीय स्तरावरील आहे (परंतु अनेक राज्यांत कायद्याचे स्वरूप वेगवेगळे आहे)आणि जिचा उद्देश्य धर्मादाय किंवा परोपकारी स्वरूपाचा असा केलेला असून तो सार्वजनिक किंवा सदस्यांच्या सामायिक हिताशी संबंधित असेल. नोंदणीकृत सोसायटी ही विशिष्ट मर्यादांसह कायदेशीर अस्तित्व (entity) असते. तरीसुद्धा एखाद्या सहकारी सोसायटीचे सदस्य त्यांच्या सदस्यांच्या आर्थिक हितसंबंधाना चालना देण्यासाठी एकत्र येतात.

**सहकारी गृहनिर्माण संस्थांचे फायदे खालीलप्रमाणे आहेत.**

१. सहकारी गृहनिर्माण संस्था ही सार्वजनिक नसते किंवा नफ्याच्या उद्देश्याने स्थापन केलेली संघटनाही नसते. सदस्यच ती नियंत्रित करत असल्याने आर्थिक शोषण टाळणे हाच तिचा प्राथमिक हेतू असतो.

२. सार्वजनिक गृहनिर्माणाच्या विरुद्ध सहकारी गृहनिर्माण संस्थांमध्ये सदस्यांना घरांचा आराखडा बनवताना नियंत्रण करण्याची संधी उपलब्ध असते. त्याही पुढे इमारतीची देखभाल सदस्यांच्या हातात असल्याने कमी खर्चात आणि अधिक चांगल्या मार्गाने देखभाल करता येते.

३. सहकारी गृहनिर्माण घरबांधणीच्या गुणात्मक आणि संख्यात्मक पैलूंचे समाधान करते. सदस्यांचा सहभाग मोठ्या प्रमाणावर अंतर्भूत असल्याने निर्माण होणारी घरे ही इतर कोणत्याही व्यवस्थेतून दिल्या जाणाऱ्या घरांपेक्षा वापरकर्त्यांच्या गरजांना अधिक प्रतिसाद देणारी असतात.

४. सहकारी गृहनिर्माण संस्था रहिवाशांच्या मनात देखभालीबाबत जबाबदारीची जाणीव निर्माण करण्याव्यतिरिक्त त्याची अंमल बजावणी करण्यासाठी आवश्यक यंत्रणा पुरवतात.

५. प्रत्येक बाबीवर किमान खर्च करण्याचा सदस्यांचा एकत्रित प्रयत्न होत असल्याने कमी खर्चिक असा प्रकल्प तयार होत असतो आणि इतर साधनांची बांधणी करून बचत केली जाते.

६. सदस्यांसाठी सहकारी संस्था कर्जाची व्यवस्था करतात आणि कर्जफेड ही सदस्यांची सामुहिक जबाबदारी असते. म्हणून कर्जाच्या हप्त्यांची तसेच इतर शुल्कांची योग्य फेड होते की नाही यावर योग्य नियंत्रण राखले जाते.

७. सहकारी संस्थेच्या कामकाजात सदस्यांना मतदान करण्याचा आणि सहभाग घेण्याचा अधिकार असल्याने त्यांच्यात स्वयंपूर्णता आणि आत्मसम्मान विकसित होतो.

८. सहकारी सोसायटी ही लहान समुदाय असल्याने विशेष उपक्रम आयोजित करणे, आरोग्य सेवा पुरवणे, परिसरातील पर्यावरण सुधारणे, सामाजिक वर्तन आणि मानसिक आरोग्यात सुधारणा असे अनेक सामाजिक उपक्रम हाती घेऊ शकते.

९. सहकारी ग्राहक संस्था, बँक, क्लब आणि इतर सामायिक सेवा ज्या समुदायासाठी गरजेच्या आहेत असे आर्थिक उपक्रम सोसायटी काटकसरीने राबवू शकते.

कायद्यातील अटीं, संबंधित राज्याने तयार केलेल्या चौकटीतील नियम आणि सहकारी संस्थेचे पोटनियम यांची पूर्तता केल्यास कुणीही व्यक्ती सहकारी संस्थेचा सदस्य होऊ शकतो.






■■■

# UPSC Foundation Batch 2017



# MPSC Foundation Batch 2017



**Bhagirath IAS Academy**
UPSC • MPSC

ऑफीस १ : मंत्री हाईटस्, २ रा. मजला, शनिवार पेठ, पुणे-३०
ऑफीस २ : २ रा मजला केसरीवाडा, नारायणपेठ, पुणे -३०
**Ph.: 020-64013450 | 9970298197 | 7378406920**
***Web :*** www.bhagirathacademy.com
***E-mail :*** bhagirathacademypune@gmail.com
***Facebook :*** Bhagirath IAS Academy

**Yojana Marathi** (Monthly) **October, 2017**

**RNI No. MAHMAR/2009/32156**
Reg No. NMB/137/2016-18

Published Date: 12th **October,** 2017
Date of Posting : 16th **October,** 2017




Editor - **Umesh Ujgare**
Printed and Published by **Dr. (Ms) Sadhana Rout,** Director General, on behalf of Publication Division
and Printed at **Onlooker Press**, 16, Sassoon Dock, Mumbai - 400 005. Phone : 22183544/2939
Published at - B-701, Kendriya Sadan, C.B.D. Belapur, Navi Mumbai - 400 614.
Posted at - Mumbai - Patrika Channel Sorting Office,GPO, Mumbai - 400 001.